

# नरभक्षकांच्या जबड्यात

लेखिका ओसा जॉन्सन

अनुवाद रंगा मराठे


१५ जुलै १९७३

१ रूपया

# चित्र, माणूस

## पार्ती पुस्तक

## लाहोर शहर कुणाचे होते?



## Now it Can be told

prof. Bali


# माणूस चित्र, वार्ता पुस्तक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| दिनांक | किंमत | अंक |
| --- | --- | --- |
| १५ जुलै १९७३ | एक रुपया | पहिला |


येत आहे, येणार आहे म्हणून बरेच महिने गाजत असलेली पुरवणी शेवटी जेमतेम वेळेवर निघत आहे. वीज कपातीमुळे पहिले काही महिने वाया गेले. नंतर आला दुष्काळ. काही नवे करायला मन धजावत नव्हते. पावसामुळे हे ओझे आता जरा हलके झाले आहे. अडचणी संपल्या असे नाही—कालच वृत्तपत्रीय कागदाची गंभीर परिस्थिती I. E. N. S. चे अध्यक्ष एन्. नरेन्द्र यांनी पत्राने कळवली आहे.
पण अडचणी, अडचणी म्हणून थांबायचे तरी किती ? तेव्हा पुढचामागचा, हिशोबाचा फारसा विचार न करता शेवटी ठोकून दिली आहे ही उडी मुळामुठेच्या खवळत्या, खळाळत्या प्रवाहात. आमच्या संभाजी पुलावरून पोरे ठोकतात तशी. पोहता चांगले येत असल्याने काठ नाही लागला तरी बुडणार नाही अशी अर्थातच खात्री आहे.
मैफलीत ख्याल झाल्यावर एखादी ठुमरी पेश होते. पुरवणीचे स्वरूप तसे आहे—तसे राहावे—काहीसे स्वैर, स्वच्छंद मोकळे, हलकेफुलके अशी कल्पना आहे. पाहू या ही कल्पना कशी काय साकार होते ते.
—संपादक



छाया
देवीदास बागूल

# मॅजिस्टिक गप्पा

## मुक्काम : पुणे

छाया : प्रकाश जाधव



हे नम्र दंडवत नव्हे– किंवा हे
पु. ल. छाप मिस्किल हसणेहि नाही ! -
मुद्दा गंभीरच पण हात चुकून जुळले
आहेत इतकेच !



" भारतीय रंगभूमी म्हणण्यात
राष्ट्रीय अहंकार काही नाही "– हे
वाक्य पुनः पुनः समेसारखं पु. ल.
म्हणताहेत–
–पण पाध्यांना यात इतकं रागवायला
काय झालं ?
' हिंदी म्हणजेच भारतीय ' असा
प्रा. भुपटकरांच्या बघण्याचा अर्थ
नाही !



बोलण्याच्या ओघात 'अंमळ' इंग्लिश शब्द जास्तच झाले– या जाणीवेने त्रस्त असलेले प्रा. माधव वझे !
श्यामला बनारसे– नेहमीप्रमाणे ताठ भूमिकेत !

दत्ता सराफ– आणि पलिकडे प्रा. प्रभाकर ताम्हणे परिसंवादातील दोन "अलल्– डुर्र !"
पण अहो सोनटक्के ! चेहरा अजून पडलेला का ? म्हणजे बक्षिस मिळूनहि हं– ! —



मध्यान्ह तर टळून गेली– केशवरावांकडील जेवणाचा मेनू काय असेल ?– ज्ञानेश्वर नाडकर्णी


विद्याधर पुंडलीक– एक सूक्ष्म साक्षेपी सत्यकथीय मुद्दा ! –

—ना. ग. गोरे व अरविंद मंगरूळकर– चर्चेवर पाळत ठेवणारी नजर !





" हा गोतावळा जमवून पुन: 'गोतावळ्या'चीच चर्चा तर चालू नाही ? अर्थात 'महाराष्ट्र टाइम्स' प्रसिद्धीला तयार आहेच ! " दि. वि. गोखले.



वासू देशपांडे– " पु. ल. लक्षात ठेवा ! नाथ पैं चे खरं रहस्य मला तुमच्यापेक्षा जास्त कळलंय ! "

ज्ञानेश्वर नाडकर्णी– भूकेने पूर्ण मलूल ! शिवाय चर्चेच्या कंटाळ्याचा थकवा !

वि. भा. देशपांडे– शेवटी चर्चेचं सार काय ? अन् लेख कुठे– 'माणूस' का 'सोबत' ?

पाचपंचवीस साहित्यिक, तेसुद्धा पुण्याचे, वेगवेगळ्या पिढ्यांचे, 'घराण्याचे' आणि गटांचे सातत्याने एकत्र येताहेत आणि बऱ्याचशा निर्मळपणे गप्पाटप्पा करताहेत हे दृश्य चमत्कारिक आहे. क्रांती हा शब्द फार सवंगपणे वापरण्यात येतो म्हणून पण खरोखरीच याला पुण्याच्या साहित्यिक जीवनातील क्रांती म्हटली पाहिजे !

पण असे झाले आहे खरे. मराठीतील एक आघाडीचे प्रकाशक श्री. केशवराव कोठावळे यांच्या प्रेरणेने गेल्या मे महिन्याच्या सुटीपासून साहित्यिकांच्या गप्पाटप्पांचा एक कार्यक्रम पुण्यात नियोजित होत आहे आणि मंडळी, तो अजून चालू आहे !

जुलैच्या एक तारखेला असाच आणखी एक लक्षवेधी चर्चेचा कार्यक्रम झाला. त्याचे संयोजन आणि सूत्रपालन ख्यातनाम पु. ल. देशपांडे यांनी केले. विषय होता–भारतीय रंगभूमी अशी काही आहे काय ? पन्नास-पाऊणशे निवडक साहित्यिक आणि इतर रसिक यांच्या उपस्थितीत दोनएक तास एक चांगली–घुसळून, घुसळून चर्चा झाल्याचे समाधान सर्वांना वाटले.

पु. लं. नी प्रथम विषय मैदानात आणला. त्यांचे बोलणे अजिबात औपचारिक नव्हते. अगदी सहज बोलत होते ते. संथपणे, देवघेवीच्या आत्मीयतेने. विशेष म्हणजे उगाचच हसवून लोकप्रिय जबाबदारीचे दडपण येऊ न देता आणि विषय मोकाटपणे भरकटू न देता त्यांनी तो एका दर्जेदार गांभीर्याने चटकन

सुसूत्रपणे माडला : 'भारतीय' रगभूमी म्हणण्यात कोणताही सकुचित राष्ट्रवादी अहकार मला अभिप्रेत नाही. पण भारतीय परपरेच्या संचितात प्रादेशिक लोकसाहित्य, सगीत आणि कलाचे एक भाडार आपल्याजवळ आहे. तमाशा, नवटकी, कथाकली, रामलीला–लळीत भारूडे–भवई इत्यादी रंगभूमीच्या माध्यमाचे विविध प्रकार येथे निर्माण झाले आहेत. ते जसेच्या तसे उचलून आजच्या रगमचावर आणता येतील असे नाही. पण रगभूमीच्या या परपरागत माध्यमात काही एक शक्यता आहेत आणि हे सर्वच प्रकार वाटतात तेवढे आजच्या आधुनिक रंगभूमीच्या दृष्टीने गैरलागू irrelevant वाटत नाहीत. ते लागू करता येतील का ? कसे करता येतील ? हा खरा प्रश्न आहे. तोच मी आपल्यापुढे मांडतो. पुरावा म्हणून त्यानी खूप उदाहरणे दिली आणि ती सर्व उद्‌बोधक होती. 'यक्षगान' या कर्नाटकातील नाट्यमाध्यमातून गिरीश कर्नाडाचे 'हयवदन' निर्माण झाले. ब्रेख्तच्या नाटकाची अभिव्यक्ती मराठी तमाशाशी जुळती आहे. रामलीलेतूनही हनुमानाच्या शेपटीला आग लावण्याइतके रॉकेल गावात शिल्लक नाही असा सामाजिक उपहास लीलेने साधला जातो. या सर्व उदाहरणावरून एक कळले–हे प्रकार फार लवचिक आहेत आणि कर्नाडासारखा एखादा जुन्यानव्याचा साधा जोडणारा निघाला की अल्काझीसारख्या पाश्चिमात्य नाट्याची धारणा असणारा दिग्दर्शकही पुनर्जीवन करीलसे वाटते.

'पु. ल. नतर अर्थातच मी' असे मानून ज्ञानेश्वर नाडकर्णी बोलले. पण त्याचे हे मानणे अहंकारी नव्हते. त्यात एकप्रकारची सहजपण स्वयस्फूर्ती होती. आजची आपली रगभूमी मध्यमवर्गीय आहे आणि मध्यमवर्गीय रंगभूमीवरच्या जाणीवाशी परंपरागत लोकरंगभूमीचे प्रकार कसे जुळवायचे ही समस्या त्यानी माडली. 'घाशीराम'मध्ये विजय तेंडुलकर यशस्वी झाले पण 'सरी ग सरी'मध्ये तमाशासदृश नाट्यमाध्यम हाताळण्यात ते अयशस्वी झाले, इकडे त्यानी लक्ष वेधले. पण हा सूर लावता लावता कोणतेही चिरतन सत्य कोणत्याही नाट्यमाध्यमातून प्रगट करता येईल–असेही त्यानी सागून टाकले.

यानंतर नाडकर्णी आणि पु. ल. अशी जुगलबंदी बराच वेळ चालू राहिली. (माझ्या म्हणण्याचा अर्थ असा, मलाही असे म्हणायचे नाही–इ. इ.)

ही जुगलबदी पुरे–चर्चा सगळ्याची झाली पाहिजे असा आक्रमक पुकारा करून दोन व्यक्ती पुढे झाल्या. पहिले प्रा. प्रभाकर ताम्हणे–भारतीय रगभूमी म्हणजे काय ? ती स्वतत्र का ? रगभूमी ही जागतिकच असते–असे तावातावाने माडून त्यानी आपल्याला ज्ञानेश्वर नाडकर्णींचे म्हणणे मान्य आहे असे जाहीर केले. प्रभाकर ताम्हण्याचा पाठिंबा आपल्याला आहे हे समजून नाडकर्णी जरा दचकलेच. अन् माझ्या बोलण्यातून काही गैरसमज झाले असल्यास त्याला मी संपूर्णपणे जबाबदार आहे असे त्यानी जाहीर केले. त्यानतर आलेल्या दत्ता सराफानी–

चर्चेत रगभूमीरचा आशय आणि रंगभूमीवरची अभिव्यक्ती याची गल्लत होते आहे, असे सागितले. अशी गल्लत कोठे होत होती याचा अचबा श्रोतृवर्ग करीत असतानाच 'सेक्स आणि लग्न या दोन गोष्टी जशा वेगळ्या तशा याही गोष्टी वेगळ्या असतात' अशीही त्यानी एक भक्कम उपमा दिली आणि पुन्हा भारतीय रंगभूमी हा एक हट-वाद आहे असे गर्जून ते बाजूला झाले.

सराफ–ताम्हण्यानी मरगळलेल्या चर्चेत चैतन्य आणले. पण वस्तुनिष्ठ दृष्टीच्या आनद यादवाना हे सहन झाले नाही. त्यानी पु. ल. च्या दृष्टिकोनात भारतीयत्वाचा कडवा आग्रह नाही, रगभूमीच्या विकासाची एक दिशा म्हणून आपण फोक-आर्ट्सकडे बघावे असे सुचविले.

इतका वेळ प्रभाकर पाध्ये गप्पच होते. पण आतल्या आत ते क्षुब्ध झाले होते. 'मध्यमवर्गीय रगभूमी' आणि लोकरगभूमीची माध्यमे हे दोन प्रश्न वेगवेगळे आहेत' असे ठणकावून सागून त्यानी चर्चेचे दोन स्वच्छ तुकडे केले !

या मेळाव्यात नाटकाशी प्रत्यक्षपणे सबधित असलेला एकच माणूस होता – माधव वझे. तमाशा किंवा नृत्यनाट्यादी प्रकार सगीतमय असतात. अशा प्रकाराचे सामर्थ्य मान्य करूनही त्याचा भावनात्मक परिणाम किती होतो, असा एक चागला प्रश्न त्यानी उपस्थित केला पण तो कोणी अनुसरला नाही.

ना. ग. गोरे यांनी प्रादेशिक रगभूमीचे आपल्याकडचे प्रकार आणि त्यांची सपन्नता मान्य केली. पण प्रकाराच्या अगभूत मर्यादा असतात आणि आधुनिक रंगभूमीच्या समस्या हाताळताना त्या ध्यानात घेतल्या पाहिजेत. असा मुद्दा माडला. या सदर्भात बोलताना विद्याधर पुंडलिकानी कोणत्याही कलाप्रकाराला अगभूत मर्यादा असतात हे अमान्य केले. अशा प्रकाराचा बदिस्तपणा मोडून रगभूमीवर चमत्कार झाले आहेत इकडे त्यानी लक्ष वेधले. (तमाशातून लेनिनचे चरित्र बगाली रंगभूमीवर आले आहे – पु. ल.) आणि 'माय फेअर लेडी'चा संगीत आविष्कार पाहून शॉलाही धक्का बसला असता (पाध्ये) असा दुजोरा या मुद्याला मिळाला. विज्ञान आणि तत्रज्ञानामुळे साऱ्या जीवनाला आणि म्हणूनच रंगभूमीलाही एक साचेबदपणा येतो आहे. साचेबदपणाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून काही सर्जनशील लेखक नेहमीच परपरेचा शोध घेत राहतील असाही एक विचार त्यानी माडला. याही विचारावर चर्चा झाली नाही.

एतका वेळ अरविंद मगरुळकर गप्प होते. त्याना मग पु. ल. नी बोलते केले. भारतीय वास्तव असे काही निश्चितच आहे–उदाहरणार्थ कर्म, पुनर्जन्म आणि शापकल्पना. यावाचून कालिदासाचा विचार अशक्य आहे भरताने रगमचाचे सागितलेले प्रकार आश्चर्य वाटतील असे आधुनिक आहेत. आणि लोककलामध्ये महाराष्ट्र दरिद्री असला तरी उत्तर-दक्षिण निश्चितच समृद्ध आहे – असा मगरुळकरानी प्रपंच केला. तो नक्कीच चालना देणारा होता.

सर्वात शेवटी प्रा. वि. भा. देशपांडे बोलले. त्यानी पु ल ना तीन नेमके प्रश्न विचारले.

१ : आजच्या रगभूमीवर आपले परंपरागत प्रकार आणताना काय अडचणी आहेत ?

२ : आधुनिक रंगभूमीवरील प्रेरणा त्याच्याशी किती जुळतात ?

३ : असे निश्चित प्रकार कोणते ? या तिन्ही प्रश्नाना पु. ल. नी उत्तरे दिली आणि दोन तास रगलेली ही चर्चा संपली.



# पंतप्रधान मुंबईत ६ जुलै

छाया : मोहन नावेलकर

मुंबईकरांचं सुरळीत जीवन पार उध्वस्त करून टाकणारा हा पाऊस . . .

**एक दिवसाचा भरगच्च कार्यक्रम घेऊन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी सांताक्रुज विमान तळावर उतरल्या.**







' नव्या औरंगाबादची योजना
अशी असेल '— डॉ. झकेरिया


जसलोक हॉस्पिटलचे उद्‌घाटन






पेडर रोडवरील जसलोक रूग्णालयाची
वीस मजली इमारत.

अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज अशा
'जसलोक' मधील दोन विभाग
१ एक्स-रे मशीन
२ ऑपरेशन थिएटर





# ४,००,००,००० चे रुग्ण सेवाशिल्प : जसलोक

## डॉ. सुरेश नाडकर्णी

आमच्या मुंबईत कुठलीही घटना घडायची म्हटले की तिचे पडघम कधीपासून वाजू लागतात. मग ते एखादे गगनचुंबी आलिशान हॉटेल असो किंवा चार कोटीचा खर्च करून बांधलेले वीस मजल्याच्या वास्तुतील 'जसलोक' रुग्णालय असो. एवढच जाहिरातबाजीशिवाय साधे पानही न हलणाऱ्या आमच्या मुंबईतील ह्या 'जसलोक' रुग्णालयाचे 'गाला याने भव्य' उद्घाटन दि. ६ जुलै रोजी पंतप्रधानांच्या हस्ते धुमधडाक्यात झाले. ह्यासाठी काही वृत्तपत्राकरवी प्रसंगोचित अशा खास पुरवण्याही काढण्यात आल्या होत्या. इतकेच नव्हे, तर आकाशवाणीनेही या कार्यक्रमाची दखल घेतली होती

आशियातील अत्याधुनिक व 'प्रति मेयो-क्लिनिक' समजल्या जाणाऱ्या, तसेच बरीच वर्षे स्थानिक लोकांच्या कुतुहलाचे केंद्रस्थान बनून राहिलेल्या ह्या रुग्णालयाचे उद्घाटन करताना इंदिराबाई म्हणाल्या, 'राष्ट्राची शक्ती ही नागरिकांच्या सुदृढतेवर अवलंबून असते व त्या दृष्टीने इस्पितळांनी व संशोधन-केंद्रांनी कार्य करावे; या अद्ययावत् साधन-सामग्रीनी सुसज्ज असलेल्या इस्पितळाचा जास्तीत जास्त फायदा गरीब लोकांना कसा होईल हे प्रामुख्याने पाहिले गेले पाहिजे' वगैरे, वगैरे.

आधुनिक रुग्णालयाला आवश्यक असणारे सर्व विभाग 'जसलोक'मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत ह्याशिवाय 'कृत्रिम-मूत्रपिंड-विभाग', 'हृद्रोग-अतीव शुश्रुषा-विभाग;' 'झटपट-रक्त-परीक्षा विभाग; आधुनिकपद्धतीचे–निर्जंतुकीकरण;' 'कर्क-रोगावरील–आत्याधुनिक-उपचार;' 'वैद्यक-विषयक-चित्रपट–' 'प्रदर्शनार्थ चित्रपटगृहे' ही ह्या रुग्णालयाची खास आकर्षणे आहेत. तसेच परदेशातील काही तज्ज्ञ डॉक्टर्स इथे कामे करणार आहेत

अशा ह्या रुग्णालयात एकूण ४५० खाटांची सोय असून त्याची संख्या ६०० खाटापर्यंत वाढविण्यात येण्याची शक्यता आहे या इस्पितळातील पचवीस टक्के खाटा सर्वस्वी विनामूल्य ठेवण्यात येणार आहेत व ह्या वगळता, आणखीन तीस टक्के खाटा 'द्रव्य–सहाय्य-अर्पित' –सब्सिडायझ्ड–असतील असे सांगण्यात येते.

वैद्यक-शास्त्रातही गैरहिशेबी व्यवहार होऊ शकतो जरूर नसताना काही शस्त्रक्रिया (खरोखरीच) अजाणतेपणे वा गैर-रोग-निदानापायी होऊ शकतात. औषधोपचारही चुकीचे वा अनाठायी होण्याची शक्यता असते. ह्यासाठी 'वैद्यकीय-हिशेब तपासणी'चे तंत्र अमलात आणले जाते. तसे केल्याने वैद्यक-मंडळींना आपल्या चुका कळतात व अशा प्रकारे पुढच्यास जरी ठेच लागली तरी मागचा शहाणा ठरतो! तरी 'वैद्यकीय-हिशेब तपासणी' सारखा आत्मसंशोधनाचा मार्ग 'जसलोक'मध्ये सुरू करण्यात येत आहे ही आनंदाची बाब आहे. अर्थात् ह्याचा अमोल उपयोग 'जसलोक-संशोधन-केंद्रा'ला होणार आहे हे निर्विवादच!

कुठल्याही हॉटेलमध्ये गेलो असता तेथील मुदपाकखाना पाहू नये असं म्हणतात... कारण तेथेही एकूण दुरावस्थाच आढळते. रुग्णालयाच्या बाबतीतही बऱ्याच वेळा असेच घडते तरी अन्न पोषण-शास्त्रातील तज्ज्ञ मंडळी नेमून व तेथील कर्मचाऱ्यांची वारंवार तपासणी करण्याची योजना आखून रुग्णालयाचे स्वयंपाकघर 'निरोगी' ठेवण्याचा कार्यक्रम खरोखरीच स्तुत्य आहे.

रुग्णालयाच्या विश्वस्तांनी आणखीन काही मागणी केलेली आहे. संपूर्ण मोफत असे डोळ्यांचे रुग्णालय बांधण्यासाठी जुळ्या मुंबईत जागा, पदव्युत्तर वैद्यक महाविद्यालयासाठी जागा ह्यासारख्या विश्वस्तांच्या मागण्या उपरोल्लिखित वृत्तपत्र-पुरवणीमध्ये समाविष्ट केल्या आहेत 'परंतु सर्व कर्मचाऱ्यांच्या निवासाची सोय करण्याची शेटजींची इच्छा होती. महाराष्ट्र सरकारने जमीन देण्याची तयारी दर्शविली असती तर ते साध्यही झाले असते' हे विधान मनाला पटणारे वाटत नाही. कारण एके ठिकाणी खाटा वाढविण्याचा विचार प्रकट केला जातो, तर दुसऱ्या ठिकाणी 'कामगारांसाठी निवास बांधण्यास जागा नाही व ह्याला सरकार जबाबदार आहे' असा तक्रारीचा सूर काढला जातो. कामगारांची तमा कुणाला नाही हेच खरे! जनतेबद्दल जिव्हाळा व सेवाभाव बाळगणाऱ्या विश्वस्तांनी ह्याचा विचार तळमळीने करावयास हवा होता कारण रुग्णालय अशा ठिकाणी–पेडर रोड–बांधण्यात आले आहे की कर्मचाऱ्यांना कामावर येण्यासाठी बस वा टॅक्सीशिवाय अन्य वाहन उरत नाही!

असो. आजपर्यंत 'सर्वांसाठी खुले' असे जाहीररित्या व कागदोपत्री सांगणाऱ्या खाजगी इस्पितळाप्रमाणे ह्याही रुग्णालयातील मोफत खाटा एखाद्या विशिष्ट जमातीसाठी किंवा काही विवक्षित डॉक्टर-मंडळीच्या 'आशीर्वादा'ने पुनीत झालेल्यासाठी 'खुले व मोफत' राहणार आहे की काय हे मात्र अजून ठरावयाचे आहे! अर्थात् ही जबाबदारी विश्वस्तांची आणि तसे झाल्यास मात्र ते लोकादरास पात्र ठरणार नाहीत हे निश्चितच!


# पाऊस

एक सुटलेली समस्या




माझे पावसाचे अंदाज
कधीच चुकणार नाहीत.
मी 'साठ' पावसाळे पाहिलेत!
महागाई
अन्नटंचाई
पांढरे कावळे!
(एक पावसाळी शोध)
यंदा पाऊस भरपूर पडला!
विमानंही भरपूर पडली!!

# नवा मध्यमवर्ग : एक क्ष किरण



**चंद्रशेखर मराठे**

गेली काही वर्षे वृत्तपत्रात, साप्ताहिकात लिखाण करीत असल्याने माझ्यावर एक विचित्र प्रसंग वारंवार ओढवतो. कोणी ओळखीचे, नात्याचे, भेटले की प्रचलित परिस्थितीवर हमखास शंका विचारल्या जातात. कधी भाववाढ तर कधी इतर काही राजकीय घडामोडी ! जो विषय गाजत असेल त्यावर कधी रागारागाने, कधी हेटाळणीने तर कधी अगतिकतेने प्रश्न विचारले जातात.

मी काहीतरी स्पष्टीकरणे करतो. माझे वर्तुळ सारे मध्यमवर्गीय ! त्यामुळे या असल्या चर्चा-गप्पा-वादावादीतून विशेष काही निष्पन्न होत नसले तरी मध्यमवर्गीय मनाच्या जडण-घडणीची; त्यात होणाऱ्या स्पंदनांची मला थोडीफार ओळख पटते. कोणते प्रश्न, कोणत्या घडामोडी मध्यमवर्गीय मनाला स्पर्श करतात, त्याकडे हे मन कोणत्या रोखाने पहाते याचे काही दर्शन होते.

मीही तसा मध्यमवर्गीयच ! 'मध्यमवर्गीय' या शब्दाने मी माझ्या वर्तुळाचे व माझे स्वतःचे वर्णन केले खरे पण अखेरीस एका शब्दाने एखाद्या मानव समूहाचे वर्णन करू पाहणे हे सोय म्हणूनच ठीक आहे. असे वर्णन करणे एका मर्यादेपर्यंतच चालते—पुढे असे करण्याने परिस्थितीची जाणीव स्पष्ट होण्याऐवजी अंधुकच होत जाते. असे मी का म्हणत आहे ? शब्द मोठे फसवे असतात. जाणिवेचे वाहन म्हणून उपयोगी पडणारे हे शब्द केवळ तेवढेच राहत नाहीत. माणसे शब्दांच्या प्रेमात पडतात, त्यांचा द्वेषही करतात—त्यांना घाबरतात देखील !

लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद, स्वातंत्र्य, समता, परंपरा, न्याय हे सारे शब्दच—काही स्वर आणि काही व्यंजने यांनी बनलेले ! पण असे मातवर, की त्यांच्यापायी लाखो, कोटयावधी माणसे एकमेकांच्या जिवावर उठतात, जिवाला जीव देतात, राज्ये उभारतात—मोडून टाकतात. जगण्याला अर्थ मिळवतात !

'मध्यमवर्गीय' हा शब्द एवढा काही मातबर नाही. पण पुरेसा गुंतागुंतीचा आहे. अनेक सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञानांत या शब्दाला महत्त्वाचे स्थान आहे. आणि हा असा शब्द आहे, की तो उच्चारताच आपल्याला कोणाबद्दल तरी काही निश्चित कळले असे ऐकणारास वाटते. म्हणजेच तो 'घनीभूत' (सॉलिडिफाय) झालेला आहे. अर्थाचे दृष्टीने जे काही थोडे स्वयंपूर्ण शब्द आहेत त्यात हा शब्द मोडतो.

मला असे वाटते की ज्या समाजगटाला मध्यमवर्गीय म्हणून संबोधले जाते त्या समाजगटातील बदल स्पष्ट करण्याचे सामर्थ्य या शब्दात नाही. असे पहा, की गेली पन्नास वर्षेतरी 'मध्यमवर्ग' हा शब्द सर्रास प्रचारात आहे. पन्नास वर्षापूर्वी या वर्गात कोण मोडत होते ? वकील, डॉक्टर, शिक्षक, सरकारी नोकर व थोडेफार व्यावसायिक !

हाच मध्यमवर्ग शब्द आम्ही आज जेव्हा वापरतो तेव्हा त्यात कोणाचा समावेश होतो ? कारखानदारी, ऑफिसेस, बँका, सार्वजनिक क्षेत्र यांतील कर्मचारी, छोटे कारखानदार, समाजाच्या केवढयातरी वाढलेल्या गरजा भागवणारे अनेक प्रकारचे व्यावसायीक वगैरे. आता हा बदल केवळ संख्येच्या वाढीपुरताच मर्यादित आहे काय ? आसपासच्या जीवनाकडे ओझरती जरी नजर टाकली तरी कळून येईल आपल्याला, की हा बदल केवळ संख्येतील वाढीचा नाही.

पूर्वीचा मध्यम वर्ग जे व्यवसाय करीत होता ते मुख्यतः एकेकटयाने करण्याचे, काही विशिष्ट विद्येवर अवलंबून असे आणि स्वतंत्र असे होते. याचा परिणाम त्याच्या वृत्तीत दिसत होता. तो कोणाकडून सहाय्याची अपेक्षा करीत नव्हता, विद्या हेच आपले निर्वाहसाधन मानून तिची एकाद्या व्रताप्रमाणे जोपासना करीत होता, आपल्या वेगळेपणाला, स्वतंत्र वृत्तीला जोपासत होता, समाजातील आपले अंगभूत श्रेष्ठत्व त्याला सुखावीत होते. सामाजिक राजकीय चळवळीत मनाला एखादी गोष्ट पटल्यास ती अट्टाहासाने करीत होता.

या साऱ्याच्या मागे काही आधुनिक परकीय प्रेरणांचा आधार आहे हे मात्र त्याच्या लक्षात आलेले नव्हते. तो असे मानीत होता, की हे सगळे करणे आपल्याला येथल्या परंपरेनेच लाभले आहे. समाजाचे नेतृत्व करणे ही आपली परंपराच आहे ही त्याची समजूत होती. टिळक-गांधी यांच्या चळवळींना या वर्गापैकी काही भागाने साथ दिली ती या समजुतीतून. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या गोष्टी, जे सिद्धांत, जी तत्त्वे आपल्याला भावतात ती येथील समाजालाही भावतील या श्रद्धेने या मध्यमवर्गाने हे सारे स्वीकारले. नव्या व्यवस्थेतही आपले नेतृत्त्व समाज मानील अशी त्याला आशा होती.

आताचा, पन्नास वर्षानंतरचा मध्यमवर्ग कसा आहे ? उपजिविकेसाठी त्याला करावे लागणारे व्यवसाय एकांडे, स्वतंत्र राहिलेले नाहीत. एखाद्या मोठ्या रचनेतील छोटा दुवा म्हणून त्याला वावरावे लागते. काही खास विशिष्ट विद्या हे त्याच्या उपजीविकेचे

प्रमुख साधन राहिलेले नाही. लाखो कारकून, अधिकारी, शिक्षक वा इतर कर्मचारी व्यावसायिक यांच्यात काही खास विद्या (जशी डॉक्टर वकील यांच्याजवळ असते तशी) राहिलेली आहे असे मानणे चुकीचे ठरेल. कोणत्याही चळवळीत वा राजकीय कार्यात संपूर्णपणे पडण्याइतके स्वातंत्र्य त्याला नाही. त्याची आर्थिक स्थिती ही आता एकेकट्याच्या प्रयत्नाने बदलणे शक्य राहिलेले नाही. युनियन्स, असोसिएशन्स यांच्यात त्याला सामील व्हावे लागते. राहण्यासाठी त्याला इतरांशी मिळतेजुळते घेऊन सहकारी घरबांधणीची कास धरावी लागते. थोडक्यात म्हणजे त्याचे समाजिकीकरण झाले आहे. व्यवसाय, सामाजिक जीवन यात त्या वर्गापैकी व्यक्तीच्या स्वतंत्र विचाराला, मताला तशी काही किंमत राहिलेली नाही. भाववाढ व इतर परिस्थितीच्या रेटचाने या नव्या मध्यमवर्गाच्या एकंदर स्थितीत व इतरांच्या स्थितीत फारसे अंतर राहिलेले नाही. त्याला देखील सर्वांप्रमाणे शासनाकडे साहाय्यासाठी सोयीसाठी पहावे लागते.

वाढते सामाजिकीकरण (सोशलायझेशन) झाल्याने या नव्या मध्यमवर्गात 'वर्ग' म्हणून जास्त एकसंधपणा आलेला दिसावयास हवा नाही का? पण तसे झालेले नाही. याचे कारण या वर्गाच्या मनस्थितीमधील अंतर्विरोधात शोधावे लागते. परिस्थितीने रेशनच्या क्यूत सर्वांना समान बनविले, साध्या साध्या गोष्टींसाठी वणवण भटकायला लावले तरी नवा मध्यमवर्ग आपल्या वेगळेपणावरची, आगळेपणावरची श्रद्धा सोडण्यास तयार नाही त्यामुळे त्याच्यात अनेक अंतर्विरोध निर्माण होत आहेत. त्याची नोंद करण्याआधी वेगळेपणाची ओढ कोठले वळण घेत आहे ते पाहू.

समाजातील इतर थरापासून काही वेगळेपण राहिले नाही म्हणून हा वर्ग आपापसातच अधिकाधिक वेगळेपण (इटर्नल डिफरन्सिएशन) निर्माण करीत आहे दोन बुद्धिजीवी मंडळींचे एकमेकाशी पटत नाही. ह्या वर्गातील मंडळी राजकीयदृष्टचा काँग्रेसपासून ते नक्षलवादी चळवळीपर्यंत विभागलेली दिसतात. साहित्य-कलाक्षेत्रात ही मंडळी अनेक वाद हिरीरीने खेळत असतात. ज्यांच्या वडिलांनी स्वदेशी चळवळीत परदेशी कापडाच्या होळीत हिरीरीने भाग घेतला असेल तीच मंडळी त्याच हिरीरीने आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये घालतात, स्मगल केलेल्या परदेशी वस्तू मिळवण्याच्या मागे असतात. सध्या मध्यमवर्गात वाढीस लागलेली पाश्चात्त्य संस्कृती या वेगळेपणाच्या ओढीची निदर्शक आहे. 'व्यक्तिवादी' तत्त्वज्ञानाचा सर्वांत जास्त पुरस्कार करतात ते नवे मध्यमवर्गीयच!

आता याच वेगळेपणाच्या शोधाचे दुय्यम परिणाम म्हणून निर्माण झालेले अंतर्विरोध कसे आहेत ते पहा:

स्वातंत्र्यापूर्वी सरकार परकी आहे म्हणून देश बुडत चालला असे मानून सरकार ताब्यात घेण्यासाठी आटापिटा करणारा हा वर्ग आता मात्र असे म्हणतो की, 'सरकार' हा घटक सार्वजनिक जीवनात तेवढा महत्त्वाचा नाही व सरकारचे क्षेत्र मर्यादित ठेवावे.

सरकारचे क्षेत्र मर्यादित ठेवावे एवढेच तो म्हणत नाही तर 'सरकार' या संस्थेविषयी त्याच्या मनात कमालीची तुच्छता, विरोधी भावना व तिटकारा आहे. एखाद्या पक्षाला विरोध असणे निराळे व सरकारबद्दलच तुच्छता (अँटि गव्हर्मेंट पोझिशन) असणे निराळे.

सरकार म्हणजेच शासन म्हणजेच संघटित व कायदेशीर दंडशक्तीबद्दल अशी तुटकपणाची भावना बाळगणारा मध्यमवर्ग अगदी अंतर्यामी मात्र कोणत्यातरी हुकूमशाहीची वाट पाहात आहे–म्हणजेच अमर्याद दंडशक्तीचा पुरस्कार करीत आहे

याच संदर्भात आणखी एक अंतर्विरोध म्हणजे हिंसेबाबतची या वर्गाची भूमिका. बहुतेक मध्यमवर्गास हिंसेचे आकर्षण आहे पण प्रत्यक्ष हिंसाचाराच्या प्रसंगात हा टिकू शकत नाही. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाची टवाळी करण्यात सर्वांत पुढे असलेला हा वर्ग जरा कोठे दगडफेक झाली, की खिडक्या दारे लावून घेऊन घरात बसतो

'हुकूमशाही–हिंसा' या जोडगोळीच्या सुप्त प्रभावामुळेच हा वर्ग लोकशाहीच्या संथ, काहीशा विस्कळित प्रक्रियाबद्दल कमालीचा उतावीळ व असंतुष्ट असतो हा सारा गोंधळ कोणीतरी पटकन थांबवावा व परत आपल्याला इतर सर्व समाजापेक्षा थोडे सुरक्षित, थोडे चांगले असे आयुष्य जगावयास मिळावे असे त्याला मनोमन वाटते आजच्या मध्यमवर्गाची खरीखुरी तळमळ कोणती असेल तर ही


पण सारा गोंधळ थांबणार कसा? हाच वर्ग संघटनांच्या द्वारे संप, मोर्चे, हरताळ, घेरावो या मार्गांनी या गोंधळात मनसोक्त भर घालीत असतो ना? थोडे थांबून विचार केला तर लक्षात येईल, की शहरी जीवनाच्या विस्कळितपणाला, तणावांना हाच वर्ग जबाबदार आहे शेतकरी, भूमिहीन, काही मुंबई बंद–महाराष्ट्र बंद करीत नाहीत.

आर्थिक परिवर्तनाबाबत तर नवा मध्यम वर्ग अगदीच भाबडी व भोट मते बाळगून आहे. आर्थिक विकास व्हावा असे काही अर्थशास्त्रज्ञ का म्हणतात हेच त्याला कळत नाही. आर्थिक विकास व स्वत:ची स्थिती यातील संबंध बुद्धिवादी म्हणवणाऱ्या या वर्गाच्या ध्यानात येतच नाही. आपली पूर्वीची चांगली स्थिती ही तो निसर्गदत्तच समजत आला आहे. स्वस्ताईची उपकारक बाजूच ध्यानात घेऊन 'रुपयाला दोन पायली तांदूळ' वगैरे असलेल्या काळाबद्दल मध्यम वर्गीय स्त्री-पुरुष ज्या भावविवशतेने बोलतात त्यावरून हे ध्यानात येते.

दारिद्र्य व संपन्नता या सामाजिक उत्पादनाच्या साधनांच्या रचनेतून निर्माण होणाऱ्या गोष्टी आहेत हेही त्याच्या लक्षात येत नाही. व्यक्तिगत संपन्नता व सामाजिक आर्थिक रचना यांचा संबंध विसरून, तो जेव्हा चांगल्या आयुष्याची अपेक्षा करतो तेव्हा मौज वाटते. चांगल्या संपन्न जीवनाची अपेक्षा हे मूल्य स्वीकारण्यात तशी काही चूक नाही (मात्र ५० वर्षापूर्वीच्या मध्यम वर्गाने ही अपेक्षा मूल्य म्हणून स्वीकारलेली नव्हती) पण हे मूल्य अतिशय मत्सरी मालकाप्रमाणे (जेलस मास्टर) आहे इतर साऱ्या गोष्टी त्याच्यापुढे झुगारून द्याव्या लागतात. अमेरिकेसारख्या प्राकृतिक दृष्ट्या संपन्न राष्ट्रासही ते करावे लागले.

चांगल्या संपन्न जीवनाची अपेक्षा हे मूल्य स्वीकारले तर त्यामुळे काही चौकट स्वीकारावी लागते काही आर्थिक शिस्त, झीज सोसावी लागते. आपल्या गरजांचे स्वरूप बदलावे लागते आणि मुख्य म्हणजे

पृष्ठ ५६ वर



Prof. Bali


# NOW IT CAN BE TOLD

## पंचवीस वर्षांपूर्वी गाजलेल्या एका दुर्मिळ पुस्तकाचा अनुवाद ( थोडा संक्षिप्त )

पंजाबमध्ये अनेक राजकीय पक्ष होते. त्या त्या पक्षाचे बाहेरील पुढारी प्रचारासाठी तेथे येत. स्थानकावर त्यांचे प्रचंड स्वागत केले जाई, त्यांच्या मिरवणुका काढल्या जात, मेजवान्याही झडत आणि त्यांना पंजाबातील निरनिराळी प्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळेही दाखविली जात. अशा नाना प्रकारांनी त्यांचे स्वागत करून पंजाबी माणसे त्यांचेविषयी आदर व्यक्त करीत. असे असले तरी या पुढाऱ्यांच्या वक्तृत्वाचा मात्र त्यांच्यावर यत्किंचितही परिणाम न होता ते पूर्वीसारखे पंजाबीचे ' पंजाबी 'च रहात.

पंजाबी लोकांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवहार कधी-मधी धूळभेट देणाऱ्या या परप्रांतीय पुढाऱ्यास फार चमत्कारिक वाटत. स्वतः पंजाब्यांनाही या गोष्टीची जाणीव होती. अशा चमत्कृतीची उदाहरणेच द्यावयाची झाल्यास देता येतील. अत्यंत संपत्तिमान माणूस कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने भारलेला आढळेल, तर ज्यांचे फार मोठे भांडवल कारखान्यात अडकलेले आहे असा मनुष्य उद्योग-धंद्याच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रारंभ स्वतःच्या कारखान्यापासूनच करावा असा आग्रह धरणारा असेल. या गोष्टी फक्त पंजाबातच शक्य आहेत. अशा स्वभावाच्या लोकांवर देशातील कोणत्याही एका राजकीय पक्षाचा पगडा बसू शकला नाही यात आश्चर्य नाही. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षाची पंजाबात निराशाच झाली.

भारतातील इतर प्रांतात जातीय प्रश्नास फक्त दोनच बाजू असत. पण पंजाबात त्या तीन होत्या व असे असूनही एक चमत्कारिक तऱ्हेचा ऐक्यभावही तेथे वसत होता. हा प्रांत मुख्यत्वे करून मालक



**आमच्या उपासमारीचे कोडे उलगडले !**

शेतकऱ्यांचा आहे. असे असूनही दक्षिणेतील शेतीविहीनज्ज्ञ, अतज्ञ शहरवासी पुढाऱ्यांच्या प्रचारामुळे येथे शेतकीविषयक कोणतीही चळवळ रुजू शकली नाही. या प्रांतात हिंदू जमीनदाराची कुळे मुसलमान होती. तशीच मुसलमान जमीनदारांची कुळे हिंदूही असत. शीख जमीनदारांकडे सर्वच जमातींची कुळे असत.

जगातील आर्थिक व्यवहार कसेही चालोत अथवा अर्थशास्त्राचे नियम काहीही सांगोत, पण पंजाबी कुळे रोखठोक देऊन मोकळे होण्याऐवजी शेती निम्मानिम बटाईने करीत व स्वजातीय जमीनदारास आपल्या आप्ताप्रमाणे मानीत असा व्यवहार क्वचित नव्हे तर अनेक जिल्ह्यांतून पसरला होता.

या प्रांतात गामागुंगासारखे जसे अनेक पहिलवान आहेत, तसेच अनेक अंध गायकही आहेत. येथे असे अनेक व्यायामपटू व क्रीडापटू आहेत, की ज्यांनी आपल्या नैपुण्याने, परप्रांतीय निष्णात क्रीडापटूंना लाहोरच्या क्रीडांगणावर पराजित केले आहे. पण चमत्कार हा, की हेच लोक बाहेर गेले की नेमके पराभव घेऊनच यावयाचे. क्रीडाक्षेत्रात आंतरराष्ट्रीय उच्चांक मिळविलेला येथील माणूस आपले ते स्थान टिकवून धरण्याचा प्रयत्न करण्याऐवजी स्वतःला दुसऱ्या लग्नात गुरफटून घेण्यात धन्यता मानतो. असेही लोक येथे आहेत.

पंजाब्यांचा आहारही वैचित्र्यपूर्ण आहे. तो बोकड कोंबडे इ. मांसाहार जितक्या आवडीने खातो, तितकाच शाकाहारही त्याला आवडतो. सकाळी भरपूर खाऊन वर आकंठ लस्सी प्यावयाची व रात्रीच्या भोजनावर भरपूर दूध प्यावयाचे, असा त्याचा नित्यक्रम आहे. दक्षिणेतील एक काडीपहिलवान समाजवादी पुढारी एकदा एका पंजाब्याकडे पाहुणचारास आले असता, यजमानाचा आहार पाहून ते थक्कच झाले. ते म्हणाले, 'आमच्या उपासमारीचे कोडे आता मला उलगडले. देशातील अन्नाचा बहुतांश पंजाबीच खाऊन फस्त करीत आहेत.'

पंजाब्यांची राजकीय वागणूकही वैचित्र्यपूर्ण आहे. तेथील राजकीय पक्षात क्षुल्लक कारणावरून तीव्र मतभेद होत व लगेच तडजोडही होई. हा त्यांचा एक खेळच होता. अशा तडजोडीनंतर त्यांच्या परप्रांतीय श्रेष्ठींशी विचारविनिमय होई व पुन्हा मतभेदास प्रारंभ होई.

एखादा परप्रांतीय पुढारी जेव्हा या पंचनद देशास भेट देई, तेव्हा येथील लोकांच्या वरील प्रकारच्या चमत्कारिक, परस्पर विसंगत व स्वतःच्याच मताचे समर्थन व विरोध, हे सर्व पाहून दिङ्मूढ होई. असे सांगतात की, फाळणीपूर्वी सुमारे दोन वर्षे, श्री. जिना यांनी लाहोरला येऊन, त्यावेळचे पंजाबचे मुख्यमंत्री श्री. खिजरहयातखान यांना आपली मतप्रणाली पटविण्याचा प्रयत्न केला. पाकिस्ताननिर्मितीने पंजाबचे आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवन कसे प्रगत होईल हे श्री. खिजरहयातखान यांचे मनावर ठसविण्याकरिता श्री. जिनांनी दोन तास डोकेफोड केली. पण श्री. खिजरहयातखानांनी पंजाबीत शेवटी उत्तर दिले, 'मे को काई समझा नहीं है!' यावर जिनासाहेब ताडकन् उभे राहून तडक चालू लागले. काही वेळानंतर स्थानिक मुस्लिम पुढाऱ्यांशी बोलताना जिना म्हणाले, 'तुम्हा पंजाब्यांना काही कळत नाही.' त्यावर मामतोदचेखान उत्तरले, 'पंजाबी चामला आहेत.' त्यावर जिनासाहेब गुजराथीत म्हणाले, 'चामला सू छे.'

पंजाब हे असे होते.

## २ : फाळणीपूर्वीचे लाहोर

**१९१३** साली कोटात परिवेष्टित असलेली जुनी वस्ती, अनारकली व खालचा माळ या भागात इतस्ततः असलेली घरे, एव्हढीच काय ती लाहोर शहराची वस्ती होती. मुझांग, इच्छारा, नवानकोट, बाघबंदपुरा, बदामीबाग आणि शहादरा या उपनगरांची गणना त्याकाळी लाहोर शहरात होत नसे. १९१४ च्या महायुद्धानंतर लाहोरच्या वस्तीची वाढ झपाट्याने होऊ लागली. १९२९ ते १९३७ च्या जागतिक मंदीच्या काळात, घरे बांधण्याचे साहित्य व मजुरी खूप स्वस्त असल्यामुळे देशातील इतर शहराप्रमाणे याही शहरात या काळात जणू घरे बांधण्याची मोहिमच सुरू होती. उपनगरे व शहर यातील मोकळ्या जागा पार भरून गेल्या व त्या रूपनगर, प्रेमनगर, कृष्णनगर, संतनगर, जनकनगर, क्काईलछमनसिंग, कसूरपुरा, निसबत रोड या नावांनी आज प्रसिद्ध आहेत. ही वस्ती 'खालचा माळ' या भागाच्या पूर्व पश्चिमेस पसरली असून रावीपूल व नवाल कोट यांच्या शेवटापर्यंत गेली आहे. आणखी महत्वाची अशी नवी वस्ती न्यू मुझांग, शैद बुरुजी, आर्यनगर, मुस्लीम टाऊन, गार्डनटाऊन, मॉडेल टाऊन, कॅनॉल पार्क, वसंतपुरा, धर्मपुरा, मिश्रीशहा, वराजगड; ही वस्ती लोअर माळपासून सुरू होऊन अर्धवर्तुळाकार अशी जुन्या लाहोर शहरास मिळाली आहे. लाहोर शहराच्या या नव्या वाढीचे स्वरूप सामान्यतः जातीय होते. ही सर्व वस्ती बहुधा हिंदु शिखांची होती. तीत पाचरीसारखा, मुस्लिम टाऊन, वसंतपुरा, मिश्रीशहा, न्यू मुझांग, हा भाग बहुसंख्य मुस्लिम वस्तीचा होता.

१९३७ नंतर ही वाढ थंडावली व १९३९ च्या लढाईस प्रारंभ झाल्यावर तर ती थांबलीच. यावेळी जुने लाहोर, ही नवी वस्ती व कँटोंमेंट मिळून या सर्व वस्तीचे क्षेत्रफळ ३८-३९ चौ. मैल होते. त्या वेळी जर शिरगणती केली असती तर, बहुसंख्य नसली तरी

हिंदूंची संख्या समान निश्चित भरली असती. हे जाणून हे शहर मुस्लिम बहुसंख्य भरावे या इच्छेने, त्यावेळच्या युनिअनिस्ट सरकारच्या प्रेरणेने लाहोर शहराच्या आसपासची ५८ मैलाच्या व्यासातील खेडी नतर कॉर्पोरेशनमध्ये रूपातरित झालेल्या लाहोर म्युनिसिपालिटीत समाविष्ट केली गेली. वस्तुत या खेडचाना बऱ्यापैकी रस्ते नव्हते, वीज नव्हती, पाणी पुरवठा नव्हता व हा सर्व भाग पूर्णतया शेतजमिनीचा व शेतकऱ्याचा होता. ही सर्व परिस्थिती वास्तविक इतकी प्रतिकूल होती की पुढील पन्नास वर्षांतही या खेडचाचा लाहोर शहरात समावेश होणे शक्य नव्हते. पण लाहोर शहर हे मुख्यतः बहुसख्येमुळे मुस्लिम वर्चस्वाचे आहे, हे भासविण्याच्या एकमेव दृष्टिकोनाने हा घाट घालण्यात आला होता. कारण या खेडचाची वस्ती शेकडा ८६ मुसलमान होती व एकूण वस्ती लाहोर शहराच्या शे. १२ होती. हे शहर बहुसंख्येने कोणाचे आहे हे ठरविताना जर ही सख्या वगळली असती तर एरवी १९४१ च्या शिरगणतीत दाखविल्याप्रमाणे मुस्लिम सख्या शे. ६४ न भरता शेकडा ५३ च भरली असती

पंजाब सरकारने लाहोर शहराची आर्थिक पहाणी करण्यासाठी एक बोर्ड नेमले होते. त्या बोर्डाने जातवारीने घरमालकी, भाडचाचे सरासरी उत्पन्न, रहात्या घराची सख्या, त्याचप्रमाणे शहरातील निरनिराळचा भागाची जातवार वाटणी याची पहाणी केली. जेथे नागरिक प्रत्यक्ष रहात ती घरे व हॉटेल्स, दुकाने, कचेऱ्या व उद्योगधंद्याच्या जागा याची वेगवेगळी गणती केली होती. ह्या घरांची निरनिराळचा भागातील संख्या व त्याची किंमत खालील तक्त्यावर ओझरती नजर टाकताच कळून येण्यासारखी आहे. या पहाणीने हे निदर्शनास आले, की लाहोर कॉर्पोरेशनच्या हद्दीत मुस्लिमेतरांच्या रहात्या घराची किमत बारा कोटी, सत्तावीस लक्ष, चौसष्ट हजार आठशे रुपये होती. म्हणजे मुस्लिमेतर शेकडा ६० सपत्तीचे मालक होते. तर मुस्लिम शे. ४० सपत्तीचे मालक होते. वर सागितलेली खेडी यातून वगळली तर मुस्लिम सपत्तीचे प्रमाण आणखीही घटेल.

तक्ता खालीलप्रमाणे :


| | राहण्याची घरे | सरासरी मासिक भाडे उत्पन्न | एकूण भाडे उत्पन्न | मुस्लिमाच्या घरमालकीचे शेकडा प्रमाण | भाडचावर मिळालेली मिळकत मुस्लिम | मुस्लिमेतर |
|---|---|---|---|---|---|---|
| कोटाने परिवेष्टित वस्ती | १९,२६५ | ७।७।– | १,४३,००० | ५० | ७१,५०० | ७१,५०० |
| बाहेरील जुनी वस्ची | १७,२८७ | ८।८।– | १,४७,००० | ६५ ६ | ९६,४०० | ५०,५०० |
| बहुसख्य मुस्लिम वस्ती | १७,४४७ | १०।६।– | १,८१,००० | ५२.७ | ९५,६०० | ८५,४०० |
| सिव्हिल लाईन आणि हिंदुनगर | २,७७६ | ९०।३।– | २,५०,००० | २६·१ | ६५,३०० | १,८४,७०० |
| ग्रामीण भाग | १०,४१९ | ४।३।– | ४४,००० | ८७·२ | ३८,४०० | ५,६०० |
| लाहोर कँटोन्मेंट | ३,३८० | ८९।४।– | ३,०२,००० | २० | ६०,४०० | २,४१,६०० |
| | ७०,५७४ | | १०,६७,००० | ५८·७ | ४,२७,६०० | ७६,७२,८७० |
| वार्षिक भाडचाची किमत | | | १,२८,०४,००० | | ५१,३१,२०० | ७६,७२,८०० |

त्याचप्रमाणे या बोर्डाने दुकाने व व्यापारी पेढचाचीही जातवारीने माहिती गोळा केली तीवरून टेंपल रोड, फैजबाग, चगरमहेला, सर्क्युलर रोड, इछारा, फिरोजपूर रोड, फ्लेमिंग रोड, आणि दत्तागज या भागातच मुख्यत्वे करून मुस्लिम मालकीची दुकाने होती व या दुकानाची एकूण सख्या ७११ होती. त्यापैकी ४७० दुकानाचे मालक मुसलमान होते. म्हणजे शे. ६६ मालकी मुसलमानाची होती. अनारकली, रेल्वेरोड, निलागुंबद, मोहनलाल रोड, गणपत रोड, माळरोड, ब्रॅड्रथरोड, कुचरीरोड, निसवतरोड, हॉलरोड, बीडनरोड, मुलतानरोड, नौलाखा, शहादरा, मोगलपुरा, किलागुजरसिंग, कँटोनमेंट, ओल्ड अनारकली, गवालमडी, बागबानपुरा, बदामीपुरा, कृष्णनगर, हॉस्पिटल रोड, निकोलसन रोड व कोटाच्या आतील शहर, या भागातील दुकाने कितीतरी पट बहुसख्येने मुस्लिमेतराच्या मालकीची होती. या भागातील दुकानाची एकूण सख्या ४६२१ होती तीत मुस्लिमेतराची ३२६० व मुसलमानाची १३६१ म्हणजे शेकडा ७१ दुकाने मुस्लिमेतराच्या मालकीची होती. शहरातील एकूण दुकानाची सख्या ५३३२ होती. त्यापैकी ३५०१ दुकाने मुस्लिमेतराच्या मालकीची होती. म्हणजे शेकडा ६६ मुस्लिमेतराची तर शे. ३४ मुसलमानाची होती.

व्यापारी पेढचा व दुकाने यांची सख्या लक्षात घेता लाहोर शहर मुख्यत्वे करून मुस्लिमेतराच्याच मालकीचे होते हे उघड आहे. रहात्या घराच्या पहाणीवरून शे. ६० घरे त्यांचीच होती व दुकानेही शे ६६ त्याच्या मालकीची होती. अशा रीतीने दुकानाची व घराची मालकी मोठचा बहुसंख्येने एका जातीच्या मालकीची असताना हे शहर, कल्पनेस कितीही ताण दिला तरी दुसऱ्या जातीच्या मालकीचे होऊ शकणार नाही कोणत्याही शहराची मालकी ठरविताना तेथील बहुसख्य मालमत्ता कोणाच्या मालकीची आहे याचाच प्रामुख्याने विचार केला पाहिजे.

लाहोर शहर जरी मुबई व अहमदाबाद या शहरासारखे औद्योगिक शहर नसले, तरीही तेथे तीनशे रजिस्टर्ड कारखाने होते. या दृष्टीने पंजाब प्रातात हेच शहर पहिल्या श्रेणीचे होते. या शतकाच्या प्रारंभी कारखान्याची सख्या अगदीच थोडी होती. पण साधारणपणे गेल्या चाळीस वर्षात व विशेषतः गेल्या पधरा वर्षात कारखान्याची सख्या झपाटचाने वाढत गेली. यापैकी अर्धे कारखाने लोखडाचे व पोलादाचे होते. व इतर निम्म्यात होजिअरी, छापखाने, तेलघाण्या व रासायनिक इ. कारखाने होते. या सर्व कारखान्यापैकी शे. ९० कारखाने

पृष्ठ ४८ वर




# नरभक्षकांच्या जबड्यात

मूळ लेखिका
ओसा जॉन्सन

अनुवाद
रंगा मराठे

संक्षेप व पुनर्मुद्रण
किर्लोस्कर प्रेस प्रकाशन
यांच्या सौजन्याने

: १ :

१९१० सालची गोष्ट. एप्रिल महिन्यातील एका शनिवारची स्वच्छ आणि निरभ्र सध्याकाळ. मी त्यावेळी सोळा वर्षांची होते. आमच्या शाळेतील आम्ही काही मैत्रिणी हसत खिदळत 'रूफ गार्डन' नाटयगृहाजवळ येऊन पोचलो होतो. या नाटयगृहात आज एक कार्यक्रम आयोजित केला गेला होता. 'जॅक लडन यांच्या-बरोबर दक्षिण–समुद्रात जलपर्यटन' या विषयावर एका तरुणाचं भाषण होत. त्या भाषणाच्या आनुषगाने तो तरुण, प्रवासातील छायाचित्र व एक चलत् चित्रपट पडद्यावर दाखविणार होता.

मला या कार्यक्रमाच बिलकुल आकर्षण नव्हत. आम्ही साऱ्या मैत्रिणी तिथं आलो होतो त्या निराळ्याच कारणासाठी. आमच्या शाळेतील एक मैत्रिण–जिनं नुकतीच शाळा सोडली होती–या कार्य-क्रमाच्या वेळी गाणी म्हणणार होती तिच गाण ऐकायला आम्ही साऱ्याजणी 'रूफ गार्डन' नाटयगृहात आलो होतो. आमच्या त्या मैत्रिणीचं नाव होत गेल पेरिगो.

गेल माझी अत्यत जिवाभावाची मैत्रिण. शाळेतील चार वर्षं मी तिच्या सहवासात काढली. तिच्याशिवाय मला क्षणभरही चैन पडत नसे. आम्ही दोघी मिळून शाळेत जात होतो व एकाच बाकावर बसत होतो. दोघींचे कपडेही सारखेच असत. आम्ही दोघींनी एकाच मांडवात लग्न करायच ठरविलं होत. गेलचा आवाज गोड होता व ती गाणं शिकली होती एवढच नव्हे तर तिला नृत्याची कलाही अवगत होती. शाळा सोडून तिनं 'रूफ गार्डन' नाटयगृहात नोकरी पत्करली होती. नाटयगृहात पडद्यावर दाखविल्या जाणाऱ्या रगीत चित्राच्या (Slides) जोडीला तिच्या सगीताचा कार्यक्रम असे. दर शनिवारी शाळेतल्या मैत्रिणीबरोबर मी तिला नियमाने नाटयगृहावर भेटत असे. आम्हा दोघींना चित्रपटाचं विलक्षण वेड होतं. चित्रपटा-तील नायक किंवा नायिका एखाद्या दु:खद प्रसगात सापडली की आम्ही ओक्सावोक्शी रडायच्या; आम्हाला ते दु:ख आवरत नसे.

आम्ही सर्व मैत्रिणी नाटयगृहात जाऊन बसलो गेलला पाहायला आम्ही साऱ्याजणी अधीर झालो होतो. इतक्यात मलमलीचा पडदा वर गेला. गेलन रगमचावर प्रवेश केला. साऱ्या प्रेक्षकाना तिन अभिवादन केलं व गाण म्हणण्यास सुरुवात केली. गेलचं गाण सपल्यावर नाटयगृहाच्या चालकांनी पॅसिफिक महासागरात पर्यटन केलेल्या त्या तरुण प्रवाशाची ओळख करून दिली. त्याचं नाव होतं मार्टिन जॉन्सन. उच, सडपातळ असा तो तरुण रगमचावर आला. आपल्या कॉलरमध्ये बोट फिरवून त्यानं ती चाचपडून बघितली व भाषणास सुरुवात केली. आपल्या प्रवासाचे अनुभव सागताना त्यानं प्रोजेक्टरच्या साहाय्यान आपण प्रवासात घेतलेली रगीत छायाचित्रं पडद्यावर दाखविण्यास सुरुवात केली. 'स्नार्क' नावाच्या बोटीतून या तरुणान जॅक लडनबरोबर हजारो मैलांचा प्रवास केला होता. त्या वेळी घेतलेली निरनिराळ्या प्रसगाची स्थिरचित्र तो पडद्यावर दाखवू लागला. नरभक्षक क्रूर रानटी लोकाचे त्यानं अनेक फोटो काढले होते. त्यानंतर जीव धोक्यात घालून त्यानं अशाच रानटी लोकाच्या बेटात जाऊन चलत् चित्रपटही घेतला होता, तो त्यानं पडद्यावर दाखविण्यास सुरुवात केली.

मला या साऱ्या कार्यक्रमाचा अतिशय कटाळा आला. पडद्यावर दाखविल्या जाणाऱ्या चित्रपटातील रानटी माणसं अतिशय भेसूर आणि क्रूर होती. त्यांचे गलिच्छ, ओगळ आणि भयानक चेहरे पडद्यावर पाहात असताना माझ्या अगावर काटा उभा राहिला आणि भीतीनं माझ सारं अग शहारल! मी क्षणभर डोळे मिटून घेतले त्या रानटी लोकाचे विद्रूप चेहरे मला पाहवेनात. मला त्यावेळी एकदम आईस्क्रीम खाण्याची लहर आली. माझ्याबरोबर आलेल्या शाळेतल्या मैत्रिणीसुद्धा कटाळल्या होत्या. मी त्या सर्वजणीना ऐकू जाईल अशी एक साकेतिक शिट्टी मारली. क्षणभरातच तो कार्यक्रम चालू असतानाच आम्ही सर्व मुली नाटयगृहाच्या बाहेर पडलो

अमेरिकेतील कॅन्सास परगण्यामधील शॅन्यूट या छोटयाशा गावी १८९४ साली माझा जन्म झाला माझे वडील रेल्वेत ब्रेकमन होते. त्यावेळी त्याची प्राप्ती आठवडयाला फक्त सव्वा डॉलर होती मी चार वर्षांची असताना मला भाऊ झाला. सात वर्षांची झाल्यानतर मी शाळेत जाऊ लागले व या छोटयाशा गावातच मी लहानाची मोठी झाले. माझा स्वभाव लहानपणापासून भित्रा आणि बुजरा होता. मी बारा वर्षांची असताना माझी आणि गेलची मैत्री जमली. तेव्हापासून आम्हा दोघीच जीवन एकमेकींशी निगडीत झालं. मला गाणं म्हणायला तिनच शिकविल. शाळा सोडून ती गेली त्यावेळी मला फार वाईट वाटलं. दर शनिवारी मी तिला 'रूफ गार्डन' या नाटयगृहावर नियमितपणे भेटत असे.

त्यानतर आमच्या गावापासून काही मैल दूर असलेल्या 'इडि-पेंडन्स' गावातील 'स्नार्क' या नाट्यगृहात तिन गाणं म्हणण्याची नोकरी पत्करली होती हे नाटयगृह मार्टिन जॉन्सन याच्या मालकीच होत. जॅक लंडनबरोबर केलेल्या जलपर्यटनातील रानटी लोकाचा चलत् चित्रपट व स्थिरचित्र ते इथच दाखवीत असत व तो बघायला लोकांची गर्दी लोटत असे. गेलनं माझ्यापासून दूर जाऊन 'स्नार्क' नाटयगृहात गाणी म्हणण्याची नोकरी पत्करली हे मला कळल्यावर तिचा मला फार राग आला होता, मी भावनावश होऊन तिला म्हटलं होतं–

"तू अशी माझ्यापासून दूर गेलीस आणि मला कधीच भेटली नाहीस की माझं कस व्हायच? तुला आपल्या मैत्री व दृढप्रेमाची बिलकुल पर्वा नाही, असच मी समजेन."

पण गेलन 'स्नार्क' नाटयगृहात गाण म्हणण्याची नोकरी अखेर पत्करली होती. तिला नोकरी देणाऱ्या मार्टिन जॉन्सनचा व त्या नाटयगृहात ऑपरेटरची नोकरी करणाऱ्या तिच्या मित्राचा डिक हॅमिल्टनचा–मला हेवा वाटू लागला. डिक तिचा शाळेपासून मित्र होता. पण म्हणून काय झाल? मला असं एकाकी सोडून तिला जाववल कसं? म्हणूनच ती जेव्हा आमच्या गावी परत आली व 'रूफ गार्डन' मध्ये शनिवारी तिन आम्हाला बोलावल तेव्हा तिच्या-वरील दृढप्रेमामुळे मी त्या कार्यक्रमाला गेले, पण मार्टिनन जेव्हा पडद्यावर रानटी लोकाची चित्र दाखवायला सुरुवात केली तेव्हा त्याच्यावरील सताप व्यक्त करण्याकरिता मी आणि माझ्या साऱ्या मैत्रिणी थिएटरमधून कार्यक्रम चालू असतानाच बाहेर पडलो.

इडिपेन्डन्सला जाण्याच्या अगोदर गेल मला भेटली तेव्हा ती मला म्हणाली होती,

"तुझी आणि मार्टिनची मी ओळख करून देईन. खरोखरच तो फार चांगला आहे."

त्यानंतर एका रविवारी आम्ही दोघी चर्चमध्ये जात असताना रस्त्यात आम्हाला मार्टिन भेटला तेव्हा ती म्हणाली, "थांब, मी तुझी आणि मार्टिनची ओळख करून देते."

मी तिला म्हटलं, "अशा माणसाचं मी आयुष्यात कधीही तोंड-सुद्धा पाहणार नाही." आणि त्यावर ती काय म्हणते याची क्षण-भरही वाट न पाहता मी तिथून निघून गेले. ती दोघं मला मोठ-मोठ्यानं हाका मारत होती. पण मी मागे वळूनसुद्धा पाहिलं नाही. मला तिचा आणि मार्टिनचा भयंकर राग आला होता. माझं अंग थरथरत होतं आणि माझ्या कानात कोणीतरी–मोठ्यानं ओरडत होतं–

"त्याचं तोंडसुद्धा मी पाहणार नाही...पाहणार नाही!"

पण या गोष्टीला एक आठवडासुद्धा लोटला नव्हता तोच एक दिवस मी स्वयंपाक घरात आजीला मदत करीत असताना मला वडिलांची हाक ऐकू आली. ते आमच्या घराच्या मागच्या व्हरांड्यात वर्तमानपत्र वाचीत बसले होते. आई फुलझाडांना पाणी घालीत होती. आणि माझी आजी वडिलांच्या शेजारीच खुर्चीवर स्वेटर विणत बसली होती. वडिलांची पुन्हा हाक ऐकू आली व त्याबरोबर त्यांचे शब्द ऐकू आले–

"ओसा, तुझी मैत्रीण गेल पेरिगो हिचं इंडिपेन्डसमध्ये नुकतंच लग्न झाल्याची बातमी छापून आली आहे."

माझ्या पायांखालची जमीन सरकते आहे असा मला क्षणभर भास झाला. माझं शरीर कापू लागलं. मी धडपडत पंपाजवळ आले आणि ओरडून म्हणाले,

"ते कधीही शक्य होणार नाही. मला सांगितल्याशिवाय ती कधीही लग्न करणार नाही. तसं आमचं ठरलं आहे. आम्ही एक मेकींना तसं वचन दिलं आहे!"

"पण इथं वर्तमानपत्रात तर छापून आलं आहे की 'डिक हॅमिल्टन नावाच्या तरुणाशी तिचा विवाह झाला. विवाह-समारंभ कुठल्याशा नाटचगृहाच्या रंगमंचावरच पार पडला?"–कुठल्या बरं? 'स्नार्क' हं, हे पाहा–'त्यांच्याभोवती प्रेक्षकांचा गराडा पडला... सारे लोक स्टेजवर जाऊन त्यांचं अभिनंदन...'

मला पुढचं काही ऐकू आलं नाही. मी ओक्साबोक्शी रडू लागले. हे कसं झालं? आम्ही दोघींनी एकदम एकच मांडवात लग्न करायचं ठरवलं होतं. मग गेलनं माझा असा विश्वासघात का केला?


मला दुःख आवरेना. माझी आजी, आई आणि वडील माझी समजूत घालू लागले–

"अग चालायचंच. त्या दोघांचं एकमेकावर प्रेम होतं. त्यांचं चर्चमध्ये नेहमीच्या प्रघाताला धरून लग्न झालं असतं तर बरं झालं असतं. पण तसं काही वाईट झालं नाही...कसं?"

माझा राग पुन्हा उसळून वर आला. मी म्हटलं,

"गेलचं लग्न स्नार्क नाटचगृहात झालं म्हणजे हे सारं त्या मार्टिनचं कारस्थान असलं पाहिजे."

त्यानंतर तीन दिवस मी अतिशय अस्वस्थ होते. माझं कशानंच



**अनुवादक : श्री. रंगा मराठे**

थोडं लिहावे पण चांगले लिहावे अशी निष्ठा बाळगणारे श्री. रंगा मराठे यांच्या लेखनाचा पसारा मोठा नसला तरी चमकदार आहे. सुमारे चाळीस लघुकथा, पाश्चिमात्य चित्रपटक्षेत्रातील काही व्यक्ति-परिचय आणि काही चित्रपट परीक्षणे हे त्यांचे आतापर्यंतचे स्फुट लेखन. त्यानंतर आता त्यांनी काही घसघशीत लेखन केले आहे ते असे :

साहित्याबरोबरच अध्यात्माकडे त्यांचा कल असल्याने त्यांनी महात्मा गांधींच्या शिष्या मीराबेन (मॅडेलीन स्लेड) यांचे आत्मचरित्र 'एक चैतन्ययात्रा' या शीर्षकाने अनुवादित केले असून ते किर्लोस्कर प्रेसच्या 'स्त्री-सखी प्रकाशन' विभागातर्फे नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

'नरभक्षकांच्या जबड्यात!' या प्रस्तुत पुस्तकाचे स्वरूप वरीलपेक्षा अगदी वेगळे आहे. श्री. मार्टिन जॉन्सन आणि सौ. ओसा जॉन्सन या धाडसी अमेरिकन जोडप्याने स्वतःचे प्राण सतत धोक्यांत घालून सातासमुद्रापलीकडील रानटी आदिवासींचे जीवन आणि हिंस्र श्वापदांचे जीवन छायाचित्रित करण्याचा खटाटोप जन्मभर केला. त्यांच्या जीवनात भरलेले साहसनाटच श्री. रंगा मराठे यांनी येथे आपल्या वेधक शैलीने मराठीत आणले आहे.

समाधान होईना. कशातच लक्ष लागत नव्हतं. चौथ्या दिवशी मला गेलचं पत्र आलं तिनं मला सारी हकीकत विस्तृतपणे लिहिली होती व मला इंडिपेन्डन्स 'ला येण्याच आग्रहाच आमत्रण केल होत ती माझी शनिवार-रविवारच्या सुटीत वाट पाहणार होती

गेलच्या पत्रान पत्रान माझा राग पार विरघळून गेला. मी इंडिपेन्डसला जाऊन तिला भेटायच ठरविल पण माझ्या जाण्याला आजीन कडाडून विरोध केला. आईन तिची समजूत घातली आणि मी जायच ठरविलं. एकट्यान प्रवास करण्याचा माझ्या आयुष्यातील हा पहिलाच प्रसग. शॅन्यूटच्या स्टेशनावर मला आगगाडीत बसवून देण्यासाठी वडील स्टेशनावर आले होते. कोणत्याही अनोळखी माणसाशी बोलायच पण नाही अस त्यानी मला वारवार बजावून सागितल माझ्या आजीनेही प्रवासात कसं वागायच याच्या अनेक सूचना मला दिल्या आईन मला सूचना देऊन ठेवली की गणवेशात असलेल्या रेल्वे किंवा पोलीस अधिकाऱ्याशिवाय कुणालाही काहीही माहिती विचारायची नाही. रस्ता चुकला तर त्यानाच विचारायच. घावरून न जाता धीटपाणान वागायचा इशाराही तिन दिला

मी इडिपेंडन्स स्टेशनावर उतरले व रस्ता न चुकता स्नार्क नाटय-गृहापाशी आले. स्नार्क नावाची दोन नाटयगृह तिथ होती ' स्नार्क न १ ' आणि ' स्नार्क न २ ' अशी त्याची नाव होती. त्यापैकी मला गेलन पत्रात जो पत्ता दिला होता तो नं. २ नाटयगृहाचा होता. मी आत शिरले. तिथ तिकिटाच्या खिडकीमागे एक तरुण बसला होता. मी त्याला गेलचा पत्ता विचारला. तो तावडतोब बाहेर आला व त्यानं हसून विचारल—

" गेल हॅमिल्टनची तुम्ही मैत्रीण ना ? तुम्ही शॅन्यूटहून आलात ना ? इथून पलीकडे थोड्याच अतरावर तिचा राहण्याचा ब्लॉक आहे; चला—मी तुम्हाला दाखवितो. "

तो तरुण दुसरा तिसरा कोणी नसून मार्टिन जॉन्सनच होता, हे लक्षात आल्यावर माझी सूटकेस घेऊन मी त्या दिशेनं चालू लागले. तो माझ्या मागून चालत आला आणि मला म्हणाला.

" तुमची बॅग मला घेऊ द्या ना. "

पण मी ती त्याला घेऊ दिली नाही, किंवा त्याच्याकडे पहिलसुद्धा नाही. मी स्नार्क न. २ जवळ येऊन पोचले. त्याच इमारतीत वरच्या मजल्यावर गेल राहात होती. मी त्या इमारतीत शिरून वर गेले. मार्टिन माझ्या पाठोपाठ येत होता. मी गेलच्या बिऱ्हाडापाशी पोचले. मला पाहून ती धावतच बाहेर आली आणि मला कडकडून मिठी मारत म्हणाली,

" अरे वा ! तुमची दोघाची भेट झाली वाटतं ?"

मार्टिन काहीच बोलला नाही. पण मीच म्हणाले,

" मी अपरिचित माणसाशी कधीच बोलत नाही. " मला मार्टिनचा भयकर राग आला होता. तो मात्र उगाचच हसत होता. तो का हसतोय तेच मला कळेना. माझ्या डोक्यावरची तिरपी झालेली हॅट मी उगीचच सरळ केली

माझ्या गळयात हात टाकून गेल मार्टिनला म्हणाली,

" मार्टिन, ही माझी जीवश्चकठश्च मैत्रीण ओसा लेटी. " मग तिन माझी आणि तिच्या पतिराजाची — डिक हॅमिल्टनची ओळख करून दिली. आम्ही सर्वजण घरात गेलो. गेलन जेवणाची संपूर्ण तयारं अगोदरच करून ठेवली होती. विशष म्हणजे तिच्या लग्नाचा केक तिनं माझ्यासाठी आठवणीनं ठेवला होता. त्या केकचा एक लाबच लाब तुकडा गेलन माझ्यासाठी ठेवला होता. त्यावर विनोद करण्यासाठी डिक म्हणाला,

" ओसा, तुला झोपण्यासाठी गेलन केकाचा तुकडा ठेवला आहे. "

त्याच हे विनोदी बोलण ऐकून मार्टिनन माझ्याकडे पाहिल. मी पण त्याच वेळी त्याच्याकडे पाहिल त्याचे डोळे टपोरे पिंगट हिरवे होते. मी क्षणभर त्याच्या डोळ्याकडे पाहत राहिले त्याच तेज मला काही निराळच वाटल. . .

दुसऱ्या दिवशी मार्टिन आम्हाला सर्वांना जेवायला घेऊन गेला ते एक उत्तम व श्रीमती हॉटेल होत आमच्यासाठी त्यान मुद्दाम एक भाडलाची मोटर आणली होती. ज्या सहजतेन तो ती चालवीत होता त्यावरून मला त्याच विशेष कौतुक वाटल. आम्ही हॉटेलात जाऊन यथेच्छ जेवण घेतल हॉटेलमध्ये आलेले अनेक लोक मार्टिन-कडे वोट दाखवून ' एक धाडसी तरुण प्रवासी ' म्हणून एकमेकाना सागत होते, ते माझ्या नजरेतून सुटल नाही. जेवणानतर नृत्य सुरू झाल. गेल आणि डिक दोघ नृत्यात सामील झाली.

याच वेळी मला तीव्रतेन जाणीव झाली की मी एक अत्यत सामान्य आणि वावळट मुलगी आहे. मार्टिनन मला नृत्य करण्याची विनतीपण केली नाही, त्यामुळे मी त्याला मुळीच आवडली नसावे अशी माझी पक्की खात्री झाली. गेल आणि डिक नृत्य करून परत आल्यावर आम्ही दोघ नुसतेच बसून आहोत हे पाहून त्याना आश्चर्य वाटल.

त्यानतर आम्ही सर्वजण स्केटिंग करण्यासाठी बर्फाच्या मैदानावर गेलो. गेल आणि डिक दोघानाही स्केटिंग अतिशय सुदर येत होत. मार्टिन मात्र नुसता एका खुर्चीवर बसून राहिला. मला स्केटिंग चागल येत होत. आपल कौशल्य मार्टिनला दाखवाव म्हणून तिथ चाललेल्या बर्फावर स्केटिंग करण्याच्या शर्यतीत भाग घ्यायचं मी ठरविल. शर्यत सुरू झाली आणि मी त्यात हिरिरीन भाग घेतला. पण एके ठिकाणी वळण घेताना माझा किंचित् तोल गेला, आणि मी त्या वर्फाच्या घसरगुडीवरून कोलमडत दूर जाऊन कोसळले ! मी स्केटसह घसरून पडताना मला आजूबाजूच्या लोकाच ओरडणं ऐकू आल. गर्दीतून वाट काढत मार्टिन माझ्याकडे येऊ लागला. मी त्या बर्फाच्या घसरगुडीवरून कोलमडत प्रेक्षकासाठी ठेवलेल्या खुर्च्यांवर येऊन आदळले होते. पण काहीच झाल नाही असा अविर्भाव करीत मी अग झटकून तावडतोब उभी राहिले. तोपर्यंत मार्टिन माझ्या-जवळ आला आणि म्हणाला,

" तुम्हाला लागल नाही कुठ ?"

" काहीसुद्धा लागलं नाही मला वाटतं मी अजूनसुद्धा त्या शर्यं-तीत भाग घेऊ शकेन. "

पण माझ अग चागलच ठेचाळून निघालं होत. आम्ही सारीजणं मोटारीतून घरी परत येत असताना मार्टिन म्हणत होता की मला स्केटिंगच्या शर्यतीत पडल्यामुळे चांगलच लागलं असलं पाहिजे. नशीव की माझी हाड शावूत राहिली. मला त्याच्या त्या बोलण्याचा विलक्षण राग आला. आणि अपमानही वाटला. त्या क्षणी मोटारीतून उडी मारून पळून जाव अस वाटल. मी एक चकार शब्दसुद्धा

कुणाशीही बोलले नाही. मी घसरून पडले याचीच मला लाज वाटत होती. मी आणखी एक दिवस तिथ राहणार होते. पण माझा बेत मी एकदम बदलला. त्याच दिवशी मी शॅन्यूटला घरी परत जायचं ठरवलं व त्याप्रमाणे रात्रीच्या गाडीन निघून मी अिंडिपेंडन्समधला माझा मुक्काम हलवला... ◻

**[ या पहिल्या भेटीचे रूपांतर प्रेमात झाले. प्रेमाची परिणती विवाहात झाली. विवाहाच्या वेळी ओसाचे वय अवघे सोळा होते. ]**

## : २ :

लग्नानंतरचे पहिले सहा महिने मी नववधूच्या आनदात घालवले. मी आमचं घरकूल सजवलं. माझ्या आईन मला उत्तम स्वयपाक करायला शिकवल होत, त्यामुळे मी रोज निरनिराळे पदार्थ करून मार्टिनला वाढत होते. अनेक मित्रमैत्रिणीनी आम्हाला लग्नानिमित्त भेटी पाठविल्या होत्या त्या जो येईल त्याला दाखवण्यात माझा वेळ जाऊ लागला. आम्ही दोघ गावातून खरेदीसाठी किंवा इतर काही कारणासाठी हिंडू लागलो की लोक मार्टिनकडे बोट दाखवून अभिमानान काहीतरी सागत–जॅक लंडनच्या बरोबर जगप्रवास करून आलेल्या माझ्या पतीबद्दल मला त्यावेळी विलक्षण अभिमान वाटे.

मी आमच घर शृगारलं होत. शोभिवंत केल होतं. मी ससारात रममाण झाले होते. एके दिवशी मी, माझी आजी, आईवडील व भाऊ साऱ्यांना घरी जेवायला बोलावलं होतं त्यावेळी एक छोटसं घर हप्त्यान विकत घ्याव अशी कल्पना त्यानी बोलून दाखविली. मला ती कल्पना अतिशय आवडली. भाडयाच्या घरात राहण्यापेक्षा आपल स्वत.च्या मालकीच घर विकत घ्याव या कल्पनेन मी भारावून गेले. मी ज्यावेळी ती कल्पना मार्टिनला बोलून दाखविली त्यावेळी तो माझ्याकडे स्तिमित नेत्रानी पाहात राहिला व म्हणाला,

"पण मी त्यातला नाही."

"म्हणजे काय ?"

"म्हणजे घर विकत घ्यावं व एका जागी खिळून बसावं ही कल्पनाच मला सहन होत नाही."

"म्हणजे ?"

"म्हणजे मला घर नको."

"पण तुझे वडील–माझे वडील आपल्याला मदत करायला तयार आहेत. आपण त्याचे पैसे मग फेडून टाकू."

"ओसा, तू मला एका जागी पकडून ठेवायच्या आधी आपण दोघं बाहेर पडणार आहोत !"

"पण कुठे ?"

"जगाच्या प्रवासाला."

"कशासाठी ?"

"ओसा, तुझे वडील म्हणाले तेच बरोबर आहे. मी तुझ्याशी लग्न करायला नको होत."

मला एकदम भडभडून आल घर करायच–एका जागी राहायचं ही सर्वमान्य सुखाची कल्पना माझ्या मनात घर करून बसली होती, ती क्षणार्कात कोसळून पडली. माझं मार्टिनवर अतिशय प्रेम होत, त्या प्रेमापुढे कुठल्याच कल्पनाना थारा नव्हता. मी मार्टिनला म्हटलं,

"मी तुला आवडत नाही का ?"

"फार आवडतेस–म्हणून तर लग्न केलं तुझ्याशी."

"मग माझ ऐक. घर करायची कल्पना मी सोडून दिली. आपण खरच जगाच्या प्रवासाला जाऊ या दोघ"

"खर का हे ?"

"अगदी खरं !"

मग मात्र आम्ही दोघं प्रवासाच्या तयारीला लागलो. स्नार्क नाटयगृहाचे मालकी हक्क मार्टिनन विकून टाकायचे ठरविले. जगाच्या प्रवासाला निघायच म्हणजे खूप पैसा जमा करायला हवा होता. आम्ही घरातल्या साऱ्या चीजवस्तु, लग्नात मिळालेले आहेर, भेटी, फर्निचर सारं काही विकून टाकल पण तरीसुद्धा फारसे पैसे जमा झाले नाहीत. पण आता माघार घेण्याची तयारी नव्हती. कुठ जायच हे मार्टिनन अगोदरच ठरवल होत. मी त्याला विचारल–

"कुठे जायच हे ठरवल आहेस ना तू ?"

"दक्षिण समुद्रात काही बेट आहेत. तिथ नरभक्षक रानटी लोक राहतात. तिथ जायचं ठरविल आहे मी. पूर्वी जॅक लडनच्या बरोबर गेलो होतो, पण माझ्या मनातला हेतू अपुरा राहिला आहे."

"कसला ?"

"लक्षावधी वर्षं मानवी सस्कृतीपासून अलिप्त असलेले नरभक्षक रानटी लोक तिथल्या काही बेटावर राहतात. या बेटावर कुणी पाऊल ठेवायला पण धजत नाही. एवढच नव्हे, तर त्या बाजूला कुणी फिरकतसुद्धा नाही. अशा बेटावर जाऊन त्या रानटी नरभक्षकाच्या जीवनावर एक संपूर्ण फिल्म चित्रित करायची माझी महत्वाकाक्षा आहे."

माझ्या लक्षात आल की, सामान्यपणे सुखवस्तू स्थिर जीवन जगणाऱ्या माणसापेक्षा माझ्या नवऱ्याच्या आवडीनिवडी निराळया आहेत. नरभक्षकाच्या जबडयात उतरायच्या कल्पनेनं त्याला पछाडलेल आहे. त्या अग्निदिव्यात त्याला साथ करायचा मी मनात निश्चय केला. असामान्य धाडसी कल्पनेनं मत्रमुग्ध झालेल्या माझ्या पतीबद्दल मला विलक्षण आत्मीयता, अभिमान वाटू लागला. या साहसात–नरभक्षकांच्या जबडयात आपणही त्याच्यावरोबर उडी मारायची आणि येईल त्या सकटाला तोड द्यायच. जवळ असलेलं सारं काही विकून आम्ही पैसे जमा केले. नातेवाइकाचा निरोप घेतला आणि इंडिपेंडन्सला रामराम ठोकून प्रवासासाठी प्रस्थान ठेवलं.

अमेरिकेत गावोगाव हिंडून आमच्याजवळ असलेली स्थिर चित्र, चलत्चित्रपट व मार्टिनच 'जॅक लडनबरोबर दक्षिण समुद्रात पर्यटन' या विषयावरचं व्याख्यान–असे कार्यक्रम करून आणखी पैसा जमा करायचा बेत आम्ही नक्की केला. कॅनसास परगण्यातील 'हम्बोल्ट' या गावी आमचा पहिला मुक्काम पडला. आम्ही तिथलं एक थिएटर भाडयान घेतलं, स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली. आमच्या कार्यक्रमांची माहिती देणारी पत्रकं छापून ती गावात

वाटली. पण गावातील लोकानी फारच निराशाजनक प्रतिसाद दिला. थिएटर वरचेवर रिकामंच राहात होतं. अनेक जाहिरातीचा नि माहितीचा काहीच परिणाम लोकावर झाला नाही. जे थिएटर आम्ही भाड्यान घेतल होतं त्याचा मालक आम्हाला म्हणाला,

"मला वाटतं, तुम्ही दक्षिण समुद्रात जे धाडसी पर्यटन केलत त्याला आता वर्ष होऊन गेल. आता हा सारा मसाला जुना झाला आहे. यापूर्वीच आला असतात तर कदाचित थिएटर भरल असतं."

'हम्बोल्ट' गावी आमची अतिशय निराशा झाली. प्राप्ती काही न होता नुसताच खर्च होत होता. थिएटरच भाड, हॉटेलमध्ये राहण्याचा खर्च वाढत होता. मी मार्टिनला म्हटल,

"अशा तऱ्हेन आपल्याजवळ जे पैसे आहेत तेपण सपून जातील."

इंडिपेन्डन्सला परत जाव आणि वडिलाना त्याच्या दुकानाच्या कामात मदत करावी असे निराशाजनक विचार मार्टिनच्या मनात डोकावू लागले पण मग मी त्याला धीर देत म्हटल,

"आपण आता दुसऱ्या गावी जाऊ या."

"आपल्या या कार्यक्रमाला दुसरीकडे कुठे प्रतिसाद मिळेल अस तुला वाटत ?"

"मला वाटतं 'कोलो रॅडो'ला आपण जाऊ या."

कॅनसासला लागून असलेल्या कोलोरॅडो परगण्यातील 'रॉकी फोर्ड' हे गाव आम्ही नक्की केल व तिथ आमचे प्रयोग सुरू केले. या खेपेला एक सुधारणा आम्ही केली ती म्हणजे त्यावेळं लोकप्रिय असलेली हवायीयन नृत्य व सगीत मी शिकून घेतलं व मार्टिनच व्याख्यान, चलत् चित्रपट व स्लाईडस्च्या जोडीला माझा हवायीयन नृत्याचा आणि सगीताचा कार्यक्रमही होत असे. यामुळे आमचं उत्पन्न थोडस वाढलं पण अजूनही खर्च आणि जमा यात मेळ बसत नव्हता, खर्चाच पारड अजूनही जडच होते. फारच थोडे लोक आमचा खेळ बघायला येत असत. त्यामुळे आम्ही आमचा रॉकी फोर्डचा मुक्काम हलवला.

आम्ही डेन्वर या गावी आलो. हे रॉकी फोर्डपेक्षा थोडस मोठ, सुखवस्तू शहर होत. पण डेन्व्हरला सारं सामान घेऊन जाण्यात रेल्वेभाड्यानच आमच्या जवळची पुजी सपली. ते डिसेंबर महिन्याचे दिवस होते व नाताळचा सण सुरू झाला होता. पैसे संपल्यामुळे मार्टिनचे मनगटी घड्याळ आम्ही गहाण टाकून पाच डॉलर्स जमा केले. एक स्वस्तातली खोली भाड्यानं घेतली. ही खोली इतकी घाणेरडी होती की तिथ नाना तऱ्हेचे दुर्गंध येत होते. थंडीचा कडाका पडला होता. त्यातच मार्टिनला सपाटून ताप भरला. त्याला औषध आणायला म्हणून मी बाहेर पडले तर थडीन मीही अक्षरशः गारठून गेले. कपडे अपुरे पडत होते. त्यातच आमच्या खोलीत चोरी झाली. आमची उरली सुरली चार डॉलर्सची चिल्लर चोरानं नेली होती. त्या अनोळखी गावात भिकार गलिच्छ खोलीत राहणारे आम्ही निष्कांचन झालो !

घरी कळवून पैसे मागविण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. मार्टिननं वडिलाना कळवलं. त्यांनी तावडतोब पैसे पाठविले. आम्ही थिएटर भाड्यान घेऊन प्रयोग सुरू केले, पण फारशी प्राप्ती झाली नाही. पैसे जमा करून जगाच्या प्रवासाला जायची आमची स्वप्नं हवेत विरून जात होती. जिथं जावं तिथं निराशा पदरात पडत होती. हालअपेष्टा, प्रवास, दारिद्र्यच आमच्या वाट्याला येत होतं. मग एक दिवस वर्तमानपत्र वाचीत असताना मार्टिनच्या डोक्यात एक कल्पना विजेसारखी चमकून गेली. कोलोरॅडो परगण्यातील ब्लॅक हॉक या गावी जायच आम्ही नक्की केलं. या गावी सोन्याच्या खाणी होत्या. खाणीतील सर्व कामगार त्यावेळी संपावर होते. अशा कामगाराना रिकामपणचा वेळ घालवण्यासाठी आमचा कार्यक्रम नक्कीच आवडेल अशी मार्टिनला खात्री वाटत होती. शिवाय जॅक लंडनचे सोन्याच्या खाणीसबधी काही अनुभव मार्टिनने व्याख्यानात सांगायचं ठरविल.

मार्टिनचा होरा अगदी बरोबर ठरला. ब्लॅक हॉकला आमचे कार्यक्रम अतिशय यशस्वी होऊ लागले. सपावर असलेल्या कामगारानी थिएटरवर गर्दी केली. माझे हवायीयन नृत्य, सगीत, मार्टिनच भाषण, चलत्चित्रपट आणि नरभक्षकाच्या स्लाईड्स तिथल्या लोकांना फारच आवडल्या. गावात आमचा कार्यक्रम ज्यान पाहिला नाही असा एकही इसम उरला नाही तिकिटाचा दर आम्ही फक्त १० सेंट्स एवढाच ठेवला होता. आमचे प्रयोग सतत तीन आठवडे चालू होते. आम्ही ज्या हॉटेलमध्ये राहात होतो ते मात्र अगदी भिकार होतं. हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या जीवनाचा खरा अर्थ मला समजू लागला होता. ब्लॅक हॉकला येण्याची कल्पना मार्टिनची. ती अतिशय यशस्वी झाली होती. या आमच्या मुक्कामात सर्व खर्च जाऊन आमची शिल्लक पाचशे डॉलर्सपर्यंत पोचली होती. आता जगाच्या प्रवासाला जायच स्वप्नं सत्यसृष्टीत उतरणार अस वाटू लागल होतं.

आमचा लग्नाचा पहिला वाढदिवस १५ मे रोजी होता. त्यावेळी आमचा मुक्काम पश्चिम कॅनडात कॅलगेरी या गावाला होता. पण आता आमच्या शिलकीला गळती लागली होती. पाचशे डॉलर्स वरून आमची शिल्लक तीनशेवर आली होती.

लग्नाचा पहिला वाढदिवस आम्ही मजेत साजरा केला. माझ्यासाठी मार्टिनन एक सुदर हॅट विकत आणली. मला ती फारच सुदर दिसत असे. आम्ही त्या दिवशी एका अलिशान हॉटेलात जेवलो. त्याच दिवशी मार्टिनच्या डोक्यात एक कल्पना आली. आमच्या खेळाची जोरात प्रसिद्धी करायचं त्यान ठरविल. दुसऱ्या दिवशी गावात बॅंड वाजवून व मिरवणूक काढून आमच्या खेळाची आम्ही जाहिरात केली. गावातील रस्त्यातून या मिरवणुकीच्या मध्यभागी मी व मार्टिन एका गाडीतून साऱ्या लोकाना अभिवादन करीत हिंडलो, मी माझी सुदर हॅट घातली होती. आमच्या ह्या परेडचा फारच चागला उपयोग झाला. आमची शिल्लक तीनशेवरून पुन्हा पाचशे डॉलर्सवर आली.

त्यानतर आम्ही आमचे प्रयोग करीत प्रथम शिकागोला व त्यानतर न्यूयॉर्कला येऊन पोचलो. आता आमची शिल्लक एक हजार डॉलर्स झाली होती. जगाच्या प्रवासाला जायचं म्हणजे आम्हाला कमीतकमी चार हजार डॉलर्स लागणार होते. मार्टिनन बरीच खटपट करून आणखी तीन हजार डॉलर्सच कर्ज उभ केलं आणि आम्ही आता प्रदीर्घ साहसी प्रवासाचा बेत नक्की केला.

आम्ही घरी परत आलो. मार्टिनबरोबर मी पण नरभक्षकाच्या

बेटावर जाणार हे ऐकून माझ्या वडिलाचा सताप पुन्हा अनावर झाला. त्याच्या हाताच्या मुठी पुन्हा एकदा घट्ट आवळल्या गेल्या. ते रागावून मार्टिनला म्हणाले–

"तू माझ्या मुलीची काळजी घेणार होतास ती हीच का ? या कोवळया लहान वयाच्या मुलीला तू नरभक्षकाच्या जवडयात नेणार ? धन्य आहे तुझी !"–

मार्टिनच्या वडिलानापण माझी फारच काळजी वाटू लागली. अशा प्रवासात या मुलीच कसं होणार ? तिला त्या रानटी माणसांनी खाल्ल तर ? इतकी सुदर तरुण मुलगी त्याच्या तावडीत सापडली तर मग काय...? माझ्याकडे डोळे मिचकावीत मार्टिन म्हणाला–

"इतक्या गोड पोरीचं मास नरभक्षकाना फारच आवडेल."

पण मार्टिनची ही थट्टा कुणालाच आवडली नाही सारेजण माझीच काळजी करतात, मार्टिनबद्दल मात्र कुणालाच काही वाटत नाही, म्हणजे काय ? 'मला काय ओसाची काळजी वाटत नाही का ? मला तर तुमच्या सगळयापेक्षा तिची जास्त काळजी वाटते. मी तिला नरभक्षकांच्या तोडी द्यायला घेऊन चाललो आहे असं तुम्हाला वाटत की काय ?'–मार्टिनच्या मनातले हे विचार मला समजत होते. त्याचं माझ्यावर अतिशय प्रेम होत. खरोखरच फार फार प्रेम होते.

सर्वांचा निरोप घेऊन आम्ही दक्षिण समुद्रातील धाडसी प्रवासाला निघालो होतो. स्टेशनावर सारी मडळी आम्हाला निरोप द्यायला आली होती. भेटीदाखल सर्वांनी आम्हाला निरनिराळया वस्तू दिल्या होत्या. फ्रेडान मला लेस लावून विणलेले हातरुमाल व अत्तराची बाटली दिली. मिठाईचे पुडे, फळाच्या करंडयाचा ढीग–आमच्या सामानात जमा झाला होता. गेल व तिचा नवरा आम्हाला निरोप द्यायला स्टेशनवर आली होती. तिचा वर्षभराचा गोडस छोकरा तिच्या हातात होता. तिन खिडकीपाशी त्याला उचलून वर केलं. त्या गोंडस मुलाचा एक गोड पापा मी घेतला. गाडी हालली. निरोप द्यायला आलेली सारी आप्तेष्ट मंडळी नजरेआड झाली.

चार दिवसांच्या प्रवासानतर आम्ही सॅन फ्रॅन्सिस्कोला येऊन पोचलो. या प्रवासात मार्टिन सारखं जॅक लंडन व त्याच्या पत्नीबद्दल बोलत होता. दक्षिण समुद्रात त्यानं जॅकबरोबर 'स्नार्क' बोटीतून जो साहसी प्रवास केला होता त्याच्या अनेक आठवणी तो मला सागत होता. जॅकला व त्याच्या पत्नीला भेटण्याची उत्सुकता माझ्या मनात वाढत होती.

आम्ही सॅन फ्रॅन्सिस्कोला येऊन पोचताच थेट जॅक लडनच्या निवासस्थानी गेलो. त्याच्या बंगल्याचं नाव होतं 'व्हॅली ऑफ दि मून' (Valley of the Moon). प्रवासाला निघण्यापूर्वी तीन चार दिवस आम्ही त्यांच्या निवासस्थानी राहावं अशी त्यानी अगोदरपासूनच व्यवस्था करून ठेवली होती. आमचे ते चार दिवस फारच मजेत गेले. त्या प्रेमळ दापत्यानं आमची उत्तम बडदास्त ठेवली होती.

आम्ही त्यांचा निरोप घेऊन जायला निघालो तेव्हा त्या दोघांनी मला प्रेमान जवळ घेऊन माझं चुबन घेतल. जॅक मला म्हणाला,

"मार्टिनन जेव्हा मला कळविल की तो तुझ्याशी लग्न करणार तेव्हा मी फारच काळजीत पडलो होतो. तुझा फोटो त्यानं आम्हाला पाठवला होता. त्यावरून असं वाटल की एवढयाशा लहान मुलीशी हा लग्न करतो आहे. याच कस काय होणार ?...पण आता मात्र माझी खात्री झाली–समाधान झालं की मार्टिनला अगदी योग्य बायको मिळाली आहे !"

जॅक लंडन आणि त्याची पत्नी आम्हाला निरोप द्यायला बगल्याच्या फाटकापर्यंत आली. आमच्या दक्षिण समुद्राच्या धाडसी पर्यटनात त्यानी आम्हाला सुयश चिंतिलं व 'स्नार्केट' ही सज्ञा त्यानं मला बहाल केली. जॅक लडनने ज्या जहाजातून प्रवास केला होता ते 'स्नार्क' त्या काळात जगप्रसिद्ध झाल होतं. त्या जहाजाशी आज माझं नातं जोडलं गेल माझं मन अभिमानान उचबळून आलं. जॅकनं आठवण म्हणून मार्टिनला प्रवासात उपयोगी पडेल अशी एक उत्तम बदूक भेट दिली. त्या भेटीन आणि त्या प्रेमळ दांपत्याच्या सहवासान आमचा उत्साह द्विगुणित झाला. आम्ही दोघं दृष्टीआड होईपर्यंत ती दोघ त्यांच्या बगल्याच्या फाटकात उभं राहून आम्हाला अभिवादन करीत होती माझं मन त्याक्षणी आनदान, उत्साहान फुलून आल 'माय हिरो' या गाण्याचे सूर माझ्या मनाच्या गाभाऱ्यात घुमू लागले...

## : ३ :

सॅनफ्रॅन्सिस्कोहून सुटणाऱ्या 'सोनोमा' नावाच्या बोटीत आम्ही आमच्या सामानासकट येऊन दाखल झालो. बोटीचा कप्तान आमच्या दोघाकडे जातीनं लक्ष देत होता. पॅसिफिक महासागरात मार्ग कापीत आमची बोट 'होनोलुलु'; सॅमोआ', 'पॅगो-पॅगो' या बंदरात मुक्काम करून ऑस्ट्रेलियाच्या सिडनी बंदरात येऊन थावली. येथपर्यंत सागरी प्रवासाबद्दल मला आत्मविश्वास वाटू लागला होता. आमच्या पॅसिफिक महासागरातील प्रदीर्घ प्रवासाचा एक टप्पा संपला होता. ज्या 'सोनोमा' बोटीतून आम्ही प्रवास केला होता त्या बोटीचा आणि तिच्या कप्तानाचा आम्ही जड अंतःकरणाने निरोप घेतला. जाताना त्यान मार्टिनकडे प्रशस्तिपत्र दिलं,

"तुला बायको अगदी छान मिळाली आहे. अगदी योग्य तुझी खऱ्या अर्थानं ती सहचारिणी आहे." कप्तानाच्या त्या प्रशस्तिपत्रानं माझ हृदय भरून आल.

सिडनीला आम्हाला बरेच दिवस मुक्काम करावा लागला. तिथून 'सॉलोमन' बेटावर जाणारी बोट पकडायची होती. या नव्या बोटीवर आम्ही पदार्पण केलं आणि आमच्या प्रवासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. या प्रवासात आम्हाला कॅप्टन ट्रस्कची वारवार आठवण येत होती. सोनोमा बोटीतील स्वच्छता, टापटीप अजिबात नव्हती. राहण्याची सोयही चांगली नव्हती. बोटीवर जागोजाग झुरळं होती. इतकी की जाता-येता पायाखाली ती चिरडली जात. बोटीचा भटारखाना झुरळानी खच्चून भरलेला होता. आता या गोष्टीचीही प्रवासात सवय होणं आवश्यक होतं. एकदा रात्री मी कशानं तरी

खडबडून जागी झाले. माझ्या गालावरून काहीतरी सरकत होतं. मद प्रकाशात मला ते नीट दिसल नाही. पण मग माझ्या उशीवरून काहीतरी धूड सरकलं व धपकन खाली पडलं! तो एक गोड्या पाण्यातला मासा होता. मी दात-ओठ घट्ट आवळून धरले. मी एक किंकाळी फोडणार होते. इतक्यात माझ्या हाताची नख कुणीतरी कुरतडत आहे हे माझ्या लक्षात आलं. मी हाताची हालचाल केली तोपर्यंत माझ्या पाघरुणावरं काहीतरी पडल आणि तोपर्यंत अनेक माशानी माझ्या हातापायाची नख चावण्यास सुरुवात केली. मी भितीन इतकी घाबरून गेले की मी एक किंकाळी फोडली! तिचे पडसाद साऱ्या बोटीत उठले. माझी ती विकल अवस्था पाहून मार्टिनला हसू आल. त्यानं मला जवळ घेतल तेव्हा माझी भिती थोडी कमी झाली. थोड्या वेळान तो म्हणाला,

"इतकी घाबरलीस? अग हे काहीच नाही. आपण सॉलोमन बेटाजवळ पोचलो की तिथले मासे फारच भयकर आहेत. हे बिचारे अगदी गरीब आहेत. नुसती तुझी नखं कुरतडत होते. तिथले मासे फारच वाईट. बोटच खाऊन टाकतील!"

त्याच्या त्या बोलण्यान मी अधिकच घाबरून त्याच्या कुशीत शिरले तेव्हा तो म्हणाला,

"घाबरू नकोस. मी आहे ना तुझ्या बरोबर–"

या दक्षिण समुद्रातील प्रवासाचे पुढचे काही महिने निराशाजनक व काळजीचे गेले. एका बेटावरून दुसऱ्या बेटावर आमचा प्रवास सतत चालूच होता. या प्रवासात निरनिराळ्या प्रकारचे मासे, तसंच क्रूर रानटी जमातीपण आम्हाला पाहायला मिळाल्या. यातील काही लोक नरभक्षक होते. मार्टिनला याहीपेक्षा क्रूर आणि भयानक जगली लोकांच चित्रीकरण करायच होतं. यापेक्षा क्रूर जमात जगात कुठे असेल अशी मला कल्पनाही करवत नव्हती. कारण हे लोक इतके भेसूर आणि क्रूर होते की या दोन्ही बाबतीत त्यानी कळस गाठला होता. मार्टिनला ज्या लोकाचे चित्रीकरण करायचे होते ते आता किती भयानक असतील या कल्पनेनच माझा थरकाप उडत होता! मार्टिनच्या मते हे लोक रानटी असूनसुद्धा माणसाळलेले होते ज्या बेटावर आम्ही हिंडत होतो ती रानटी लोकाची बेट ब्रिटिशाच्या ताब्यात होती. मानवी सस्कृतीचा ज्याना हजारो वर्षं गंधसुद्धा नाही अशा क्रूर आणि रानटी श्वापदाप्रमाणे राहणाऱ्या टोळ्याचा अव्याहत शोध मार्टिन घेत होता. आमच्याजवळ त्यामानान पैसाही थोडा होता व जे चित्रीकरण करायच त्याकरिता लागणाऱ्या फिल्मचा साठाही फारसा मोठा नव्हता.

शेवटी मार्टिनला जे हव होत ते सापडल! दक्षिण समुद्रात 'न्यू हेब्रिडीज' नावानं ओळखली जाणारी जी अनेक बेटं होती त्यात 'मालेक्युला' नावाच एक मोठ बेट होत. या बेटावर मालकी हक्क ब्रिटिशाचा की फ्रेंचांचा हा एक वादग्रस्त मुद्दा होता. त्यामुळे या बेटावर गस्त घालण्याच्या किंवा पहारा करण्याच्या कामात कुणीच नीटसं लक्ष देत नव्हतं. मालेक्युला बेटावर राहणारे जगली लोक क्रूर व नरभक्षक असून मानवी सस्कृतीचा हजारो वर्षं त्याना गधही नव्हता. या बेटावर गोऱ्या माणसानं अजून पायही ठेवला नव्हता इथली जमात, रानटी श्वापद, रानडुकर किंवा मिळेल त्या माणसाला मारून त्याच मास खाऊन जगत होती. डोळ्याचं पात लवत न लवत तोच शिरच्छेद करण्यात ही जमात तरबेज होती. आम्हाला हवी असलेली सारी माहिती गोळा करून मार्टिन आणि मी सिडनीला परत आलो.

सिडनीला आल्यानतर मार्टिनन 'न्यू हेब्रिडीज' बेटाकडे जाणाऱ्या बोटीचा तपास केला तेव्हा त्याला असं कळलं की एक छोटी बोट न्यू हेब्रिडीज बेटावरून पुढे जाणार आहे आम्ही या बोटीत येऊन दाखल झालो.

आमच्या प्रवासाचा उद्देश जेव्हा कप्तानाला कळला तेव्हा त्यान व बोटीवरील अनेक लोकानी आमच्या या साहसी योजनेला कडाडून विरोध केला. बोटीचा कप्तान आमच्याजवळ आला व मार्टिनला म्हणाला,

"हे पाहा, तुझ्या तरुण पत्नीला घाबरविण्याची माझी इच्छा नाही, परतु मालेक्युला हे बेट फार भयकर आहे. तिथ वसाहत करणारी संपूर्ण जमात क्रूर, भेसूर आणि नरभक्षक आहे!"

कप्तानाच ते बोलणं ऐकून मार्टिनला मनातून अतिशय आनद झाला. गेली कित्येक वर्ष तो ज्या सधीची वाट पाहात होता ती सधी आता चालून आली होती कप्तानाच व मार्टिनच बोलण ऐकत असलेला खलनायकसारखा दिसणारा एक 'नीग्रो' मनुष्य मार्टिनकडे पाहून म्हणाला,

"कुणी मला हजार पौंड दिले तरीसुद्धा माझ्याजवळ लढावू जहाज असल्याशिवाय मी मालेक्युला बेटावर जाण्याच धाडस करणार नाही. कारण तिथ राहणाऱ्या रानटी नरभक्षक जमातीची सुमारे चाळीस हजार वस्ती आहे या लोकानी आपल्या निरनिराळ्या टोळ्या केल्या आहेत आणि या टोळ्याच्या प्रमुखाचा अधिपती-ज्याला सर्वजण देव मानतात तो एक फारच भयकर प्राणी आहे. त्याच नाव नागापाते."

त्या नीग्रो माणसाला मध्येच थाबवून मी विचारल,

"पण आम्ही तर त्याचे फोटो घेणार आहोत. मग आम्हाला ते कशाला त्रास देतील?"

माझ्यावर उसळून कप्तान म्हणाला,

"काय? त्याचे फोटो घ्यायचे? मग निकालच लागला! तुम्ही दोघ त्याचे फोटो घ्यायला त्याच्या जवळ जाल तेव्हा तुम्हाला एकमेकाचा आणि जगाचा अखेरचा निरोप घ्यावा लागेल."

कप्तानाच्या आणि इतराच्या बोलण्यावरून आमच्या लक्षात आल की 'मालेक्युला' बेटातील रानटी लोक म्हणजे सैतानापेक्षाही भयकर असावेत! कप्तानान आम्हाला बजावून सागितल की,

"मी माझ्या बोटीचा मार्ग यत्किंचितही बदलणार नाही, किंवा मालेक्यूला बेटाच्या आसपासही मी फिरकणार नाही! तिथ जाण म्हणजे नरभक्षकाच्या जबड्यात उतरण्यासारख आहे. तुम्हाला दोघाना त्या बाजूला सोडून मी माझ्या माथी पाप घेणार नाही."

कप्तानाच्या या बोलण्यामुळे मी अगदी निराश झाले! मार्टिनच्याकडे पाहण्याच धैर्यही त्यावेळी मला झाल नाही. मी त्याच्याबरोबर असल्यामुळे त्याच्या मर्गात अडथळे येत होते.

आमची बोट आता मालेक्युला बेटापासून सुमारे पच्याहत्तर मैलावर आली होती. आत्तापर्यंत प्रवासात मार्टिनन मालेक्युला बेटा-

बद्दल बरीच माहिती गोळा केली होती. त्या बेटावर रानटी लोकांच्या दोन टोळ्या होत्या. एक छोटी व दुसरी मोठी. हे लोक धिप्पाड, काळेकभिन्न होते. कमरेभोवती वल्कल, बाकी सारा देह उघडा. जवळजवळ नग्न अवस्थेतच हे लोक वावरत होते. मालेक्युला बेटापासून जवळच 'व्हाओ' नावाचं आणखी एक बेट होतं. त्या छोट्या बेटावर आम्हाला सोडायचं कप्तानानं अखेर मोठ्या मिनतवारीनं कबूल केलं. ती कल्पना पण मार्टिनला पसंत पडली. व्हाओ हे बेट ब्रिटिशांच्या ताब्यात होतं. कप्तानानं आम्हाला सांगितलं की या बेटावरचे लोकही फार क्रूर आहेत. तरीपण त्यांचं चित्रीकरण करणं जरी धोक्याचं असलं तरी करायला हरकत नाही. या लोकांमध्ये अजूनसुद्धा म्हाताऱ्या माणसांना जिवंत पुरायची व रानरेडे खाण्याची प्रथा आहे. त्या बेटावर फादर प्रिन नावाचे एक फ्रेंच धर्मोपदेशक राहात होते. त्यांना भेटायचा कप्तानानं आम्हाला सल्ला दिला तो फारच मोलाचा होता !

आम्ही दोघं व्हाओ बंदरात उतरलो तेव्हा बोटीचा कप्तान आमच्याकडे संशयास्पद नजरेनं पाहात होता. येवढं वर्णन करूनही आम्ही व्हाओला उतरून नंतर मालेक्युलाला जाणार याबद्दल त्याला खात्री वाटत होती. आमच्या भवितव्याविषयी साशंक मुद्रा करीत त्यानं आमचा निरोप घेतला.

व्हाओ बेटावर उतरल्यावर फादर प्रिनंनं आमचं हार्दिक स्वागत केलं. आमच्याबद्दल त्यांच्या मनात विलक्षण कुतूहल जागं झालं. या छोट्याशा बेटावर गेली तीस वर्षं ते धर्मोपदेशकाचं काम करीत असून या काळात चारशे लोकांपैकी फक्त सतरा लोकांनीच ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. फादर प्रिनच्या चिकाटीबद्दल व धर्मावरील प्रेमाबद्दल आमच्या मनात नितान्त आदर उत्पन्न झाला. मातीच्या भिंती असलेलं व गवतानं शाकारलेलं चर्च त्यांनी तिथं बांधलं होतं आणि त्याला लागूनच तीन खोल्यांमध्ये ते स्वतः राहात असत.

आम्ही तिथंच मुक्काम केला व पुढील बेत आखायला सुरुवात केली.

मालेक्युला बेटाबद्दल जे काही आम्ही ऐकलं होतं. ते सारं खरं आहे अशी फादर प्रिननी ग्वाही दिली. आमच्या तिथं जाण्याबद्दलच्या धाडसी बेताबद्दल त्यांनी अतिशय चिंता व्यक्त केली, आणि सांगितलं की – मालेक्युलासारखे क्रूर आणि भयानक प्रकार अजून या व्हाओ बेटावरही चालतात. मग मालेक्युलाचं काय ? त्या बेटावर कुणी पाऊल ठेवायला पण धजत नाही हे सारं ऐकल्यावर मार्टिनला माझी काळजी वाटू लागली आम्ही व्हाओ बेटात पोचलो ती वेळ सकाळची होती. सारा दिवस आम्ही फादर प्रिनशी चर्चा करण्यात व पुढचे बेत आखण्यात घालवला

संध्याकाळ झाली आणि आजूबाजूच्या जंगलातून नगाऱ्यावर काढलेला आवाज आम्हाला ऐकू येऊ लागला. हळूहळू तो आवाज वाढू लागला. त्या आवाजात अंगावर काटा उभा करणारी भयानकता होती. त्यातूनच 'बू ऽऽ–बूःऽऽ' असा ध्वनी ऐकू येऊ लागला.

हे भेसूर संगीत बराच वेळ चालू होतं. ते सपायच्या सुमारास आम्ही फादर प्रिनच्या झोपडीच्या खिडकीतून जेव्हा बाहेर डोकावून पाहू लागलो तेव्हा असंख्य भेसूर माणसांच्या नजरा धारदार शस्त्रांच्या टोकाप्रमाणे आमच्यावर रोखलेल्या गेल्या होत्या, असं आम्हाला आढळलं ! काळाकभिन्न, क्रूर आणि हिडीस दिसणाऱ्या त्या रानटी प्राण्यांना मानव म्हणावं की नाही याबद्दल माझं मन साशंक झालं.

मी हलक्या आवाजात फादर प्रिनना विचारलं,

"त्या लोकांनी ते नाकात काय घातलं आहे ?"

त्यावर फादर प्रिननी जे उत्तर दिलं ते ऐकून मला अक्षरशः कापरंच भरलं ! त्या रानटी लोकांनी माणसाची हाडं अलंकार म्हणून नाकात आरपार बसवली होती ! मार्टिननं मला खिडकीपासून दूर ओढलं आणि तो मला म्हणाला–

"तुला मालेक्युलाला नेणं मला अत्यंत धोक्याचं वाटतं. तू इथंच फादर प्रिन यांच्या झोपडीत राहिलीस तर फार बरं होईल. मला तुझी काळजी वाटणार नाही. ओसा माझं ऐक. मी एकटाच मालेक्युलाला जाऊन येतो."

मार्टिनच्या त्या बोलण्याचा मला विलक्षण राग आला. त्यानं एकट्यानं धोका पत्करावा या कल्पनेनं माझं अंग थरथरू लागलं. मी त्याला म्हटलं,

"तू जाणार असशील तर तुझ्याबरोबर मी पण तिथं येणार. यात बदल होणार नाही जिथं तू तिथं मी. ह्यासाठीच तर तुझ्याबरोबर ह्या धाडसी प्रवासाला मी निघाले आहे"

मालेक्युलाला जाण्याचा आमच्या दोघांचा निश्चय कायम आहे हे पाहून फादर प्रिननी आम्हाला जेवढी मदत करता येईल तेवढी सारी मदत केली. त्यांनी अठ्ठावीस फूट लांबीची देव-माशाच्या आकाराची एक बोट आम्हाला दिली. व्हाओ बेटावरची पाच विश्वासू मुलं त्यांनी आमच्या मदतीला दिली.

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या अगोदर आमचा कॅमेरा, फिल्म व तिथल्या रानटी लोकांना देण्यासाठी तबाखू, उंची कापड, औषध असं सारं साहित्य फादर प्रिननी दिलेल्या पडावात घालून मालेक्युलाच्या दिशेने आम्ही निघालो.

व्हाओच्या किनाऱ्यावर उभं राहून सचिंत मुद्रेनं फादर प्रिन आम्हाला आशीर्वाद देत होते. माझ्या मनात गोठलेली भीती त्यांच्या त्या शुचिर्भूत व प्रेमळ नजरेनं पार वितळून गेली. मालेक्युला बेट व आम्ही यामधलं अंतर हळूहळू कमी होत होतं. थोड्याच वेळात फादर प्रिनची शुभ्र शुचिर्भूत मूर्ती अस्पष्ट होऊन दिसेनाशी झाली...

## : ४ :

फादर प्रिननं दिलेल्या सूचनेप्रमाणे आमची बोट मालेक्युलाच्या दिशेनं पाणी कापीत मार्ग आक्रमू लागली. थोड्याच वेळात किनाऱ्याच्या बाजूनं जात असताना बेटावरील झुडपं आमच्या नजरेस पडत होती. त्यातून एखादा रानटी माणूस दृष्टीस पडे न पडे तोच झुडपात तो अदृश्य होई. या त्यांच्या वागण्यामुळे हे लोक भित्रे असावेत अशी आमची समजूत झाली व त्यामुळे त्यांच्याबद्दल आम्हाला वाटणारी भीती थोडी कमी झाली. आणखी काही वेळानं आम्ही मालेक्युला बेटावरील पिवळसर वाळूच्या एका निर्जन पट्ट्याजवळ येऊन पोचलो. सूर्यप्रकाशात ही वाळू चमकत होती व चकाक-

णारा हा वाळूचा पट्टा बेटावरच्या दाट झाडीमध्ये अदृश्य झाला होता. आम्ही किनाऱ्यावर उतरलो आमच्याबरोबर आलेल्या मुलानी आमच सामान बाहेर काढल चलत्चित्रणाचा कॅमेरा मात्र मार्टिनन स्वत:जवळ ठेवला होता. वाळूच्या त्या पिवळ्या पट्ट्यावर उतरल्यावर आम्ही त्या बेटाकडे पाहू लागलो. बेटावर चोहीकडे घनदाट अरण्य पसरलं होत. त्या घनदाट अरण्यात चमचमत अदृश्य होणाऱ्या पिवळ्या वाळूच्या पट्ट्याखेरीज काहीच दिसत नव्हतं. बेटावर सार काही शात होतं. पण त्या शाततेमागची भयानकता स्मशानावत् वाटत होती.

इतक्यात अचानकपणे डोळ्याच पात लवत न लवत तोच त्या घनदाट अरण्यातून एक कोळशासारखा काळाकभिन्न रानटी इसम आमच्यासमोर येऊन उभा राहिला. त्याला पाहताच आमच्याबरोबर आलेली मुल भीतीनं चार पावलं मागे सरकली. तो रानटी माणूस अत्यत गलीच्छ आणि भेसूर दिसत होता. इतका भयकर मानव आयुष्यात प्रथमच पाहात होते. त्याचे केस राठ असून चेहरा तेलकट होता. त्यान दाढी लाब वाढवली होती, ती त्यांच्या छातीवर लोबत होती ती दाढी इतकी गलीच्छ होती की त्यात किड्या कीटकानी घरटी केली होती. मानवी हाडाचा अलकार त्यान नाकात आरपार घातला होता व डुकराच्या दाताची माळ त्याने गळ्यात घातली होती. झाडाच्या वाळलेल्या सालीचं आवरण त्यान जेमतेम कमरेभोवती गुडाळल होत.

तो रानटी मानव आमच्या जवळ आला व तोडातल्या तोडात काहीतरी उच्चार करून आम्हाला काहीतरी सांगू लागला. त्याच्या त्या बडबडण्याचा आम्हाला काहीच अर्थबोध होईना पण त्याच्या चेहऱ्यावरून त्याला वेदना होत असाव्या अस वाटत होत. तो आमच्याजवळ येऊ लागल्याबरोबर मी मार्टिनच्या जवळ सरकले. तो आपल्या पोटावर हात मारून आम्हाला मोडक्या तोडक्या शब्दात सागू लागला तेव्हा समजलं की त्याच पोट विलक्षण दुखत होत. मी मार्टिनकड पाहिल आम्ही अखेर मालेक्युला बेटात येऊन पोचलो होतो. ज्या जगली नरभक्षक जमातीबद्दल आम्हाला अनेक धोक्याच्या सूचना दिल्या गेल्या होत्या त्या बेटावर आल्यानतर पोटशूळ उठलेल्या एका रानटी माणसाची आणि आमची सर्वप्रथम भेट व्हावी हा विलक्षण योगायोगच होता. वारवार पोटावर हात मारून तो आमच्याजवळ पोट दुखीवर काहीतरी औषध मागत होता

आम्हाला त्याच्या त्या अविर्भावामुळे हसू आवरेना. मी आमची औषधाची पेटी उघडली व त्यातल्या काही गोळ्या बाहेर काढल्या. मार्टिनन त्या रानटी माणसाला समजावून सागितल की एक गोळी सकाळी व एक सध्याकाळी घ्यायची. हे सार मार्टिनन आविर्भाव करून त्याला समजावून सागितलं. तो भेसूर प्राणी मार्टिनच बोलण लक्षपूर्वक ऐकत होता व मग त्यानं आपला गलिच्छ, लाळेने भरलेला जबडा उघडून आम्ही दिलेल्या साऱ्या गोळ्या एकदम घशात घातल्या !

हा सारा विनोदी प्रकार चालू असता आजूबाजूच्या घनदाट झाडीतून अनेक रानटी इसम बाहेर आले व त्यानी आम्हाला वेढा दिला ! ते सारेच एकापेक्षा एक भेसूर आणि भयानक होते. नुसत त्याच्याकडे पाहिलं तर ते इतके क्रूर असतील अशी कल्पना येत नव्हती. मार्टिनन आपला कॅमेरा सरसावला व फिल्म घेण्यास सुरुवात केली. त्यानी त्या कॅमेऱ्याकडे एकदा संशयित नजरेनं दृष्टीक्षेप टाकला व त्यात काहीच धोका नाही असं त्यांच्या लक्षात आल्यावर मार्टिनच्या कामात त्यानी व्यत्यय आणला नाही.-तरीपण त्या सर्वांची अचानकपणे वटवट सुरू झाली. त्याचा अर्थ माझ्या लक्षात आला नाही, पण मार्टिनला मात्र ते समजल की त्या रानटी लोकाचा प्रमुख हे सर्व पाहात असून तो आजूबाजूच्या झाडीत लपून राहिला आहे त्या रानटी लोकाच्या प्रमुखाचे फोटो घेण्याची प्रबळ इच्छा मार्टिनच्या मनात उत्पन्न झाली या बेटात आल्यावर रानटी प्रमुखाची फिल्म घेतल्यान या बेटात आल्यासारखं एक महत्त्वाच काम पदरात पडणार होत. पण प्रकार झाला तो निराळाच—आपला प्रमुख आजूबाजूच्या झाडीमध्ये आला आहे हे समजताच आमच्या भोवती जमलेल्या रानटी लोकानी पलायन केल !...

मी सामानाच्या पिशव्या उचलून मार्टिनला म्हणाले, " या पायवाटेने मी पुढे जाते. "

—अस म्हणून मी जगलातली वाट चालू लागले. मार्टिन ओरडून म्हणाला,

" ओसा, थाब ! तू पुढे जाऊ नकोस. आता आपण दोघानी या जगलात शिरणं धोक्याच आहे. तुझा जीव धोक्यात घालावा अस मला वाटत नाही. आता आपण दोघही परत जाऊ या. उद्या मी फोटो काढायला एकटाच इथं परत येईन. "

मार्टिनच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत मी त्या पायवाटेन चालत राहिले आहे, अस पाहून मार्टिन म्हणाला,


" थाब—मी तुझ्याबरोबरच येतो. "

आमच्याबरोबर व्हाओ बेटाकडून आलेल्या त्या जगली मुलांनी—आमच सामान उचलल. आम्ही सर्वजण मालेक्युलाच्या त्या भयानक जगलात शिरलो आणि त्या पाऊल वाटेनं पुढे सरकू लागलो आजूबाजूच्या घनदाट झाडीमुळे त्या जंगलात सगळीकडे काळोख पसरला होता. आम्हाला पायाखालची वाटही दिसत नव्हती. चिखल, खाचखळगे यामुळे पावलं सारखी घसरत होती. चिखलान भरलं पाऊल उचलून पुढे टाकाव तो ते अधिक खोलवर रुतत होत. त्या चिखलाची आणि कुजलेल्या पदार्थांची घाण त्या कुबट अंधारात भरून राहिली होती

ती काळोखी पायवाट सपून आता चढणीचा मार्ग सुरू झाला. आजूबाजूला काटेरी झुडप व बाबूच घनदाट अरण्य पसरल होत. ही चढण अतिशय कठीण होती. एखाद्या सुळक्यासारखी ती आम्हाला वाटली ती कठीण वाट कधी सपेल अस झाल ! आम्ही थकून गेलो. घामान सारे कपडे भिजून गेले. मला त्या श्रमांनी इतकी जोराची धाप लागली की धारदार सुरीसारखा माझा श्वासोच्छ्वास होऊ लागला. मार्टिन मला मधूनमधून विचारीत होता,

" ओसा, दमलीस का ? " पण त्याचा श्वासोच्छ्वासही इतक्या जोरानं होत होता की एखाद्या भात्यासारखा त्याचा आवाज येत होता. मी त्याला खूण करून सांगत होते की माझी काळजी तू करू नकोस. बोलण्याची ताकदच माझ्यात राहिली नव्हती.

आता ती चढण सपून आम्ही सारेजण त्या टेकाडाच्या पठारावर आलो होतो. मागे वळून पाहिल तेव्हा पिवळ्या वाळूच्या पट्ट्याजवळ असलेली किनाऱ्यावरची आमची बोट एखाद्या ठिपक्यासारखी



त्याची नजर एखाद्या खुनी खंजीराच्या पात्यासारखी भेदक आणि धारदार होती.
हाच तो रानटी लोकांचा राजा नागापाते असावा असा मी तर्क केला....

दिसत होती. आम्ही ती चढण चढून निदान एक हजार फुटांवर आलो होतो.

मार्टिननं मला जवळ ओढून घेतलं आणि म्हटलं,

" तुझी कमाल आहे ! हा चढणीचा रस्ता फारच अवघड होता. मार्टिनच्या त्या स्पर्शानं मला अतिशय बरं वाटलं. माझे सारं श्रम नाहीसे झाले. दूरवर कुठून तरी झुडपांतून धूर येत होता. मी चेष्टेनं म्हटलं,

" शत्रूचं मांस शिजवून नरभक्षकांची जेवणाची तयारी सुरू झालेली दिसते ! "

आणि अचानकपणे कसला तरी भयंकर स्फोटक असा आवाज झाला. आणि त्याचे पडसाद त्या जंगलात उठले. आम्ही दोघांनी मागे वळून पाहिलं. रानटी लोकांचा एक प्रचंड थवा आमच्या मागून येत होता. त्यांच्या हातात शस्त्रास्त्रं आणि बंदुका होत्या. ते दृश्य पाहून मार्टिन एकदम गंभीर झाला. त्याच्या चेहऱ्याच्या शिरा ताठ झाल्या. तो मला हलक्या आवाजात म्हणाला,

" ओसा, तू घाबरली आहेस असं त्यांना वाटता कामा नये. तुझ्या हातातलं सामान खाली ठेवून तू शांतपणे उभी राहा. तोपर्यंत मी त्यांचं लक्ष माझ्याकडे वेधून त्यांची फिल्म घेतो. "

मी मागे वळून पाहते तो आमची वाट त्या रानटी लोकांनी बंद करून टाकली होती व सुमारे शंभर रानटी लोकांनी आम्हाला गराडा घातला होता. आमचं सामान घेतलेल्या व्हाओच्या मुलांकडे मी बघितलं. ती तिघं विलक्षण घाबरली होती आणि दगडी पुतळ्यांसारखी स्तब्ध झाली होती. दूरवर जंगलातून नगाऱ्यासारख्या वाद्यातून बु: ऽऽबु: ऽऽऽ असा अस्पष्ट आवाज येऊ लागला. साऱ्या वातावरणात भयानकता पसरली आणि अचानकपणे एका झुडपातून कर्कश आवाज आला. साऱ्या जंगली लोकांची नजर तिकडे वळली आणि क्षणार्धात त्या झुडपातून एक भयानक आकृती बाहेर आली. याचा चेहरा इतर जंगली लोकांसारखाच पण अधिक क्रूर आणि भेसूर होता. तो एखाद्या त्रस्त समंधासारखा वाटला. काळाकभिन्न, उघडा बंब, कमरेभोवती झाडाच्या सालींचं आवरण, नाकांतून आर-पार हाड. त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव मात्र करारी दिसत होते. त्याच्या हालचालीत, उंचीत व वागण्यात सत्ताधीशाची गुर्मी दिसत होती. त्याचे खांदे रुंद होते व जबडा एखाद्या सिंहाला शोभेल असाच होता. त्याच्या भुवयांच्या खाली खोलवर असे दोन्ही बाजूस खड्डे होते. करारीपणा आणि क्रूरता त्याच्या हालचालीत व्यक्त होत होती. नजर एखाद्या खुनी खंजिराच्या पात्यासारखी भेदक आणि धारदार होती. हाच तो रानटी लोकांचा राजा 'नागापाते' असावा असा मी तर्क केला आणि तो बरोबर ठरला.

क्षणभर तो झुडपाच्या बाहेर थांबला. त्यानं आपली तीक्ष्ण नजर आमच्यावर रोखली व तो सावकाश पावलं टाकीत आमच्या दिशनं येऊ लागला. त्याबरोबर इतर रानटी लोकांनी एक एक पाऊल मागे सरकून त्याला मान दिला. रानटी लोकांची त्यांच्या राजाला मान देण्याची बहुधा ती पद्धत असावी. याच क्षणी मला मार्टिनचा कॅमेरा चालू झाल्याचा आवाज ऐकू आला. नागापातेचं आगमन मार्टिन आपल्या कॅमेऱ्यात टिपून घेत होता.

नागापाते सरळ माझ्याच रोखाने येत आहे हे पाहून मला अक्षरशः दरदरून घाम सुटला. त्यानं आपली धारदार नजर माझ्यावर रोखली होती. त्यामुळे मी एका जागी खिळून राहिले. मार्टिननं ते पाहिल व अगदी हळू आवाजात तो मला म्हणाला,

"ओसा, तू घाबरल्याचं यत्किंचितही तुझ्या चेहऱ्यावर दाखवू नकोस. चेहरा हसरा ठेव आणि आपल्या सामानाची बॅग उघडी ठेव."

मी चेहरा हसरा केला आणि स्नेहपूर्ण नजरेन नागापातेकडे पाहिल. तो माझ्यासमोर येऊन उभा राहिला. आता त्याच्यात आणि माझ्यात फक्त तीन फूटच अंतर होतं. मी त्याला उद्देशून म्हटल,

"हॅलो, मिस्टर नागापाते." आणि माझ्या पिशवीतली काही उंची कापडं व तंबाखू त्याच्यासमोर केली, पण नागापातेनं त्या वस्तूंकडे ढुंकूनही पाहिल नाही! मार्टिन मला धीर देण्याच्या दृष्टीनं म्हणाला,

"ओसा, तू फार छान सुरुवात केलीस, असच चालू दे. त्याला आणखी काही वस्तू दाखव. आपण याची मर्जी संपादन केली तर आपलं सारंच काम अगदी सुलभ होईल."

"तू काळजी करू नकोस. मी प्रयत्न करते." माझा आवाज कापरा झाला होता. मी आणखी काही भडक रंगाची कापड बॅग-मधून बाहेर काढली आणि नागापातेला देत म्हटल,

"ही पहा ना, तुम्हाला फार आवडतील" पण ती कापडं घेण्याच्याऐवजी नागापातेन माझं मनगटच घट्ट पकडल. नागापातेच्या राक्षसी हाताचा माझ्या मनगटाभोवती विळखा पडला होता. त्याच्या हाताचा स्पर्श मला मेलेल्या रानटी जनावराच्या कातड्यासारखा बोचत होता. त्याच्या बोटात चार अंगठ्या होत्या. ते पाहून माझ्या शरीराला विलक्षण कंप सुटला. माझ्या मनात विचार आला, या अंगठ्या कुणाच्या बरं असाव्यात? या बेटावर आलेल्या माणसाना मारून आणि शिजवून त्यांचं मास खाण्यापूर्वी नागापातेने या अंगठ्या त्याच्या बोटातून काढून घेतल्या असाव्यात या कल्पनेनं साक्षात् मृत्यू माझ्यासमोर उभा आहे, अस मला वाटल. माझ्या हाताचा स्पर्श नागापातेला अत्यत मुलायम आणि मऊ वाटला असावा. त्या स्पर्शाच आणि कातडीच्या तांबूस रगाच त्याला आश्चर्य वाटलं. आपल्या कणखर बोटानी तो माझ मनगट घासून तोडातल्या तोडात काहीतरी गुरगुरत होता. त्यानतर त्याने गवताच्या काही काटक्या उचलून माझ्या हातावर घासून पाहिल्या तेव्हा माझ्या कातडीचा रंग अधिक लाल झाला, त्यामुळे त्याला फारच आश्चर्य वाटलं. त्यान माझ्या डोक्यावरची हॅट काढली आणि तो माझ्या केसाकडे पाहू लागला. माझे सोनेरी केस पाहूनही त्याला अधिक आश्चर्य वाटलं त्यानं माझी हॅट फेकून दिली व माझे केस एका हाताने घट्ट धरून दुसऱ्या हातान त्यानं माझा हात पिरगळला व मला पाठमोरी करून तो माझ्या पाठीमागे व मानेकडे पाहात राहिला. आता तो पुढे काय करणार या भीतीने मी अर्धमेली झाले. मला आता या राक्षसी वागण्याचा भयकर वेदना होऊ लागल्या. मी किंचाळू लागले.

हा सारा भयानक प्रसग चालू असतानाही मार्टिन शांतपणे नागापातेचे चलत् कॅमेऱ्यान फोटो काढत होता. पण माझी ही केविलवाणी अवस्था पाहून मार्टिन माझ्या व नागापातेच्या मध्ये येऊन उभा राहिला. त्याने नागापातेचा हात बळजबरीने पकडून त्याच्याशी हस्तांदोलन केलं. मार्टिनच्या अनपेक्षित वागण्यामुळे नागापातेने माझा जो विलक्षण छळ चालवला होता त्यात व्यत्यय आला होता. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या व तो मार्टिनच्या अंगावर गुरगुरू लागला. माझी सुटका झाल्यावर मार्टिन मला म्हणाला,

"ओसा, आपण आलो त्या रस्त्यानं सामान घेऊन तू भराभर खाली जा. मी तुझ्या मागून येतोच."

माझी सुटका झाल्यावर मी सामान उचलल आणि नागापातेकडे स्मित हास्य करीत त्याच्याशी हस्तांदोलन केल.

मला वाटत, हीच माझी चूक झाली कारण हस्तांदोलनासाठी धरलेला माझा हात न सोडता त्यान मला जवळ ओढली व मला घट्ट आवळून धरली. या त्याच्या करण्याने मी एक किंकाळी फोडली व मार्टिनकडे पाहिलं. त्याचा चेहरा रागान लाल झाला होता...

पण अचानकपणे नागापातेनं मला सोडून दिल आणि तोडातल्या तोंडात त्यानं काहीतरी हुकूम सोडला. आजूबाजूला जमलेले सारे रानटी लोक झुडपांमध्ये अदृश्य झाले व पडघमवरचा आवाज सुरू झाला. आमच्या बरोबर असलेल्या मुलांच्या खांद्यावर मी सामान दिलं व आम्ही त्या पायवाटेने किनाऱ्याच्या दिशेने पळत सुटलो. मार्टिनने ओरडून माझ्याजवळ असलेल्या पिस्तुलाची मला आठवण करून दिली. पण नुकत्याच घडलेल्या प्रसंगाचा माझ्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला होता, की माझ्या पायातली सारी शक्ती पळून गेली होती. मी आर्त स्वरात किंकाळ्या फोडत होते व एखाद्या भयानक स्वप्नाने पछाडल्यासारखी किनाऱ्याच्या दिशेने पळत होते. तरीसुद्धा मला कोणीतरी मागे ओढत आहे असा भास होत होता. तो क्रूर राक्षस मला फरफटत खेचून नेत आहे या कल्पनेने मी इतकी असहाय झाले होते की पळण्याची शक्ती माझ्या अंगात कुठून आली हेच मला कळल नाही. मांजरान उदराशी खेळाव तसा हा खेळ चालू होता. माजर आजूबाजूला झुडपात लपली होती आणि माझी स्थिती एखाद्या असहाय उदरासारखी झाली होती.

पडघमवर येणारा आवाज अचानक थांबला होता व साऱ्या रानटी लोकाच्या नजरा किनाऱ्याकडे लागल्या होत्या. रानटी लोकाची पळापळ व पडघमवर येणारा आवाज का थांबला हे मला समजेना. मी किनाऱ्याकडे पाहिल. गस्त घालणार इंग्रजांच जहाज किनाऱ्यावर लागलं होत. मार्टिनला नागापातेच्या लोकानी अजून पकडून ठेवल होतं; त्यामुळे तो असहाय झाला होता आता ते जहाज बघितल्यावर त्या जगली लोकाना हिसडा देऊन मार्टिनने आपली सुटका करून घेतली व नागापातेकडे पाहून तो मोठ्याने

"Man–O–Man! Man–O–War"

मार्टिनला बहुधा नागापातेला अस सागायच होत की किनाऱ्यावर आलेल लढाऊ जहाज आमची सुटका करण्यासाठी, आम्हाला मदत करण्यासाठी आलेल आहे. नागापातेला ते खर वाटल असाव. कारण आपला जबडा पसरून त्यान मोठ्यान एक आरोळी मारली. त्याचा अर्थ त्याने बेटावरील आपल्या साथीदाराना धोक्याची सूचना दिली असावी. कारण, क्षणभरातच नागापाते व त्याच्याजवळ आलेले सरक्षक आजूबाजूच्या झुडपात अदृश्य झाले.

मार्टिनचीपण अचानकपणे सुटका झाली होती. तो माझ्या मागून येत होता, त्या उतारावर आम्ही व तीन मुलं जीव घेऊन पळत सुटलो ती गस्त घालणारी बोट आम्ही किनाऱ्यावर पोचायच्या आत परत फिरली असती तर मग आम्ही जंगली श्वापदांच्या भक्ष्स्थानी पडलो असतो. जंगलातल्या दाट झाडीमुळे आजूबाजूची काटेरी झुडपं लागून आमचे कपडे व अंग ओरबाडलं जात होतं. चिखल, दगड, खड्डे यात पाय अडखळून आम्ही वारंवार पडत होतो व पुन्हा धडपडत जीव घेऊन पळत होतो. आजूबाजूच्या गवताची पाती आमच्या अंगावर–तोंडावर घासली जात होती. ते लढाऊ जहाज किनाऱ्यावर अनपेक्षित आलं होतं त्यामुळे आमची तात्पुरती सुटका झाली होती. ते किनाऱ्यावरून वळायच्या आत आम्हाला किनाऱ्यावर पोचणं भाग होतं, नाहीतर आम्हाला ठार मारून मेजवानी झोडायचा नागापातेचा विचार नक्की असावा. नागापाते आणि त्याची सारी सेना वर पठारावर जाऊन जंगलातून किनाऱ्यावर उभ्या असलेल्या लढाऊ जहाजाकडे डोळे लावून बसली होती.

आम्ही किनाऱ्यावर पोचतो न पोचतो तोच गस्त घालणारं लढाऊ जहाज मागे फिरलं होतं. पुन्हा एकदा जंगलातून पडघमवरील आवाज ऐकू येऊ लागले. याचा अर्थ नागपातेनं त्याच्या साथीदारांना आम्हाला पकडण्याचा आदेश दिला होता किनारा आणि आम्ही यात अजून अंतर होतं व घनदाट अरण्यातून वाट काढीत शक्य तितक्या लवकर किनाऱ्यावर पोचणं आवश्यक होतं. 'जीवन–मरणाचा'च हा लपंडाव चालू होता. मृत्यू आमच्या पाठीमागे लागला होता आम्हाला शिजवून मेजवानी करण्याच्या विचारानं नागापातेच्या जिभेला पाणी सुटलं असावं ही कल्पना मनात येताच आमच्या अंगात विलक्षण सामर्थ्य आलं उताराची वाट संपवून आम्ही किनाऱ्यावर पोचलो. पडघमवरचा बु:ऽ–बु.ऽऽऽऽसंदेश जोरात येऊ लागला होता. ही आम्हाला वेगाने पकडण्याची सूचना असावी. त्यानंतर त्या जंगली लोकांच्या जीवघेण्या ओरडण्याचा आवाज आम्हाला आला. साधारणपणे ते आमच्यापासून अर्ध्या मैलापेक्षा कमी अंतरावर होते. उतारावर त्यांच्या पावलांचे आवाज ऐकू येत होते.

किनाऱ्यावरच्या वाळूत आमचे पाय रुतत होते. पण पळणाऱ्या पायांना विलक्षण गती आली होती मार्टिन माझा हात घट्ट पकडून मला खेचत नेत होता. त्याच्या हाताचा कंप मला जाणवत होता. आमच्या सामानासकट जेमतेम आम्ही आमच्या अठ्ठावीस फुटी बोटीत येऊन कोसळलो. आमच्या बरोबर असलेल्या मुलांनी बोट झपाट्यानं चालू केली. नागापातेचे सारे साथीदार आजूबाजूच्या जंगलातून बाहेर येऊन किनाऱ्यावर येवू लागले होते. बोटीत पाऊल टेकल्याबरोबर धाडकन मी बोटीत कोसळले !

मला मूर्छा आली होती. साऱ्या अंगाला जखमा झाल्या होत्या. कपडे फाटून गेले होते. मार्टिनचीही तीच अवस्था झाली होती. मी शुद्धीवर आले तेव्हा मी बोटीच्या तळाशी अस्ताव्यस्त आडवी पडल्याचं माझ्या लक्षात आलं. व्हाओ बेटावरची आमची मदतनीस मुलं माझ्या तोंडावर पाणी मारून मला सावध करीत होती.

मी मान उंच करून मागे वळून पाहिलं. मालेक्युला बेट बरच मागे पडलं होतं. किनाऱ्यावर उभे असलेले ते नरभक्षक ठिपक्यासारखे दिसत होते. आम्ही आता पूर्ण सुरक्षित होतो. जीवन-मृत्यूच्या लढाईत मृत्यूचा पराजय झाला होता. आम्ही जिवंत आहोत आणि साऱ्या सामानासह एकत्र आहोत हे पाहून मला समाधान झालं, आणि पुन्हा मूर्च्छा येऊन मी धाडकन् बोटीत कोसळले !

मृत्यू आपल्या सहस्र जिभा चाटत मालेक्युला बेटावर उभा होता. आणि क्षणाक्षणाला आम्ही त्याच्यापासून दूर जात होतो... ❋

**: ५ :**

मला जेव्हा जाग आली तेव्हा रात्र झाली होती बोटीतली आमची मदतनीस मुलं आणि मार्टिन माझ्या तोंडावर पाणी मारत होते. मार्टिनला पण विलक्षण थकवा आला होता आमचं दोघांचं शरीर ठेचाळून रक्तबंबाळ झालं होतं. मालेक्युला बेटाचा किनारा आता दूर गेला होता व व्हाओ बेटाकडे आम्ही परत चाललो होतो. या संकटातून आम्ही सहीसलामत सुटलो म्हणून नि:श्वास टाकणार तोच जोराची पर्जन्यवृष्टी व वादळ सुरू झालं. आमची अठ्ठावीस फुटी देवमाश्याच्या आकाराची बोट वादळाच्या तडाख्यात सापडून मोठमोठ्या लाटांवर हेलकावे खाऊ लागली व थोड्याच वेळात बोटीत पाणी शिरू लागलं. नरभक्षकाच्या तावडीतून सुटून आता समुद्राच्या भक्ष्यस्थानी आम्ही पडणार काय, अशी आम्हाला भीती वाटू लागली पण याही संकटाशी मुकाबला करायचं आम्ही ठरवलं व जेमतेम व्हाओच्या किनाऱ्यावर येऊन पोचलो.

व्हाओ बेटावर फादर प्रिनच्या झोपडीत आम्ही परत आलो तेव्हा आमच्या असं लक्षात आलं की सारं सामान आणि चीजवस्तूसकट आम्ही सुखरूप परत आलो होतो. आमचं कसलंही सामान या धावपळीत हरवलं नव्हतं किंवा खराब झालं नव्हतं. ज्या कॅमेऱ्यावर मार्टिनने नागापाते व त्याच्या साथीदारांची फिल्म घेतली होती, तो चलत् कॅमेरा व फिल्म अगदी सुखरूप होती हे पाहून आम्हाला विलक्षण आनंद झाला. मालेक्युला बेटावर ज्या अग्निदिव्यातून आम्ही गेलो त्याचे भरपूर माप आमच्या पदरात पडलं होतं. त्या भयानक जीवघेण्या प्रसंगाच्या वेळीमुद्धा मार्टिनचा कॅमेरा सतत चालू होता. हजारो फूट फिल्ममध्ये नागापाते आणि त्याच्या टोळीतील साथीदारांचे क्रूर, भयानक आविर्भाव आणि हालचाली मार्टिनच्या कॅमेऱ्याने टिपल्या होत्या. ही सर्व फिल्म फारच चांगली आली होती. नरभक्षक रानटी लोकांच्या क्रूरतेचे परमोच्च बिंदूसुद्धा कॅमेऱ्याने टिपून घेतले होते. नागापातेचा भयानयक क्रूर चेहरा सुसंस्कृत लोकांना पडद्यावर दिसला की भीतीने त्यांच्या अंगावर निश्चित काटा उभा रहाणार होता !

आम्ही घेतलेल्या चित्रपटाचा पहिला शो ऑस्ट्रेलियातील सिडनी येथील ब्रॉडवे थिएटरमध्ये झाला. या चित्रपटावर लोकांच्या अक्षरश: उड्या पडू लागल्या. नागापातेचा गुरगुरणारा क्रूर चेहरा पडद्यावर पाहिला की प्रेक्षकाच्या अंगातून वीज गेल्यासारखी वाटे. सुसंस्कृत जगात नागापातेला लोक आता ओळखू लागले. या चित्रपटामुळे

आम्हाला पैसा व कीर्ती मिळाली. ठिकठिकाणी दौरे काढून व भाषण करून आम्ही पैसे मिळविले. या भाषणाना व चित्रपटाला लोकाकडून फारच चागला प्रतिसाद मिळाला. नरभक्षकाच्या जीवनाबद्दल लोकांच्या मनात विलक्षण औत्सुक्य व कुतुहल जागृत झाल. या नरभक्षकाच दैनंदिन जीवन, त्याचा आहार, त्याच्या आपसातील लढाया खून मारामाऱ्या—या साऱ्या जीवनाबद्दल लोकाना कुतुहल वाटू लागलं. मालेक्युला बेटात चाळीस हजार नरभक्षकाच जीवन पडद्यावर पाहण्याची इच्छा असख्य प्रेक्षकाच्या मनात जागृत झाली. या साऱ्या लोकाच समाधान करायच व त्याना पडद्यावर नरभक्षकाच सपूर्ण जीवन दाखवायच अशी ईर्षा मार्टिनच्या मनात जागृत झाली. नरभक्षकाच सपूर्ण जीवन चित्रित करायच म्हणजे फारच मोठी अवघड कामगिरी होती. पण आपल सर्वस्व पणाला लावून हें स्वप्न साकार करायच मार्टिनने ठरविल व आम्ही दोघं फारसा वेळ न दवडता त्या तयारीला लागलो.

आमच्या ह्या दुसऱ्या मोठ्या प्रदीर्घ साहसी प्रवासासाठी आम्ही सामानाची जमवाजमव सुरू केली व सर्वांचा निरोप आम्ही सात-आठ महिन्याच्या अवधीत पुन्हा सॅन फ्रॅन्सिस्कोहून सुटणाऱ्या बोटीत पदार्पण केलं. १९१७ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आम्ही मालेक्युला बेटावर प्रथम पदार्पण केल होतं, त्यावेळी आमच्याजवळ फारच मामुली, तुटपुज सामान होतं. आता १९१८ च्या जून महिन्यात आम्ही सॅन फ्रॅन्सिस्कोहून सुटणाऱ्या बोटीतून प्रदीर्घ साहसी प्रवासास निघालो. ह्यावेळी एकूण पासष्ट मोठमोठाल्या ट्रका व खोके आमच्या सामानाने भरले होते आमच्या मदतीसाठी काही माणसं आम्ही बरोबर घेतली व या साऱ्या लव्याजम्यासह प्रथम आम्ही सिडनी येथे दाखल झालो. सिडनी हे ऑस्ट्रेलियातील सर्वांत मोठ शहर आणि बदर. सिडनी येथे थोडे दिवस राहून व आणखी काही उपयुक्त सामान बरोबर घेऊन आम्ही— दक्षिण समुद्रातील आमचा प्रवास सुरू केला. यावेळी आम्हाला मिळालेली बोट सर्व सुखसोयीनी युक्त होती, त्यामुळे प्रवास फारच सुखकर झाला. दक्षिण समुद्रात 'न्यू हेब्रिडीज' या नावान प्रसिद्ध असलेली एकूण तीस लहान-मोठी बेंट आहेत. या बेटाच्या मालकी हक्कावद्दलचा प्रश्न वादग्रस्त होता. कुठल्याही एका राष्ट्राची सत्ता या बेटावर नव्हती व त्यामुळेच बेटावरील रानटी लोक मुक्त होते. या बेटातील 'निओमा' नावाच्या बेटावर आम्ही प्रथम दाखल झालो व तेथून 'व्हिला' या बेटावर आलो. 'व्हिला' हे बेट म्हणजे न्यू हेब्रिडीज् बेटांची राजधानी म्हणून ओळखले जाते. व्हिला येथे आमची आणि फादर प्रिन याची गाठ पडली. त्याना तिथे पाहून आम्हाला फारच आनंद झाला, आणि आश्चर्यही वाटल !

फादर प्रिन आता थकले होते व अशक्त आणि दुर्बल दिसत होते. 'व्हाओ'ला त्यानी आयुष्याची तीस-पस्तीस वर्षे काढली व धर्मप्रसाराच काम केल. पण या प्रदीर्घ काळात सात-आठ लोकानीच ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. त्याच्या या चिकाटीच्या कार्यामुळे त्याच्यावद्दल माझ्या मनात नितात आदर निर्माण झाला होता. आता ते आपल उर्वरित आयुष्य 'व्हिला' येथे काढणार होते. आम्ही मालेक्युलाला पुन्हा निघालो आहोत हे जेव्हा त्याना आम्ही सांगितल तेव्हा आपली नापसती दाखवीत त्यानी मान हलवली व म्हटल,

"मालेक्युलाची जंगली जमात फारच भयकर आहे."

शेवटी मजल दर मजल करीत प्रचड सामानासहित आम्ही 'व्हाओ' बदरात येऊन दाखल झालो ज्या बोटीतून आम्ही सिडनीहून निघालो त्या बोटीचा कप्तान फारच चांगला होता. त्याला आपल्या जलप्रवासाचा पन्नास मैलांचा मार्ग अधिक कापावा लागला. व्हाओ बेटात त्यान आम्हाला आणून सोडलं. 'व्हाओ'च्या बदरावर आम्ही उतरल्यावर शेकडो रानटी लोक आम्हाला पाहायला जमा झाले. ज्या बेटावर फादर प्रिन पस्तीस वर्षं राहून काही करू शकले नव्हते तिथल्या जगली प्राण्याचा विश्वास संपादन करायचा म्हणजे मोठी कठीण कामगिरी होती. किनाऱ्यावर उतरवलेले सामानाचे प्रचड पेटारे व ट्रका आम्ही त्या जगली लोकांना आत नेण्याची विनती केली. तवाखू, कापड व काही खाद्य पदार्थ दिल्यावर बेटावरील जगली लोकानी हे काम आनदान केल. फादर प्रिननी बाधलेली झोपडी रिकामीच होती. तिची डागडुजी व साफसफाई करून आम्ही आमच बिऱ्हाड तिथं थाटल कारण व्हाओ बेटावर वास्तव्य करून मगच आम्हाला पुढचा कार्यक्रम आखायचा होता.

व्हाओ बेटाच क्षेत्रफळ दोन मैलाच होत व त्यावर फक्त चारशे रानटी लोकाची टोळी राहात होती. हे सारे लोक मालेक्युला बेटावर झालेल्या लढाईत पराभूत झाल्यामुळे निर्वासित होऊन पळून आले होते. मालेक्युला बेटावरील जमातीत काही वर्षांपूर्वी जी एक मोठी लढाई झाली होती त्यात दोन तट पडून मोठी पाती व धाकटी पाती असे गट निर्माण झाले होते. या दोन गटात विलक्षण वैमनस्य होत. यात लहान पातीचा पराजय होऊन असख्य लोक मारले गेले होते व बरेचसे पळून आले होते. या निर्वासितानी व्हाओ बेटावर आपला मुक्काम केला होता. मालेक्युलाच्या मोठ्या पातीत सुमारे चाळीस हजार रानटी लोक होते व नागापाते हा त्याचा आता अनभिषिक्त राजा झाला होता.

पराभूत छोटया पातीच्या निर्वासिताचा प्रमुख आता व्हाओ बेटावर आला होता. आम्ही व्हाओ बेटात येऊन दाखल झालो त्या सुमारास या प्रमुखान आपण या बेटाचा राजा आहोत अस घोषित करण्याकरिता बेटावरील साऱ्या जमातीला एक मोठी मेजवानी दिली. या प्रमुखाच नाव होतं टेथलॉग अशा तऱ्हेच्या मेजवानीचा बेत यापूर्वी कधीही झाला नव्हता गाणी, नाच व अनेक वाद्य वाजवली जात होती. या जेवणाच्या प्रचड मेजवानीसाठी टेथलॉगनं अनेक लोक आजूबाजूच्या बेटावरून कोबड्या व डुकरं आणण्याकरिता पाठवले होते. या जेवणाच्या मेजवानीसाठी सातशेवीस रानडुकरं मारून त्याच मास शिजवण्यात आल. साऱ्या रानटी लोकानी या मासावर ताव मारला व ते सारं सपेपर्यंत अखड नृत्य, वाद्य व भेसूर सगीत चालू होत. मार्टिनने या मेजवानीचे अनेक प्रसग आपल्या कॅमेऱ्यात टिपून घेतले

आमच बरचस महत्त्वाचं सामान अजून यायच होत. त्याची आम्ही उत्कंठेने वाट पाहात होतो. हे सामान घेऊन आमची एक तुकडी येणार होती. त्या तुकडीची वाट पाहाता व्हाओ बेटावर मुक्काम करण आम्हाला भाग होत. हे सारं सामान व आमची माणस आल्यावर मगच आम्ही सर्वांनी मालेक्युला बेटावर जायच ठरविल होत या सामानात 'जनरेटिंग सेट'सह अनेक महत्त्वाच्या उपयुक्त वस्तू होत्या.

टैथलांगनं दिलेल्या मेजवानीनंतर एक दिवस, रात्री मनस्वी उकाडा होत होता म्हणून समुद्र किनाऱ्यावर हवा खाण्यासाठी मी आणि मार्टिन आमच्या झोपडीतून बाहेर पडलो. त्या दिवशी पौर्णिमा असावी पूर्ण चद्राचा प्रकाश किनाऱ्यावर पसरला होता. आकाश निरभ्र होत चद्रप्रकाशाचा चदेरी गालिचा समुद्राच्या पाण्यावर पसरला होता. अथाग निळ आकाश, शात सागर व त्यावर पडलेल पूर्ण चद्राच प्रतिबिब. अशी पौर्णिमेची निसर्गरम्य रात्र मी आयुष्यात प्रथमच पाहात होते. मी आणि मार्टिन हातात हात घालून किनाऱ्यावर वाळूत गप्पा मारीत बसलो. मन अगदी प्रसन्न होत. समुद्राच्या सान्निध्यात निसर्गाचे ते सुदर रूप पाहात बसलो होतो आणि अचानक आम्हाला दुरून होडी वल्हवल्याचा आवाज ऐकू आला. तो ऐकन मार्टिनन क्षणाचाही अवधी न लावता मला खूण केली. आम्ही दोघ किनाऱ्यावरील झुडपात लपून बसलो आणि लपल्या-लपल्या आम्ही पाहू लागलो अनेक रानटी लोक होडी वल्हवीत किनाऱ्यावर आले. पाला-पाचोळयात गुडाळलेल एक प्रचड लावलचक धूड त्यानी होडीतून बाहेर काढल. ते उचलायला सहा माणस लागली होती. नेहमी वटवट करणारे ते लोक अगदी शात होते. सार गुपचुप चालल होतं. ते धूड उचलून झपाझप चालत ते बेटावरील आपल्या वस्तीत निघून गेले आम्ही लपल्यामुळे त्यांनी आम्हाला पाहिल नसाव. ती सारी मडळी निघून गेल्यावर आम्ही अत्यत सावकाशपणे व अत्यत सावधतेने जवळजवळ सरपटतच आमच्या झोपडीकडे परत आलो. रात्रभर आम्हाला झोप लागली नाही. मार्टिनन मला उशाशी पिस्तुल ठेवायला सागितल व तो स्वत बदूक सज्ज ठेवून जागा राहिला. त्यानतर थोडयाच वेळात 'बु ऽऽबु:ऽऽ'च सगीत सुरू झाल व साऱ्या वातावरणात भयानकता पसरली.

दुसऱ्या दिवशी तपास केला तेव्हा आम्हाला समजलं की बाजूच्या बेटावरचा एक माणूस त्या रानटी लोकानी मारून आणला होता. पानात व पाला-पाचोळयात गुडाळलेल ते प्रचंड धूड म्हणजे एका मानवाची शिकार होती. रात्री त्याचे मास शिजवून त्यानी मेजवानीवर ताव मारला व त्यावेळी जे सगीत चालल होत ते नरभक्षणाच्या मेजवानीच्या प्रसगीच खास वाजविल जाण्याची प्रथा होती!

आमचं बाकी राहिलेल सामान दुकाठी गलबतात घालून आमची बाकीची मडळी व्हाओ बेटावर येऊन दाखल झाली. या तुकडीत पॉल नावाचे आमचे मित्र आठ सशस्त्र जवानाना घेऊन हजर झाले होते. मालेक्युला बेटावर जाण्याकरिता आम्ही सारी मडळी आता सज्ज झालो होतो शिडाच्या तीन बोटी आम्ही भाडयानं घेतल्या होत्या. आमच्या या तुकडीत पॉल, थॉमस, मार्टिन, मी आणि व्हाओ बेटावरील सव्वीस रानटी लोक होते. या लोकाना आम्ही थोडस शिक्षण देवून तयार केल होत. नागापातेला भेट देण्यासाठी बऱ्याचशा वस्तूही आम्ही बरोबर घेतल्या होत्या.

साऱ्या लव्याजम्यासह मालेक्युला बेटाच्या किनाऱ्यावर आमचे पडाव लागतात न लागतात तोच वीस-एक रानटी लोक आमच्या समोर येऊन उभे राहिले. त्यातच नागापाते मोठ्या दिमाखाने उभा होता. आता त्याच्याबद्दल मला वाटणारी भीती बरीचशी कमी झाली होती. आमच्या मागच्या भेटीत मार्टिनन जो चित्रपट घेतला होता त्या चित्रपटाचा 'नागापाते' हा नायक होता. त्याचा भेसूर आणि भयानक चेहरा असख्य प्रेक्षकानी पडद्यावर पाहिला होता. मी तर तो इतक्या वेळा पाहिला होता की आता मला त्याची अजिबात भीती वाटेनाशी झाली होती.

मी आणि मार्टिननं पुढे जाऊन नागापातेशी हस्तादोलन केल त्या नरभक्षकाच्या राजाला आमच्या या वागण्यामुळे आश्चर्य वाटल. आमच्या मनात त्याबद्दल काहीही अढी नाही हे पाहून त्याला अतिशय आनद झाला आपले दोन्ही हात छातीवर बडवीत आमच्या शिडाच्या पडावांकडे बोट दाखवून आम्हाला तो काहीतरी सागू लागला. त्याच्या त्या आविर्भावावरून त्याला आमच्या पडावात बसून समुद्रात थोडासा फेरफटका करावयाचा होता हे आमच्या लक्षात आल. आमची तो परवानगी मागत होता. आम्ही त्याला फेरफटका मारून आणण्याच कबूल करताच तो आपल्या दोन संरक्षकासह आमच्या पडावात चढला. आम्ही पडाव चालू केला. आणि आमच्या लक्षात आल की आम्ही नागापातेच्या कचाटयात सापडण्याच्या ऐवजी तोच आमच्या तावडीत सापडला! ही फारच विस्मयजनक गोष्ट घडली होती आम्ही नागापाते व त्याच्या साथीदाराना थोडेसे मासे व आणखी काही पदार्थ खायला दिले त्यानी ते क्षणार्धात मटकावून टाकले. आमच्या सर्वांशी तो अतिशय मिळून-मिसळून वागत होता नरभक्षकाच्या राजाला न शोभणार त्याच वर्तन पाहून आम्हाला आश्चर्य वाटलं. मी नागापातेला काही गाणी म्हणून दाखविली आणि तो ऐकत असताना तो माना डोलवीत होता व त्यानतर त्यान माझ्या सुरात सूर मिसळून डोळे मिटून गाण म्हणायला सुरुवात केली. आम्ही सारेजण स्तब्ध होऊन ते ऐकत होतो. ते गाण सपल्यावर त्यानं डोळे उघडले आणि सर्वसामान्य माणसासारख वर्तन केल्याबद्दल त्याला लाज वाटली असावी. त्यान आम्हाला किनाऱ्याला परत सोडण्याची विनती केली किनाऱ्यावर परत आणून सोडताना नागापाते आणि त्याच्या साथीदाराना आम्ही भेटीदाखल तबाखू, कॅलिकोच कापड, सुऱ्या, गवती टोप्या दिल्या. त्यानी त्या वस्तू आनदाने स्वीकारल्या व झपाट्याने किनाऱ्यावर उतरून ते झाडीत अदृश्य झाले.

आम्ही आमच्या व्हाओ बेटावरील मुक्कामावर परतलो ते अशा आनदान की आता नागापातेची आणि आमची चागलीच गट्टी जमली होती व या पुढच आमच सारं काम आता सुलभ होणार होत

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आमचे पडाव घेऊन पुन्हा मालेक्युला बेटावर आलो तेव्हा हजारो रानटी लोक आमची वाट पाहात किनाऱ्यावर उभे होते ते मोठमोठयादा ओरडत आपली शस्त्रास्त्र उच करीत आम्हाला हाका मारीत होते. त्यानी आपल्या बरोबर अनेक प्रकारची रानटी फळ व फुल आणि नारळ आणले होते आम्ही किनाऱ्यावर उतरल्यावर ही सारी भेट त्यांनी माझ्या पायाशी ठेवली. नागापातेन ही फळाफुलांची भेट माझ्यासाठी पाठवली होती. तो स्वत: मात्र आला नव्हता. नागापातेन दिलेल्या भेटीचा स्वीकार करून आम्ही व्हाओला परतलो

आमची व नागापातेची आता चागली मैत्री झाली होती. आमच्या

पहिल्या भेटीच्या वेळी आम्ही जे असंख्य फोटो व चलत्‌चित्रपट घेतला होता. तो नागापाते व त्याच्या जंगली सहकाऱ्यांना दाखवायचं आम्ही ठरवलं. याकरिता जनरेटिंग सेट, प्रोजेक्टर, फिल्म ही सारी आयुधं घेऊन आम्ही एका संध्याकाळी मालेक्युला बेटावर हजर झालो. जगलातील सर्वांना एकत्र आणून त्याचे व त्यांच्या राजाचे फोटो पडद्यावर दाखवण म्हणजे फारच अवघड व जिकिरीचं काम होत. नागापाते व त्याच्या साऱ्या प्रजाजनांना आम्ही किनाऱ्यावर एकत्र केलं व सोयीस्कर जागा बघून पडदा लावला. अंधार पडल्यानतर पडद्यावर चित्रं दाखवायला जेव्हा आम्ही सुरुवात केली, तेव्हा प्रकाशाचा झोत पडद्यावर पडलेला पाहून सारी मडळी अस्वस्थ झाली व गुरगुरू लागली. त्यांची चुळबुळ व मचमच जेव्हा सुरू झाली, तेव्हा हा काय प्रकार आहे हे आमच्या लक्षात आलं. अधारातून येणारा प्रकाशाचा झोत पाहून सारी रानटी जमात भेदरली होती ! मी नागापातेचा दड पकडून त्याला पडद्यासमोर नेऊन बसवल तेव्हा त्या रानटी लोकाची अस्वस्थता बरीचशी कमी झाली. तरीसुद्धा बराच वेळ त्याची बडबड चालू होतीच.

नागापातेचा चेहरा जेव्हा पडद्यावर सर्वांच्या नजरेस पडला तेव्हा त्या रानटी लोकानी एकदम कोलाहल माजवला. " नागापाते ! नागापाते ! " अशी ओरड प्रेक्षकात सुरू झाली. पडद्यावर दाखवल्या जाणाऱ्या चित्रामध्ये आता प्रेक्षकात हजर असलेला प्रत्येक रानटी माणूस कुठल्या ना कुठल्या तरी दृश्यामध्ये दिसत होता. त्यामुळे प्रत्येक चित्र पडद्यावर दाखविले जात होते तेव्हा प्रेक्षकाच्या तोडून चित्कार, गोगाट व त्या त्या माणसाच्या नावाचा गलबला माजे. आणि अचानकपणे अनेक छायाचित्र जेव्हा पडद्यावर दाखविली गेली तेव्हा सर्वांच्या तोंडून खेदजनक उद्‌गार बाहेर पडले व क्षणभर सारं वातावर निस्तब्ध होऊन भयानक शातता पसरली. ज्या रानटी माणसाचं चित्रं पडद्यावर दाखविल जात होत, तो काही महिन्यापूर्वी मेला होता. एखादा मेलेला माणूस जिवत होऊन अचानकपणे पडद्यावर प्रकट व्हावा ही जादूची किमया कोणती याच साऱ्याजणाना आश्चर्य वाटत होत.

ही छायाचित्र आणि चलत्‌ चित्रपट पडद्यावर दाखविल्यानंतर या साऱ्या जंगली लोकांच्या वागणुकीत अचानक परिवर्तन घडून आलं होतं. आमच्यावर सूड घेऊन आम्हाला शिजवून आमचं मास खावं ही कल्पना त्याच्या मनातून निघून गेली असावी. मार्टिन आणि माझ्याबद्दल त्याच्या मनात स्नेहभाव निर्माण झाला होता अस त्याच्या वागण्यात आम्हाला स्पष्टपणे दिसत होत. आमच्या दोघांविषयी त्याना आता आपुलकी वाटत होती व आमच्या भोवती जमून ती सारी रानटी जमात आमच्याकडे आदरानं पाहात होती. मी आणि मार्टिनन त्या सर्वांना भेटीदाखल तंबाखू व अनेक वस्तू मुक्त हस्ताने वाटल्या.

आम्ही आमच्या सामानाची आवराआवर केली व आमच्या दुकाठी गलबतामध्ये सार सामान भरलं व मालेक्युला बेटाचा किनारा सोडून आम्ही परत आमच्या व्हाओ बेटावरील मुक्कामाकडे जायला निघालो. तेव्हा एक रानटी इसम आमच्याजवळ धावत आला. तो नागापातेचा निरोप घेऊन आला होता. तो हातवारे करीत व आपल्या हातातलं शस्त्र ऊंच करीत आम्हाला काहीतरी सांगू लागला. तो जे बोलत होता ते समजून घेण्यात बराच वेळ गेला व अखेरीस त्याच्या बोलण्याचा अर्थ आम्हाला समजला होता. तो असा होता की,

" आमचा सर्वांचा राजा नागापाते यानं तुम्हा दोघाना आमच्या या बेटावर राहायला येण्याचं आमंत्रण केल आहे. तुम्ही ते स्वीकारावं अशी आमच्या राजाची इच्छा आहे "

मार्टिननं आणि मी नरभक्षकाच्या राजाच आमंत्रण आनदानं स्वीकारलं आणि त्याच्या बेटावर राहायला येण्याचं आश्वासन देऊन आम्ही मालेक्युलाचा किनारा सोडला. रात्रीच्या भयाण काळोखात समुद्राच्या लाटांवर आमचे पडाव हेलखावे खात व्हाओकडे परत निघाले. माझं आणि मार्टिनच मन आनदान हेलखावे खात होतं— उचंबळून आल होत ! रानटी लोकांचा सपूर्ण जीवनक्रम पडद्यावर आणण्याच मार्टिनचं स्वप्न आता साकार होणार होतं...

## : ६ :

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही साऱ्या लव्याजम्यासह मालेक्युला बेटावर राहण्याच्या तयारीन व्हाओचा किनारा सोडला. आमच्याबरोबर पॉल, पॅरॉल, थॉमस व सव्वीस सशस्त्र जवानाची तुकडी, भेटी देण्यासाठी घेतलेल भरपूर सामान होत. या साऱ्या तयारीन आम्ही मालेक्युला बेटावर येऊन हजर झालो. आमच्याबरोबर चलत्‌ व स्थिर कॅमेरा व हजारो फूट कोरी फिल्म आम्ही घेतली होती. आठ ते दहा दिवस पुरेल एवढं अन्नही आमच्यापाशी होत. किनाऱ्यावर पोचल्यावर झाडीतील पायवाटेन आम्ही वर पठारावर पोचेपर्यंत दुपार टळून गेली होती. येथून मैलोन्‌मैल पसरलेल घनदाट अरण्य, दऱ्या आणि हिरव्यागार गवतान आच्छादलेल लाबच लाब पठार आम्हाला दिसत होत.

आम्ही सारी मडळी पठारावर पोचतो न पोचतो तोच आम्हाला आजूबाजूच्या जंगलातून आरोळ्या ऐकू आल्या व त्या पाठोपाठ वीस-पंचवीस रानटी लोक झुडपांतून आमच्या समोर येऊन दाखल झाले. नागापातेन त्यांना मुद्दाम आमच्या मदतीसाठी पाठविलं होत. त्यांनी आमच सामानसुमान घेतल व आम्ही त्यांच्या पाठोपाठ पायवाटेन पुढील रस्ता आक्रमू लागलो. आम्ही मागे वळून पाहिल तेव्हा किनाऱ्यावर उभे असलेले आमचे तीन पडाव ठिपक्यासारखे दिसत होते.

आम्ही सुमारे मैलभर चालत गेलो तेव्हा एका छोटया खेड्याजवळ आम्ही येऊन पोचलो होतो. खेड म्हणजे आजूबाजूला गोलवर छोटया झोपड्या व मध्यभागी पटागण या मध्यभागी असलेल्या पटागणात तीस-चाळीस रानटी लोक बसलेले होते आम्ही त्याना अभिवादन केल तेव्हा ते तोडातल्या तोडात गुरगुरले.

आम्ही तसेच पुढे गेलो आणि पुन्हा मैलभर अतर चालून जाताना वाटेवर अनेक झोपड्या आम्हाला दिसत होत्या. त्या दुसऱ्या खेड्यापाशी आम्ही जेव्हा येऊन पोचलो तेव्हा गोल झोपड्याच्या मध्यभागी असलेल्या पटांगणात दोन-तीनशे रानटी लोकांचं एक टोळकं

आम्हाला दिसलं. ही सारी मंडळी गुरगुरत पाहत होती. त्यांनी मध्यभागी पोकळ लाकडाचा एक ओंडका ठेवला होता. व त्यावर काठी घासून त्यातून 'बु:ऽऽ. बु.ऽऽ' असा आवाज ते काढीत होते. जंगलातील लोकाना निरनिराळे आवाज काढून सदेश देण्याचं हे मध्यवर्ती ठिकाण होतं. मध्यवर्ती केंद्र असलेल्या या गोलाकार झोपड्यांच्या मध्यभागी लाकडाचे ओडके आम्हाला बसायला देऊन तिथल्या रानटी लोकांनी आमचं स्वागत केल. आम्ही त्या लाकडी ओडक्यावर विराजमान झालो व आमचे सशस्त्र जवान आमच्या मागे कड करून उभे राहिले. थोड्याच वेळात तिथं जमलेल्या रानटी लोकांनी लाकडी ओडक्याच्या वाद्यांतून विशिष्ट आवाज काढायला सुरुवात केली. तो 'बु:ऽऽ' 'बु ऽऽ असा आवाज ऐकून माझ्या अंगावर काटा उभा राहिला. मी मार्टिनच्या जवळ सरकले. 'बु ऽऽ बु·ऽऽ'चा आवाज अचानक थांबला आणि क्षणार्धात जवळच्या झाडीतून नागापाते आमच्यासमोर अवतीर्ण आला. क्षणभर त्याने आजूबाजूला जमलेल्या प्रेक्षकाकडे दृष्टीक्षेप टाकला. हॉलिवुडच्या एखाद्या महान् दिग्दर्शकालासुद्धा चितारता येणार नाही असा देखावा आमच्या समोर प्रत्यक्ष घडत होता. नागापातेने एक प्रचड आरोळी मारून हुकूम सोडला. एका रानटी इसमान झटपट एक लाकडाचा प्रचड ठोकळा नागापातेजवळ आणून ठेवला. हे बहुधा सिंहासन असाव. आमच्याकडे तोंड करून नागापाते त्यावर विराजमान झाला. आम्ही सर्वांना उठून त्याच्याशी हस्तांदोलन केलं. त्यानतर नागापातेने प्रचड आरोळी मारून आणखी एक हुकूम सोडला. त्याबरोबर एका रानटी इसमानं बाबुची पाण्यान भरलेली बाटली नागापातेच्या हातात दिली. नागापाते त्या बाटलीतलं थोड पाणी घटाघट प्याला व त्यानं ती कलती करून माझ्या हातात दिली. उद्देश असा की मी त्यातल पाणी प्यावं. त्या बाबूच्या बाटलीतलं पाणी प्यायची मला अत्यत शिसारी आली. पण ते पिऊन परस्पर सलोख्याचे व मैत्रीचे सबंध जोडण्याचा तो रानटी लोकाचा सकेत होता. दक्षिण समुद्रातील रानटी बेटावर उष्टं पाणी पिऊन मैत्री जोडण्याचा हा शिरस्ता पाळणं मला भाग पडल. नाइलाजान मला त्या बाटलीतल पाणी प्यावं लागल व मग माझं अनुकरण मार्टिनने केलं. आम्ही बरोबर आणलेल्या वस्तू नागापातेला आम्ही भेट म्हणून दिल्या आणि त्याने व त्याच्या साथीदारानी त्या आनदान स्वीकारल्या. शिष्टाचार व गाठीभेटी सपल्या होत्या. मग मार्टिनने आपला कॅमेरा बाहेर काढला व निरनिराळ्या प्रसगाच चित्रीकरण त्यान सुरू केल.

मार्टिनचा कॅमेरा सतत तीन तास चालू होता. पण त्याला जे हव होत ते मिळत नव्हत. त्या रानटी लोकाच्या झोपड्याना दरवाजे नव्हते. एक लहानस छिद्र होत त्यातून सरपटत आत जाव लागे व सरपटतच बाहेर याव लागत होत. मी एका रानटी माणसाला झोपडीत शिरण्याची व बाहेर येण्याची विनती केली. मार्टिननं ते दृश्य तावडतोब चित्रीत केल.

नागापाते हे सार पाहून मोठमोठ्यादा हसत होता. तो हसताना पाहून सारी रानटी जमात हसू लागली, नाचू लागली, गाणी म्हणू लागली मार्टिनचा कॅमेरा हे सारं टिपून घेऊ लागला या मालेक्युलाला आल्यापासून मला एका गोष्टीच सारख आश्चर्य वाटत होत. ते हे की एकही स्त्री किंवा मूल आत्तापर्यंत माझ्या दृष्टीस पडलं न व्हतं ही फक्त पुरषांचीच भूमी आहे काय ? इथं स्त्रीला मज्जाव आहे का ? असे प्रश्न मला भेडसावत होते. पण आम्ही आणखी काही अंतर चालून गेलो आणि गवती बुरखा घेतलेल्या काही स्त्रिया आमच्या दृष्टीस पडल्या या स्त्रियाची केविलवाणी स्थिती पाहून मला त्याची अतिशय दया आली. छातीपासून गुडघ्यापर्यंत जड वल्कल त्यानी धारण केली होती. ती अतिशय गलिच्छ आणि घाणेरडी होती—जमातीत स्त्रियाना स्नान करण्यास मज्जाव होता. कोणत्याही स्त्रीन जन्मल्यापासून मरेपर्यंत स्नान करायच नाही, असा कडक निर्बंध साऱ्या स्त्रियावर लादलेला होता स्त्रियाची इतकी भयानक आणि केविलवाणी स्थिती मी आतापर्यंत कधीच पाहिली नव्हती

नागापातेच्या शभर राण्या आहेत अस आम्ही ऐकलं होतं. पण त्यातल्या फक्त दहाच आम्हाला पाहायला मिळाल्या. या साऱ्या गलिच्छ, ओगळ, कुरूप व भेसूर होत्या. या जमातीतील मुलसुद्धा त्यांच्या आयासारखीच गलिच्छ व लाजाळू होती. आम्हाला पाहून ती झाडीत पळून जात आमच्या नजरेला जी मुलं पडली ती सारी हातापायाच्या काड्या व पोटाचा नगारा असलेलीच.

सहा-सात दिवसाच्या आमच्या मालेक्युला बेटावरील मुक्कामात तिथल्या अनेक चालीरीतीच आम्ही चित्रण केलं. नागापातेच्या टोळीची आणि पलीकडल्या बेटावरील रानटी लोकाची याच वेळी थोडीशी चकमक उडाली व आता भयानक युद्ध होणार अस आम्हाला वाटू लागल होत पण ते थोडक्यातच थाबल. पण या प्रसगामुळेच नागापातेच्या युद्धमंत्र्याची व आमची ओळख झाली. हा एक मोठा शूर साहसी योद्धा या काळातील त्याच्या साऱ्या गनिमी हालचाली आम्ही आमच्या कॅमेऱ्याने टिपून घेतल्या.

आमच्या मालेक्युला बेटावरील आठ दिवसाच्या वास्तव्यात रानटी लोकाच सार जीवन आमच्या चलत् कॅमेऱ्यान टिपून घेतलं होतं. मी आणि मार्टिन ज्या झोपडीत राहात होतो त्याच्या दाराशी रोज सकाळी नागापाते फळाच्या भेटी आणून ठेवत असे. विशेष म्हणजे नागापाते आता माझ्याशी थोडासा सलगीने वागू लागला होता आणि त्यामुळेच मला त्याचा आणि तिथल्या वातावरणाचा विलक्षण उबग आला. आमचा मुक्काम आता हलवण्याचा आम्ही विचार करू लागलो व नागापातेचा निरोप कसा घ्यायचा याचाही विचार करू लागलो.

एके दिवशी सध्याकाळी जगलातून हिंडता हिंडता अचानकपणे आम्ही बरेच दूर आलो वाटेत आम्हाला एक मोठी झोपडी लागली. ही झोपडी सर्वसामान्य झोपड्यापेक्षा खूपच मोठी होती. मात्र तिचं प्रवेशद्वार मात्र इतर झोपड्याप्रमाणे अगदी निमुळत—छोटं होतं. आम्ही दोघं गुडघे टेकून त्या झोपडीत शिरलो. या झोपडीत अनेक मोठमोठाल्या टोपल्या भरून ठेवल्या होत्या. त्यात काय आहे हे कुतूहल आमच्या मनात जागं झाल. झोपडीत अंधार होता. पण कुठून तरी थोडासा प्रकाश येत होता. डोळे किलकिले करून मी त्या टोपल्यात डोकावून पाहिल आणि माझे हातपाय अक्षरशः कापू लागले !

त्या प्रचड टोपल्यात मानवाची वाळलेली मुडकी ठेवली होती !— एखाद्या सुकामेव्याच्या मोठ्या व्यापाऱ्यानं आक्रोडाचे हारे भरून

ठेवावे तितक्या सहजपणाने माणसांची वाळलेली मुडकी या टोपल्यांत भरून ठेवली होती व अशी अनेक टोपली या झोपडीत लावून ठेवली होती व मानवी हाडाचा एक प्रचड ढीग झोपडीत एका कोपऱ्यात रचून ठेवला होता. एवढच नव्हे तर जेव्हा झोपडीच्या छताकडे आमची दृष्टी गेली तेव्हा आमच्या लक्षात आल की, अनेक मानवी मुडकी दोरखडात ओवून त्याच्या माळा छताला टागून ठेवल्या होत्या ते पाहून मी भयान किकाळी फोडणार तोच मार्टिनन माझ्या तोडावर हात ठेवला व झपाट्याने मला घट्ट धरून तो झोपडीच्या बाहेर आला. मला कापर भरल ते जाईना मार्टिनन मला घट्ट धरलं व झपाझप पावल टाकीत आम्ही परत फिरलो आम्ही त्या झोपडीत शिरलो हे कुणी पाहिल की काय, अशी शका वारवार आमच्या मनात येत होती. ही झोपडी म्हणजे या रानटी लोकाच एक पवित्र स्थान होतं. आमच्यामुळे त्यांच्या पावित्र्याचा भग झाला अस जर त्याना कळल तर मग आमची मुडकीही त्या झोपडीत टागली गेली असती!

या जबरदस्त भीतीन आम्ही सामानाची आवराआवर केली व दुसऱ्या दिवशी पहाटे आम्ही नागापातेची परत जाण्यास परवानगी मागितली त्यान ती आनंदान दिली त्या नरभक्षकाच्या राजाला आम्ही भेटीदाखल काही वस्तू दिल्या व त्याचा निरोप घेऊन व्हाओ बेटावरील आमच्या मुक्कामावर परत आलो.

व्हाओ बेटावर परत आल्यावर मी आणि मार्टिनने दक्षिण समुद्रात जी असख्य रानटी जमातीची बेटं आहेत त्या बेटांवर फेरफटका मारून तिथल्या रानटी लोकाच्या सर्व चालीरीती चित्रित करण्याचा बेत आखला. मालेक्युला बेटावरचा आमचा मुक्काम अत्यत यशस्वी झाला होता आता आजूबाजूच्या बेटावरील जीवन चित्रित करायचं आम्ही ठरवलं व त्याप्रमाणे आम्ही पुन्हा प्रवासाला निघालो.

म्हाताऱ्या झालेल्या माणसाना जिवंत पुरायचा प्रघात व्हाओ बेटातच आम्हाला पाहायला मिळाला. समुद्र किनाऱ्यावर एका झोपडीच्या बाहेर एक म्हातारा रानटी इसम भुकेने व्याकुळ झालेला मी पाहिला. त्याला काही थोडसं खायला द्याव म्हणून मी आमच्या झोपडीवर आले व एका रानटी मुलाबरोबर सध्याकाळी त्याला खायला काही पदार्थ पाठविले. पण त्या आधी झोपडीसमोर खड्डा खणून बेटावरच्या इतर तरुणानी त्या म्हाताऱ्याला जिवत पुरून टाकला होता.

एका बेटावर आम्ही गेलो असताना तिथ आम्हाला एका तरुण मुलीच्या किंकाळ्या ऐकू आल्या. त्या मुलीचे पाय गुडघ्याच्या मागील बाजूस दुमडून त्यात भट्टीत घालून गरम केलेला दगड बाधला होता. त्या वेदना असह्य होऊन ती तरुण मुलगी किंकाळ्या फोडत होती. तिच्या नवऱ्याने तिला भारीत भारी म्हणजे वीस डुकराची किंमत देऊन विकत घेतली होती. ही जास्तीत जास्त किंमत देऊन विकत घेतलेली बायको घरातून सारखी पळून जायची; त्यामुळे तिचा पाय सपूर्ण निकामी आणि अधू करण्याची ही भयानक शिक्षा ती भोगीत होती. आता तिला कधीच पळून जाता येणार नव्हत.

त्या तरुण मुलीच्या वेदना पाहून मला मूर्च्छा आली असावी. कारण मी जेव्हा शुद्धीवर आले तेंव्हा मी मार्टिनच्या खांद्यावर होते.

पाच डुकरापासून पचवीस डुकरापर्यंत किंमत देऊन तरुण मुली विकत घेण्याची या रानटी लोकाची प्रथा होती. जास्तीत जास्त बोकड कापून मेजवानी देण हे मोठेपणाच लक्षण समजल जात असे. एका बेटावर जी रानटी जमात राहात होती त्याच्यात एक अघटित प्रथा होती लहान मूल जन्मल की त्याच डोक नारळाच्या शेडीच्या धाग्यानी ते करकचून आवळून बाधून ठेवीत उद्देश असा की मुलाच डोक गोल होण्याऐवजी लाब, उच आणि अणकुचीदार होत असे ही प्रथा या जमातीत वर्षानुवर्ष पाळली जात होती म्हणून इथल्या रानटी जमातीच्या लोकाची डोकी उंच व टोकाला निमुळती होत गेलेली होती. या लोकाना (Long headed tribes) अस म्हणत. जितक अणकुचीदार डोक तितक अधिक सौंदर्य असा त्या जमातीचा समज होता.

एका बेटावर जे रानटी लोक राहात होते ते तर अगदीच विचित्र होते त्यानी आपल्या शरीरावर नाना तऱ्हेचे रग गोदवून घेतले होते. काळाकभिन्न वर्ण आणि साऱ्या शरीरावरील भडक रगामुळे ते अतिशय भेसूर आणि भयानक दिसत याचे केस इतके राठ होते की, मोरी घासायच्या खराट्यासारखे ते डोक्यावर ताठ उभे असत एका जमातीतील रानटी स्त्रियाना पुढचे दातच नव्हते चौकशी केल्यानतर कळल की, या रानटी लोकात लग्नाच्या वेळी नववधूचे पुढचे दात नवऱ्याने पाडायची प्रथा आहे. त्यामुळे कुठल्याही विवाहित स्त्रीचे पुढचे दात नेहमी पाडलेलेच असत. त्याशिवाय विवाह विधी पुरा होऊ शकत नसे. या बेटावरील पुरुषाची डोकी साधारणपणे सामान्य माणसाच्या डोक्यापेक्षा दुपटीन मोठी होती. एका बेटावर आम्ही आलो व किनाऱ्यावरच्या पायवाटेने थोडस अतर चालून गेल्यानतर आम्हाला आठ-नऊ झोपड्या लागल्या. या झोपड्या गवताच्या व वेड्यावाकड्या आकाराच्या होत्या. त्याच्या मध्यभागी एक म्हातारा रानटी इसम एकटाच नाच करीत तोडाने काहीतरी पुटपुटत होता. त्याची नाच करण्याची तऱ्हा मोठी विचित्र होती. तो आपले एक पाऊल सावकाशपणे वर उचलून पुन्हा सावकाश ते खाली ठेवत होता. नतर तशीच क्रिया तो दुसऱ्या पावलाने करीत होता व घोगऱ्या आवाजात तो काहीतरी गुणगुणत होता. ही त्याची क्रिया सतत चार दिवस चालली होती हे तो कशाकरिता करतो आहे याच समाधानकारक उत्तर आम्हाला कुणीच दिल नाही. पण याच बेटावर पलीकडच्या बाजूला जो एक भयानक प्रकार चालला होता त्याचा आणि या विचित्र नृत्याचा काहीतरी सबध असावा असा आम्ही कयास बाधला.

तो प्रकार पाहून कुणाच्याही अगावर काटा उभा राहिला असता. या झोपड्याच्या पलीकडे जी मोकळी जागा होती तिथे काही वृद्ध रानटी लोक एका धगधगणाऱ्या भट्टीभोवती बसले होते. त्यातील सर्वात वयोवृद्ध रानटी इसम एका काठीवर माणसाच मुडक अडकवून ते त्या भट्टीवर तो रापत होता एखाद्या कुशल जाणकार सोनाराप्रमाणे मोठ्या कौशल्याने त्याच ते काम चालल होतं व बाकीची रानटी वृद्ध मडळी एकाग्रतेने ती क्रिया पाहात होती. आणखी चार मुडकी त्या वृद्धाच्या बाजूला पडली होती त्या मुडक्याना किती शेक द्यायचा व त्याच्यावर किती प्रकारचे सस्कार करायचे ही एक कला

होती. मार्टिनने कुतूहलाने त्या वृद्धाला माहिती विचारली आणि त्यात ती तोडक्या-मोडक्या भाषेत सागितली. ती अशी की—

एखाद्या माणसाचा शिरच्छेद केला की त्याच मुडकं जगलातील विशिष्ट वनस्पतीपासून तयार केलेल्या रसायनात बुडवून ठेवायच, त्यामुळे कातडी चिवट होऊन आगीपासून त्याचा बचाव होतो. त्यानतर रसायनाची त्यावरील क्रिया सपूर्ण झाल्यावर मग त्याला विस्तवावर शेक द्यायचा, म्हणजे त्या मुडक्यातील सगळी चरबी निघून जाते आणि स्नायू चिवट व सपूर्ण कोरडे होतात. मग ते मातीत पुरून त्याना विस्तवाचा शेक देऊन ते भाजायच. या साऱ्या क्रिया एका पाठोपाठ आठवडे न् आठवडे चालतात त्यानतर ही मुंडकी टोपल्यामध्ये अडकवून ठेऊन त्यावर रगरगोटी व सफाईच काम चालत. साधारणपणे नातेवाईक व जवळची मित्रमडळी मेली की त्याची मुडकी कापून भाजतात. सार कौशल्य खर्च करून हे काम चालत व मग ही मुडकी त्याची आठवण म्हणून जतन केली जातात.

ही सारी माहिती त्या वृद्ध जगली माणसाने जेव्हा आम्हाला सागितली, तेव्हा ती सारी मुडकी आम्ही पाहिली. ती सारी मुडकी त्या वृद्धाच्या दीर्घ परिश्रम व कलाकौशल्यामुळे तयार झाली होती. मार्टिनने त्या वृद्ध रानटी माणसाचे अनेक फोटो घेतले व त्या मुडक्यावर क्रिया करण्याच्या पद्धती कॅमेऱ्याने टिपून घेतल्या. रानटी प्रमुखाची मुडकी व धडसुद्धा जतन करून ठेवण्याची त्याची प्रथा होती. त्या झोपडीला "शिरगृह" अशी सज्ञा त्यानी दिली होती. त्या वृद्धान आम्हाला ते शिरगृह दाखवलं शिरगृहातील ती असख्य मुडकी पाहून कुणाचाही थरकाप उडाला असता. मी तर डोळे मिटून घेतले आणि मार्टिनला घट्ट बिलगले.

ज्या बेटात ही प्रथा चालते त्या बेटाच नाव होत 'टॉमन'. दक्षिण समुद्रात जी अनेक बेट रानटी लोकानी व्यापली आहेत त्यापैकी हे एक. या निरनिराळ्या बेटांवरच्या जगली लोकाची हजारो फूट फिल्म मार्टिनने चित्रित केली. पण ही सारी बेटे ब्रिटिशाच्या ताब्यात होती. त्यामुळे या लोकाच्या प्रथा जरी रानटी आणि अमानुष असल्या तरी त्यांच्यापासून आम्हाला फारसा धोका नव्हता. या निरनिराळ्या बेटात आम्ही तीन आठवडे प्रवास करून पुन्हा आम्ही व्हाको बेटावर जेव्हा परत आलो तेव्हा तेथल्या लोकानी किनाऱ्यावर उभ राहून आमच स्वागत केल.

व्हाओला परत आल्यानतर सुमारे दहा-पधरा दिवस आम्ही आमच्या सामानाची आवराआवर करीत होतो. मार्टिनन घेतलेल्या फिल्मचे अनेक पेटारे आमच्या सामानात होते. या भयानक, रानटी, नरभक्षक लोकाच्या सहवासात राहून आम्ही आता विलक्षण कटाळलो होतो. मला तर या वातावरणाचा भयकर उबग आला होता. निरनिराळ्या बेटावरच्या घनदाट अरण्यात राहणाऱ्या या क्रूर मानवाच्या भेसूर चालीरीती, जागोजाग येणारे नरमास भक्षण करण्याचे त्याचे प्रकार या साऱ्या गोष्टीमुळे या वातावरणातून बाहेर पडून घरी जाण्याची विलक्षण ओढ माझ्या मनाला लागली होती. या रानटी नरभक्षक लोकामधून बाहेर पडून आपल्या माणसात जावयाची माझ्याप्रमाणे मार्टिनलाही तळमळ लागली होती. आमची मालेक्युला बेटावरची दुसरी दीर्घ भेट व इतर आसपासच्या बेटावरची आमची सफर अगदी यशस्वी झाली होती. रानटी जीवनाचं सपूर्ण चित्रीकरण मार्टिनच्या कॅमेऱ्यान केल होत.

मी मार्टिनला विचारल,

"आता आपण घरी परत जायचं ना?"

"अवश्य."

सारी आवराआवर करून आम्ही व्हाओचा किनारा सोडला व मजल दर मजल करीत आम्ही आमच्या इडिपेडन्सधील घरी येऊन पोचलो. "दक्षिण समुद्रातील नरभक्षक रानटी लोक" हा आमचा पधरा हजार फूट लाबीचा चित्रपट तयार झाला होता व न्यूयॉर्क मधील "ब्रॉडवे" या चित्रगृहात तो प्रकाशित झाला व प्रेक्षकाच्या या चित्रपटावर अक्षरशः उड्या पडल्या. हा चित्रपट अनेक आठवडे 'हाऊस फुल्' चालत होता. त्यामुळे आम्हाला कीर्तीबरोबर पैसाही मिळाला. आमच्या श्रमाच सार्थक झाल होत. नरभक्षकाच सार जीवन पडद्यावर आणायच मार्टिनच स्वप्न साकार झाल होत.

"दक्षिण समुद्रातील नरभक्षक रानटी लोक" या चित्रपटाच प्रकाशन झाल्यानतर आमचे थोडे दिवस स्वास्थ्याचे गेले स्थिर जीवनात आम्ही पुन्हा येऊन दाखल झालो होतो व विश्रांती घेत होतो.

## : ७ :

मार्टिनच बोलण मी उत्सुकतेन ऐकू लागले—

"बोर्निओ"ला जाण्याच मी नक्की केल आहे ज्याना शिरच्छेदक (Head hunters) अस नाव आहे, अशा तिथल्या रानटी लोकाच चित्रीकरण करण्याच मी ठरवल आहे. माझ्यावर ती जबाबदारी येऊन पडली आहे तुला हे पसत आहे ना?"

"का?" असा प्रश्न मी विचारला पण तस विचारण्याच काही कारण नव्हत. मार्टिनच्या आवडीशी माझी आवड-निवड मी एकरूप केली होती. पण सांगायच झाल तर मला त्या रानटी लोकाची आणि तिथल्या दुर्गंधीची विलक्षण शिसारी आली होती. तरीपण मी म्हणाले, "जरूर आवडेल."

आम्ही सर्वांचा निरोप घेऊन पुन्हा सॅन फ्रॅन्सिस्कोचा किनारा सोडला मजल दर मजल करीत आम्ही बोर्निओच्या उत्तर किनाऱ्यावरील (सदाकन) या बदरात येऊन पोचलो. हे एक मुख्य बदर. इथं दहा हजार लोकाची वसाहत होती. त्यात चिनी, जपानी व मलाई लोकाचा भरणा होता. रस्ते अरुद, घरे लहान. लग्नाची मिरवणूक जितकी थाटामाटाची तितकीच स्मशानयात्राही थाटान काढण्याची इथल्या लोकाची प्रथा होती. गावाबाहेरील एका टेकडीवर एक धर्मोपदेशक राहात होता. तो आपल घर खाली करून जाणार आहे अस आम्हाला कळल. तो गेल्यानतर आम्ही त्याच्या जागेत मुक्काम ठोकला.

सारी माहिती गोळा करून व काही दिवस प्रायोगिक चाचणी

जंगलातील प्रवास सुरू केला. साधारणपणे एकशे चाळीस मैलाचा करून साऱ्या लवाजम्यासह आम्ही एक दिवस उत्तर बोर्निओच्या प्रदेश पालथा घालायच आम्ही ठरवल. या मार्गात बोर्निओतील सर्वात मोठी नदी किनिबटागा होती या नदीच पात्र सुरुवातीला रुंद होत व पुढे ते अरुंद होत गेल होत. या प्रवासात मी जेवढ्या सुसरी पाहिल्या तेवढ्या आयुष्यात कधीही पाहिल्या नव्हत्या नदीच्या किनाऱ्याजवळ येणाऱ्या माणसाना किंवा लहान मुलाना पकडून त्याचा चट्टामट्टा उडवायचा म्हणूनच की काय या असख्य सुसरीचा थवा जेव्हा मला नदीत दिसला तेव्हा सूडबुद्धीन बंदुकीचा नेम धरून एकेका सुसरीला मी यमसदनाला पोचवल.

बोर्निओच्या जगलातील या प्रवासात आम्हाला नाना तऱ्हेच्या भयानक गोष्टी बघायला मिळाल्या. अनेक आपत्तीना व साहसाना धैर्याने तोड द्याव लागल.

एकदा मी मार्टिन व आमचे त्या मुक्कामातले सहकारी होल्म्स अशी आम्ही सारी जण जप्पा मारीत बसलो असताना आमच्या मागच्या दिशेन भयानक गगनभेदी डरकाळी फोडल्याचा आवाज आम्हाला ऐकू आला. आमचे इतर सहकारी व मदतनीस त्या आवाजाच्या दिशेन बदूक घेऊन धावले मार्टिनन आपला कॅमेरा सरसावला. आम्ही आवाजाच्या दिशेनं पुढे जाऊन पोचतो तोंच आमच्या नजरेला जे दृश्य पडल ते अगदी भयानक होत. एका भल्यामोठ्या अजगराने एका प्रचड रानडुकराला विळखा मारून घट्ट आवळून धरल होत. त्यानतर आपला प्रचड जबडा उघडून त्यानं त्या रानडुकराला एका घासात गिळून टाकल. या अजगराची लाबी साडे सत्तावीस फूट होती व रानडुकराचं वजन साधारणपणे दोनशे पौंड असावं.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो प्रचड अजगर दीर्घ निद्रा घेत पडला होता. तिथल्या लोकानी आम्हाला सागितल की आता सहा महिने हा अजगर सुस्त होऊन पडून राहील. गिळून भक्षण केलेल्या रान. डुकराला पचवण्यासाठी त्याला सहा महिने लागणार होते ते भयानक दृश्य पाहून माझी जेवणावरची वासना साफ उडून गेली.

साधारणपणे एकशेचाळीस मैलाचा प्रदेश पालथा घालायच आम्ही ठरवल होत. पण सदाकन सोडल्यापासून आमचा दोनशे पन्नास मैलाचा प्रवास झाला होता. उन्हाचा विलक्षण त्रास होत होता ठिकठिकाणी मुक्काम करीत नाना तऱ्हेच्या वन्य पशूच्या जीवनाच आम्ही चित्रीकरण करीत होतो. पण मार्टिनच्या मनाच समाधान झाल नाही काहीतरी भयानक भेसूर आणि क्रूर त्याला कॅमेऱ्यात टिपून घ्यायच होत. किनिबटागा नदीच्या दुतर्फा घनदाट अरण्य पसरल होत व या अरण्यात हिंस्र श्वापद सचार करीत होती. हे अरण्य इतक घनदाट होत की आमच्या मदतीस व दिमतीस असलेल्या माणसाना वाटेत येणारी झाड किंवा फाद्या तोडून वाट तयार करायला लागत होती. कारण त्याशिवाय इचभरही पुढे सरकता येत नव्हत. आमची चाहूल लागताच त्या अरण्यातली श्वापदं दूर निघून जात. त्यामुळे मार्टिनच्या कॅमेऱ्यात टिपून घेण्यासारखे वन्य प्राणी दृष्टिआड होत. जगली नरभक्षकाचे फोटो व चलत् चित्रपट घेण्याच काम अवघड, जिकिरीच आणि धोक्याच होत. पण ते आम्ही पार पाडल होत. पण वन्य श्वापदाच चित्रीकरण करणं त्याहूनही अवघड झाल होत. प्रत्येक ठिकाणी निराशाच पदरी पडत होती. एका अवाढव्य रानटी माकडाला कॅमेऱ्यात पकडण्यासाठी मार्टिनन जिवाच रान केल. पण शेवटी त्याच्या पदरी निराशा पडली.

बोर्निओच्या जगलातील श्वापद, तिथली रानटी माणसं त्याच जीवन त्याच्या चालीरीती या साऱ्या गोष्टीसाठी मार्टिनन पन्नास हजार फूट फिल्म खर्च केली होती. या साऱ्या फिल्मचं सकलन करून तो चित्रपट प्रकाशित करावा, असं मार्टिनन ठरवल होतं. बोर्निओतील आमचा मुक्काम व जगलातील प्रदीर्घ प्रवास आम्ही आटोपता घेतला. त्याचवेळी मार्टिनला दुःखाची बातमी समजली. त्याची आई इहलोक सोडून गेली होती. ती दुःखद बातमी घेऊन येणारी तार आम्हाला आमच्या मुक्कामावर दोन आठवड्यानतर मिळाली होती.

आमच्या सामानात आता बरीच मोठी भर पडली होती. बोर्निओच्या जगलात पकडलेल्या अनेक पशुपक्ष्यांचे पिंजरे आम्ही बरोबर घेतले होते. आमच्या सामानात एक छोटस प्राणिसंग्रहालय आणि पन्नास हजार फूट चित्रीकरण केलेली फिल्म घेऊन आम्ही परतीचा प्रवास सुरू केला होता.

आम्ही न्यूयॉर्कला परत आलो. 'बोर्निओ जगलातील श्वापद आणि रानटी माणस' हा मार्टिननं तयार केलेला चित्रपट न्यूयॉर्क येथील चित्रपटगृहात प्रकाशित झाला. प्रेक्षकानी त्याच स्वागत केल. आम्हाला यामुळे पैसा व प्रसिद्धी मिळाली. अमेरिकेतील 'एक्स्प्लोरर्स' या जगप्रसिद्ध क्लबच सभासदत्व आम्हाला देण्यात आल तो प्रसग आमच्या आयुष्यातील अत्यत आनदाचा समजला पाहिजे! कारण, हा मान फारच थोड्या लोकाना मिळतो.

सुप्रसिद्ध शिल्पकार व अमेरिकेच्या म्यूझियमचे सचालक कार्ल एकले यांना आम्ही तयार केलेले 'दक्षिण समुद्रातील नरभक्षक' व त्यानतर– 'बोर्निओच्या जगलातील श्वापद व रानटी माणस' हे दोन्ही चित्रपट अतिशय आवडले. त्यानी एक दिवस आमची प्रत्यक्ष गाठ घेऊन आम्हाला जेवणाच आमत्रण केल.

नतर कार्ल एकले मार्टिनला म्हणाले,

"मार्टिन मी तुझ्यावर एक महत्त्वाची कामगिरी सोपविणार आहे"

मार्टिनन उत्सुकतेन विचारल, "कसली कामगिरी?"

"जगलातील श्वापदाच्या प्रतिमा साकार करून ब्रांझ धातूच्या रूपान त्याच चिरकालीन स्वरूप सग्रहालयात ठेवायच हे माझ्या आयुष्याच ध्येय आहे तुम्हीसुद्धा तेच कार्य निराळ्या स्वरूपात करीत आहात तुमच्या कॅमेऱ्यान टिपलेल नरभक्षकाच आणि क्रूर श्वापदाच जीवन जगातील लाखो लोक पडद्यावर पाहू शकतील."

या विषयावर कार्ल एकले बराच वेळ बोलत होते शेवटी त्यांनी मार्टिनला सुचविल किंबहुना त्याची तशी मनापासून इच्छा होती की पूर्व आफ्रिकेच्या जंगलातील वन्य पशू व हिंस्र श्वापदाच्या जीवनाचं व तेथील वातावरणाच आम्ही चित्रीकरण कराव. हे काम अतिशय बिकट आणि धोक्याचं होतं, यात शका नाही.

कार्ल एकले यानी केलेली विनती ताबडतोब मान्य करून आम्ही या नव्या साहसाच्या मागे लागलो. त्यानतर काही महिने प्रवासाची

योजना आखण्यात, पैशाची जमवाजमव व साधनसामग्री गोळा करण्यातच गेले. ही सारी तयारी पूर्ण झाल्यानंतर पूर्व अफ्रिकेतील मोबासा या ठिकाणी आम्ही जायला निघालो. आमच्या सामानान भरलेले सुमारे ८५ खोके व ट्रका आम्ही रेल्वे मार्गाने नैरोबीला पाठविल्या. नैरोबीला आम्ही आमचे मुख्य ठाणे ठेवणार होतो व तेथूनच मोबासाला जाण्याचा आमचा विचार होता.

आम्ही मोबासाला आलो. मोबासा हे ब्रिटिशाच्या ताब्यात असलेल्या पूर्व आफ्रिकेचं बदर. इथ विलक्षण उकाडा होत होता. ब्लेनी पर्सिव्हल नावाचा इसम आम्हाला भेटला, हा एक विलक्षण योगायोगच म्हणायला हवा! कारण, तो आफ्रिकेत वीस वर्षे राहात होता व त्याला पशुपक्ष्यांच्या हालचाली, त्याची वर्गवारी, त्यांच्या सवयी व त्याची वास्तव्याची ठिकाणे याची सपूर्ण माहिती होती. काळवेळाचं बंधन न ठेवता उदार अतःकरणाने सारी माहिती त्याने आम्हाला दिली.

त्याने आणखी एक मनोरंजक माहिती मार्टिनला सागितली नकाशात कोठेही न दाखविलेल अस ते ठिकाण होत. ते म्हणजे नैरोबीपासून पाचशे मैलावर ज्वालामुखी पर्वताच्या पायथ्याशी एक सरोवर होत. त्या भागात पाणी पिण्याच ते एकमेव ठिकाण असल्यामुळे आजूबाजूच्या जगलातील श्वापद त्या तळयावर पाणी प्यायला येत असत. या साऱ्या माहितीमुळे मार्टिनची उत्सुकता पराकोटीला पोचली तो आनदाने म्हणाला,

"तर मग प्रथम आपण त्या तलावाच्या ठिकाणीच जाऊ या!"

ब्लेनीच्या सांगण्याप्रमाणे, नैरोबीपासून तो तलाव पाचशे मैल दूर होता. वाट अतिशय बिकट आणि अवघड होती. त्या तलावाच्या आसमंतात जाण अत्यंत धोक्याच होत. ते सरोवर अॅबिसीनियाच्या सरहद्दीवर होत. ज्वालामुखी जागा झाला की त्या तलावातून आगीचे प्रचड लोळ उठत व त्या पाठोपाठ लाव्हा रस बाहेर पडत असे. एखाद्या मोठ्या कढईत तेल उकळत ठेवाव तसा तो तलाव दिसत असे. या प्रवासात कोणत्याही स्त्रीला घेऊन जाण अर्थातच धोक्याच होत.

ही सर्व धोक्याची आणि भयानक माहिती मिळूनसुद्धा अॅबिसीनियाच्या सरहद्दीवर असलेला तो तलाव पाहण्याचा व त्याच चित्रीकरण करण्याचा बेत आम्ही नक्की केला व त्या तयारीला लागलो.

## : ८ :

अॅबिसीनियाच्या सरहद्दीवर असलेल्या या सरोवराकडे जायचं म्हणजे केसूटच प्रचड वाळवट आम्हाला पालथ घालाव लागणार होतं. या अज्ञात प्रदेशाच्या प्रदीर्घ साहसी प्रवासाची तयारी आम्ही जोरात सुरू केली. मेरूपर्यंत आम्ही आमचे सारे सामान बैलाच्या पाठीवर घालून नेण्याची व्यवस्था केली होती. हे सामान पुढे पाठीवरून उचलून नेण्यासाठी त्या प्रदेशाची माहिती असलेले सुमारे शभर हमाल आम्ही घेतले. त्यापैकी सत्तर लोक मेरूच्या आसपास असलेल्या डोंगराळ प्रदेशात राहणारे होते. हे सारे लोक युद्धावर निघालेल्या सैनिकांसारखे दिसत होते त्यानी अगावर पट्टयापट्टयाचे कपडे घातले होते. शिरस्त्राणाला त्यानी लावलेली शहामृगाची पिस मोठी डौलदार दिसत होती. हे लोक मोठे रुबाबदार व ऐटबाज दिसत होते. या लोकांच्या डोक्यावर सामान देऊन आम्ही पुढील प्रवासाला निघालो. साधारणपणे तीनशे मैल आम्हाला पायी प्रवास करावा लागणार होता. आमच सामान डोक्यावर घेऊन चाललेली माणस व त्या पाठोपाठ आम्ही अशी ही पदयात्रा सुरू झाली होती. प्रवासाच्या पहिल्याच दिवशी रात्रीचा मुक्काम आम्ही वाटेवरील जगलात केला.

आमच्या मार्गातील नद्या किंवा ओढे ओलांडून जाण्याकरिता आम्ही आमच्याबरोबर एक छोटीशी होडी घेतली होती. काही ठिकाणी लाव्हारसान नद्या आटून शुष्क झाल्या होत्या. अशा एका नदीतून एक रात्र व एक दिवस प्रवास करायचा होता. लाव्हारस गोठून त्याची अणकुचीदार टोक जमिनीतून बाहेर आली होती. ती आमच्या बुटांमध्ये घुसून पायाना घर करीत होती. आमच सामान घेऊन अनवाणी चालणाऱ्या आमच्या हमालाच्या पायाची अक्षरशः चाळण झाली होती. डोक्यावर सूर्य तळपत होता व खाली पायाना असख्य सुया टोचल्याच्या यातना होत होत्या. वातावरणातील हवा भट्टीसारखी तापली होती. या प्रखर उन्हामुळे माझ्या अगाची कातडी करपून गेली होती. उष्णतेमुळे डोळे लाल झाले, दुखू लागले आणि या साऱ्या त्रासामुळे हातोडा मारल्यासारख डोक दुखू लागल. मार्टिनने बजावून सागूनसुद्धा आमच्याबरोबर असलेली मालवाहू माणस पाणी भरून घेण्यास विसरली होती त्यामुळे उष्णतेचा हा त्रास असह्य होऊन वारवार सामान खाली ठेवण त्याना भाग पडत होत. हा वाळवटाचा शुष्क प्रदेश शक्य तितक्या झपाट्यान पार करून जाण अत्यत आवश्यक होत. त्यामुळे सामान खाली न ठेवता झपाझप अतर कापण्याचा हुकूम मार्टिनन दिला होता. तसे न केल्यास त्याना चाबकाचे फटके मारण्याची आज्ञा मार्टिनने त्याच्या प्रमुखाला दिली होती. पण हे करायला लागायच्या आतच आम्ही त्या अग्निदिव्यातून सहीसलामत बाहेर पडलो. या साऱ्या धावपळीत माल वाहून नेणारी सारी मडळी तहानेने व्याकुळ झाली होती व त्याचे पाय अक्षरशः पोळून निघाले होते!

हा भयानक वाळवटाचा प्रदेश ओलाडून गेल्यानतर जलाशयाच्या एका साठ्याजवळ आम्ही एक आठवडाभर मुक्काम ठोकला. श्रमाने व दगदगीने थकलेल्या मालवाहू मडळीनी विश्राती घेतली व काही लोक उरलेल जड सामान आणण्यासाठी परत मागे फिरले. सारी जमवाजमव झाल्यानतर आम्ही पुढच्या प्रवासाला सुरुवात केली. हा पुढचा जगलातील प्रवास गेंड्याच्या प्रदेशातून होता. या प्रदेशातली बरीचशी जनावर इतकी कुरूप, घाणेरडी आणि ओंगळ होती की त्याची छायाचित्र घेता घेता मी आणि मार्टिन अक्षरशः कटाळून गेलो.

पण एक दिवस अचानकपणे दृष्ट लागण्यासारखा एक गेंडा आमच्या दृष्टीस पडला. तो अगदी डौलात उभा होता. आजूबाजूच्या नैसर्गिक पार्श्वभूमीवर तो अतिशय रेखीव आणि सुदर दिसत होता. मार्टिनन आपला कॅमेरा सावरला व आम्ही दोघं मिळून त्या गेंड्याचं चित्रीकरण करू लागलो. त्या गेंडाच्या जास्तीत जास्त जवळ जाऊन आम्ही त्याच्या हालचालीच चित्रीकरण करीत होतो. हा फार

मोठा धोका आम्ही पत्करला होता. कारण गेंड्याने जर मुसंडी मारली असती तर त्याने आमची चटणी करून टाकली असती.

आमच चित्रीकरण चालू असतानाच पाठीमागील खडकाच्या मागे दबा धरून बसलेला आणखी एक भरदार गेंडा अचानकपणे पुढे सरसावला आणि क्षणार्धात मार्टिनच्या रोखान या दोन्ही गेंड्यांनी हल्ला करण्याचा पवित्रा घेतला! मार्टिन कॅमेरा सांभाळीत जीव मुठीत धरून पळत सुटला व त्या दोन्ही गेंड्यानी मार्टिनचा पाठलाग करायला सुरुवात केली! हा पाठलाग इतका वेगाचा होता की ते दोन्ही गेंड मार्टिनच्या अतिशय जवळ येवून पोचले होते. पण डोळ्याच पात लवत न लवत तोच मार्टिनन त्याना हुलकावणी दिली व तो बाजूला वळला. मार्टिनच्या दिशेने मुसंडी मारण्यासाठी चाल करून आलेले ते गेंडे तीरासारखे सरळ रेषेत निघून दृष्टिआड झाले. ते दृश्य पाहून मला अक्षरशः कापरं भरल होत. अितक की माझे पाय लटलटा कापत होते व माझे गुडघे एकमेकावर आपटत होते.

मार्टिन माझ्याजवळ येत म्हणाला,

"हल्ला करणाऱ्या गेंड्याच फार सुरेख चित्रीकरण मी आता केल आहे."

मार्टिनच्या प्रसंगावधानाच आणि शांत स्वभावाच मला खरोखरच कौतुक आणि अभिमान वाटला. माझी भीती अजूनही कमी झाली नव्हती. मी मार्टिनला बिलगले तरीही मी कापतच होते!

वाळवटी प्रदेशाचा मार्ग आक्रमीत असताना जळक्या लाकडासारखा दिसणारा, डोळे सुजलेला एक वृद्ध नीग्रो आम्हाला भेटला. याचा चेहरा कुरूप व वेडावाकडा असल्यामुळे तो अतिशय घाणेरडा दिसत होता. पुढील प्रवासात आमच्याबरोबर येण्याची इच्छा त्यानं प्रदर्शित केली. त्याच्या चेहेऱ्यावर नीग्रो जमातीचा अनुभव व एक विशिष्ट खानदानीपणाही दिसत होता. पुढच्या प्रवासात त्याचा आम्हाला बराचसा उपयोग होण्यासारखा होता म्हणून आमच्या प्रवासी पथकात आम्ही त्याला ताबडतोब सामील करून घेतल. नीग्रो जमातीतील लोक या 'इसमाला हत्तीचा छोटा भाऊ' म्हणून ओळखत असत.

हत्तीच्या कळपाबद्दल या निग्रोला बरीच माहिती होती म्हणून त्याच नाव 'हत्तीचा छोटा भाऊ' अस पडल होतं. हत्तीबद्दलची संपूर्ण माहिती मिळणं फार आवश्यक होत व या वृद्ध नीग्रोशिवाय ती कुणाकडेच उपलब्ध नव्हती मार्टिनचा या नीग्रोवर विलक्षण विश्वास बसला.

आमच्या पुढच्या प्रवासात या वृद्ध नीग्रो माणसाने मार्टिनला सावलीसारखी सोबत दिली. नकाशात कुठेही न दाखविलेल्या व या रेताड, वाळवंटी प्रदेशाच्यापलीकडे असलेल ते सरोवर नेमकं कुठ आहे याचा ठावठिकाणा मार्टिननं जेव्हा त्याला विचारला तेव्हा त्या वृद्ध नीग्रोला नीटस काहीच समजल नाही. पण हा वाळवटाचा प्रदीर्घ प्रदेश ओलांडून जाण्यासाठी आम्हाला कमीत कमी कष्ट पडावेत याबद्दल त्यान आम्हाला अपरपार मदत केली; एवढच नव्हे तर या प्रवासाला कमीत कमी वेळ लागण्यासाठी काय कराव हे पण त्यान आम्हाला वेळोवेळी सागितल. केसूटच वाळवट म्हणजे मोठा जिकिरीचा प्रवास होता. कित्येक दिवस या वृद्ध नेत्याच्या देखरेखीखाली आमची पदयात्रा चालू होती. या वाळवंटाची खडान् खडा माहिती त्याला होती म्हणूनच आम्ही या प्रवासातून सुखरूप पार पडू शकलो. हा प्रवास चालू असतानाच आम्हाला चढणीचा मार्ग लागला. हा मार्ग एक दिवसभर आम्ही सतत तुडवीत होतो.

...आणि अचानकपणे आमच्या लक्षात आल की आम्ही एका उंचच उंच कड्यावर येऊन पोचलो आहोत. आमचं लक्ष समोर गेल आणि आमच्यापासून थोड्याच अतरावर असलेल एक सुदर सरोवर आमच्या दृष्टिपथात आल.

साधारणपणे पाव मैल रुदीच व पाव मैल लाबीच ते सरोवर अतिशय रमणीय दिसत होत लाव्हा रस गोठून या सरोवराभोवती सुमारे शभर फूट रुदीचा सुरेख किनारा तयार झाला होता. लव्हा रसाचा झालेला हा किनाऱ्याचा भाग म्हणजे शभर फूट ऊचीचा चढणीचा मार्ग तयार झाला होता. हा मार्ग सपल्यावर आजूबाजूला हिरवेगार अरण्य दिसत होत. तलावाच्या किनाऱ्याभोवती लिलीची फुल उगवली होती. बगळे, सारसपक्षी व इतर अनेक पक्षी आपला पिसारा पसरून या सरोवरात स्वैरपणे विहार करीत होते. याशिवाय जगलातील अगणित पशु-पक्षी या सरोवरात मनोसोक्तपणे जलक्रीडा करीत होते.

त्या सरोवराचं ते नयन मनोहर दृश्य पाहून मी मार्टिनला म्हटल "हे सरोवर म्हणजे खरोखरच स्वर्गलोकातल्या सरोवरासारख वाटत."

या माझ्या उद्‌गारावरून या सरोवराला पुढे 'लेक पॅरडाईज' (नंदनवन सरोवर) अस नाव पडल.

आम्ही आमच्या मुक्कामाची जागा एका उंच कड्यावर मुक्रर केली. तिथून खाली बघितलं की अगदी सहजपणे 'लेक पॅरडाईज' दिसत होत आम्ही मुक्काम ठोकतो न ठोकतो तोच दाही दिशातून हत्तीचा चित्कार आम्हाला ऐकू आला. हत्तीची चीऽऽचीऽऽ असा आवाज इतका प्रचड होता की त्यामुळे आमच्या तबूला हादरे बसत आहेत अस आम्हाला वाटल! आपल्या सोंडेच्या साहाय्याने झाडाच्या फांद्या तोडत व झाडावरची कोवळी पाने खात हत्तीचा प्रचड कळप पाणी पिण्यासाठी सरोवराकडे येत होता.

दुसऱ्या दिवसापासून मार्टिनने हत्तीचा सपूर्ण जीवनक्रम चित्रित करण्याच्या कामास सुरुवात केली. हत्तीच्या खुद्द घरात आम्ही येऊन पोचलो होतो व आता या निसर्गरम्य सरोवराच्या भोवतालच्या जगलात वास्तव्य करून असलेल्या मदमस्त हत्तीच जीवन पडद्यावर आणायच मार्टिनन ठरविलं होत.

'लेक पॅरडाईज'ला आम्ही तीन महिने राहिलो. हा प्रदेश म्हणजे शतकानुशतकाची हत्तीची मायभूमी. या आजूबाजूच्या जगलात हत्तीचे प्रचड कळप वस्ती करून राहिले होते. या सरोवरावर त्याची सारखी ये–जा चालू असे. आमच्या तीन महिन्याच्या वास्तव्यात आम्ही 'लेक पॅरडाईज'च्या आसमतातील अनेक हिंसक श्वापदाच जीवन चित्रित केल. हत्तीच्या कळपाचे, त्याच्या हालचालीचे, त्याच्या क्रूरतेचे अनेक क्षण व प्रसग आमच्या कॅमेऱ्यान टिपून घेतले.

लेक पॅरडाईजचा मुक्काम संपवून आम्ही नैरोबीला जेव्हा परत

आलो तेव्हा आमच्या लक्षात आलं की आमच्या जवळची सारी फिल्म व बहुतेक सार द्रव्य खर्च झालं आहे.

पण मार्टिनच्या मनात काहीतरी वेगळचाच कल्पना, वेगळी स्वप्नं तरळत होती. त्याला मी जेव्हा विचारल तेव्हा तो म्हणाला,

"लेक पॅरडाईज 'ला जाऊन चार वर्ष तरी राहण्याची माझी योजना आहे आधुनिक यत्रसामग्री व उत्कृष्ट चलत्-कॅमेऱ्याच्या साहाय्यान तिथल्या सरोवराभोवतालच्या जगलातील साऱ्या वन्य पशूच सपूर्ण जीवन चित्रित करायच माझ्या मनात आहे."

'लेक पॅरडाईज 'ला परत जाण्याच स्वप्न मनात तरळत असतानाच आम्ही नैरोबीहून निघालो व मायदेशी दाखल झालो. आमच्या या योजनेला भरपूर द्रव्य साहाय्याची आवश्यकता होती. चार वर्ष 'लेक पॅरडाईज 'ला राहायच म्हणजे पैसा उभा करायला हवा होता. त्या करिता रोचेस्टरला जाऊन कोडॅक कपनीचे सचालक जॉर्ज ईस्टमन यांना भेटायच आम्ही ठरविल व त्याप्रमाणे आम्ही त्यांना भेटलो.

: ९ :

"मला माझे विचार तुमच्यासमोर नीटसे माडता येत नाहीत. कसलाही धोका पत्करून आत्तापर्यंत कुणीही जे पडद्यावर दाखवू शकलं नाही ते मी दाखवल. यातच मी माझ्या जीविताच सर्वस्व मानतो"

मार्टिन बोलत होता. ईस्टमन लक्ष देऊन ऐकत होते.

"मला वाटत की 'लेक पॅरडाईज् 'ला प्रदीर्घ काल राहून तिथल्या आजूबाजूच्या जगलातल्या वन्य पशूच्या जीवनक्रमाचं सपूर्ण चित्रीकरण करण्याची माझी कल्पना तुम्हाला आवडेल. मी तुमच्याकडे फक्त पैसे मागण्याच्या हेतून आलो नसून माझ्या कल्पनेत तुम्ही सहभागी व्हावं, मला पाठिंबा द्यावा, अशी माझी इच्छा आहे."

ईस्टमननी मान डोलावली तेव्हा मी पण आमच घोडं पुढे रेटल,

"तुम्हाला जर हे पसंत पडल तर, मला वाटत, तुम्ही जरी पैशाची मदत केली नाही, तरीसुद्धा आम्ही या कार्यासाठी पैसा कसा उभारावा याच तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करू शकाल."

थोडा वेळ थाबून व विचार करून ईस्टमन म्हणाले,

"म्हणजे याचा अर्थ मी असा करायचा का, की मी जर या तुमच्या कल्पनेला आर्थिक सहाय्य केल तर मला त्यावर काहीही नफा तर होणार नाहीच, उलट ते पैसे परत करण्याच नक्की आश्वासनही तुम्ही देऊ शकणार नाही ?"

मार्टिन म्हणाला,

"तुम्ही जर पैसे दिलेत तर अल्पशा व्याजासह ते परत करण्याची मी हमी घेतो. कारण चार वर्षं 'लेक पॅरडाईज् 'ला राहायच म्हणजे अमाप पैसा खर्च करावा लागेल. या माझ्या कार्याची ज्यांना खरोखरच किमत वाटेल तेच यासाठी मदत करतील. फक्त धदा म्हणून गुतवणूक करण्यासाठी मला कोणीही पैसा देणार नाही."

"तुमचा हा स्पष्टवक्तेपणा मला अतिशय आवडला."

ईस्टमन हसत हसत म्हणाले व खुर्चीवरून उठून ते खिडकीपाशी गेले व मार्टिनकडे पाहात म्हणाले,

"आपली स्वप्न साकार करण्यासाठी जिवाचं रान करणारी ध्येयवादी कर्तबगार माणस मला अतिशय आवडतात. तुमच्या या योजनेसाठी मी दहा हजार डॉलर्सची मदत करण्यास तयार आहे, एवढच नव्हे, तर माझ्या नावाचा उपयोग करून तुम्ही आणखी काही कर्ज उभं केलत तरी माझी त्याला हरकत नाही."

ईस्टमन याच्याकडून आम्ही जेव्हा परत जाण्यास निघालो तेव्हा माझे आणि मार्टिनच हृदय आनदान उचबळून आल होत. त्यांच्या भव्य प्रासादाच्या पायऱ्या उतरून आम्ही खाली आलो तेव्हा पाऊस सुरू झाला होता. एखादा शुभशकुन व्हावा तद्वतच पावसान आमच्यावर वृष्टी सुरू केली या पावसाला आणि ईस्टमन याना मी मनात धन्यवाद दिले आणि न्यूयॉर्ककडे जाणाऱ्या गाडीत आम्ही बसलो.

जॉर्ज ईस्टमन याचं आम्हाला भरपूर आर्थिक साहाय्य मिळाल. एवढच नव्हे तर त्यांच्या नावाचा उपयोग करून आमच्या 'लेक पॅरडाइज् 'च्या कार्यास, तीन-चार वर्षांच्या वास्तव्यास व इतर साधनसामग्रीस उपयोगी पडेल इतका पैसा आम्ही जमा केला व १९२४ सालच्या एप्रिल महिन्यात आम्ही लेक पॅरडाइज्कडे प्रयाण केलं. आमच्या बरोबर आम्ही भरपूर सामान घेतल होत. नैरोबीहून 'लेक पॅरडाइज् 'चा पाचशे मैलाचा मार्ग जेव्हा आम्ही आक्रमू त्यावेळी आमच्याजवळ सहा मोटारगाड्या, चार लॉरीज्, पाच वॅगन्स व दोनशे-चौतीस स्थानिक हमाल होते. या साऱ्या प्रचड सामानाच वजन आणि या अफाट पसाऱ्यामुळेच आम्ही भारावून, खचून जातो की काय, अस आम्हाला वाटू लागल ! हा सारा प्रवास अत्यत जिकिरीचा आणि कष्टाचा झाला व अखेर आम्ही 'लेक पॅरडइज् 'ला येऊन पोचलो.

आम्ही तेथे जाऊन पोचतो न पोचतो तोच मुसळधार पाऊस कोसळू लागला जणु काय आकाश फाटल होत. त्यामुळे आम्हा सर्वांचीच त्रेधातिरपीट उडाली. आमची सारी माणस उघड्यावर पडली. त्याना निवाऱ्याची जागासुद्धा मिळेना. आम्ही आमच्या निवासासाठी, लॅबोरेटरीसाठी पक्क्या इमारतीच बाधकाम सुरू केल मार्टिनच्या फिल्म्स, फोटो डेव्हलप करण्यासाठी एक डार्क-रूमही बाधून काढली या साऱ्या इमारती माती व शेणाच मिश्रण करून आम्ही बांधून काढल्या व त्यावर वाळलेल्या गवताच छप्पर घातल. हा आमचा सारा व्याप म्हणजे एक प्रचड वसाहतच तयार झाली होती. मातीच्या भिंती व गवताची छपर असलेल्या आमच्या झोपड्या, आजूबाजूला आम्ही तयार केलेला बागबगीचा मोटारी, ट्रक्स, बैलगाड्या, गायी, उट, कोंबड्या आणि गाढव या आमच्या वसाहतीच दृश्य म्हणजे कुणालाही एक अजबखानाच वाटला असता, आमच्या झोपड्याच्या परिसरान मी भाजीपाला लावला होता व त्याची देखभाल करण्यात माझा रिकामा वेळ मी घालवत असे.

आमच्या 'लेक पॅरडाइज् ' येथील प्रदीर्घ मुक्कामात ऋतुमानावरूनच किती काळ लोटला याची आम्हाला कल्पना येत असे. पावसाळ्यात जेव्हा येथील ओसाड प्रदेशात भरपूर पाणी असे त्यावेळी काळवीट, सारग, जिराफ, झेब्रा या प्राण्याच्या जीवनाचं चित्रीकरण

आम्ही करीत होतो. उन्हाळयाच्या दिवसात जंगलात भटकून पाण्याचे झरे आम्ही शोधून काढत होतो व तेथे येणारे रानरेडे, गेंडे व हत्ती याच चित्रीकरण आम्ही करीत होतो. अत्यत शांतपणे आणि तासन् तास कॅमेरा लावून तपश्चर्या करीत या साऱ्या प्राण्याच जीवन आम्ही आमच्या कॅमेऱ्यान टिपून घेत होतो. हा आमचा कार्यक्रम अखडपणे कित्येक दिवस, कित्येक महिने चालू होता.

आमच्या बरोबर असलेला वृद्ध नीग्रो–ज्याला 'हत्तीचा छोटा भाऊ' म्हणत त्याला हत्तीच्या कळपाची, त्याच्या जीवनाची सपूर्ण माहिती होती तो–मार्टिनला व मला हत्तीच्या हालचालीची इत्यभूत माहिती सागत असे. आफ्रिकेतल्या इतर कुठल्याही नीग्रोपेक्षा याला हत्तीसबधी सपूर्ण ज्ञान होत त्यान सागितलेल्या गोष्टीवर प्रथम आमचा विश्वास बसला नाही. डोळे अर्धवट उघडे ठेऊन तो ओठातल्या ओठात जे काही पुटपुटत असे त्याचा प्रथम आम्हास काहीच अर्थबोध होत नसे; पण नतर त्याच्यावर आमचा सपूर्ण विश्वास बसला. जंगलातल्या ज्या वाटेन हत्ती गेला असेल ती वाट हा नीग्रो इसम बरोबर शोधून काढीत असे. रानातल्या ज्या वाटेन हत्ती गेला असेल तिथ त्याच्या पायाच्या ठश्यावरून व त्याचा पाय पडून मोडलेल्या व वाकलेल्या गवताच्या काड्यावरून तो नीग्रो इसम हत्तीचे बरोबर वर्णन करीत असे व हत्ती ज्या गवतातून चालत गेला असेल त्या गवतावरून त्यापूर्वी किती वेळा तो तिथून गेला असेल याचाही तो बरोबर अदाज करी. झाडाच्या मोडलेल्या किंवा वाकलेल्या फाद्यावरून हा वृद्ध नीग्रो हत्तीचा कळप तिथून केव्हा गेला व कुठल्या दिशेन गेला हेही बरोबर ओळखत असे. या माहितीचा आम्हाला फारच उपयोग झाला.

हत्तीच्या कळपाचा मागोवा घेताना त्याच्या हालचालीचा अभ्यास करून त्याच चित्रीकरण करताना आम्हाला नाना तऱ्हेचे अनुभव आले. आमच्या वृद्ध नीग्रो वाटाड्याच्या मनात हत्तीबद्दल नितान्त आदर होता. हत्ती हा सर्व प्राण्यांत अतिशय बुद्धिमान, राजेशाही आणि आपली आब राखून जगलात राहणारा अत्यत बलाढ्य प्राणी. हत्ती आपल जीवन सथपणे, रेखीव आणि वक्तशीरपणे जगतात. ते इतर प्राण्यानाही जगलात सुखाने जगू देतात. कुणाच्याही भानगडीत पडत नाहीत. मात्र त्यांना कुणी त्रास दिला किंवा छेडल तर याच्यासारखा वाईट प्राणी नाही. हत्ती आपापसात क्वचितच दगल करतात. कळप करून राहण आणि आपल्या कळपाशी एकनिष्ठ राहण याचं त्यांना अगदी जन्मल्यापासून वळण असत इतकंच नव्हे तर आपल्या आई-वडिलाच्या आज्ञेत वागण्याची शिस्त त्यांना जन्मतःच दिली जाते. शिस्तबद्धता, आज्ञाधारकपणा व कळपाशी एकनिष्ठता हे हत्तीचे गुण वाखाणण्यासारखे आहेत.

मार्टिनला आणि मला जनावर पाळायची विलक्षण हौस. इथे 'लेक पॅरडाईज'ला आल्यापासून ही हौस जास्तच वाढली. आम्ही आमच्या इथल्या मुक्कामात जगलातील अनेक प्राणी पकडून ते पाळले होते. पण हत्तीच पिल्लू पकडून ते पाळण्याचे आमचे सारे प्रयत्न अयशस्वी झाले !

उन्हाळयाच्या दिवसात–एके दिवशी एक हत्तीण आपल्या पिल्लाला पाणी पाजण्यासाठी चाललेली आम्ही पाहिली. या हत्तीणीचा आणि पिलाचा पाठलाग केला. मला वाटतं पाणी पिण्यासाठी बाहेर पडण्याचा त्या पिल्लाचा तो पहिलाच प्रसग असावा. हत्तीण पुढे चालली होती आणि ते पिल्लू वरच मागे पडल होत व ते मोठ्या नाखुशीनं आणि नाईलाजान आईच्या पाठोपाठ जात होत. अनेकदा ओरडूनसुद्धा पिल्लू मागे पडत आहे हे पाहून त्याच्या आईला राग आला. तिनं त्या पिल्लाचा कान आपल्या सोडेत पकडून त्याला पाणी पिण्याच्या ठिकाणी आणलं आणि खाली पाडून आपल्या एका पायान त्याला घट्ट पकडून सोडेत पाणी घेऊन पिल्लावर पाण्याचा वर्षाव सुरू केला. त्या पिल्लान आपला जबडा उघडून थडगार पाण्याचा वर्षाव झाल्यामुळे आनद व्यक्त केला. मग ते पिल्लू मुकाट्यान उठल व एखाद चुकलेलं मूल जस आईचं बोट धरून निमूटपणे रस्त्यातून चालायला लागतं त्याप्रमाणे त्या पिल्लान सोडेन आपल्या आईची शेपटी पकडली व ते मुकाट्यान आईच्या पाठोपाठ जाऊ लागल !

एके दिवशी जगलात चार हत्तीणी आपल्या पिल्लांना सोडेनं आवाज कसा करायचा याच शिक्षण देत होत्या ! प्रत्येक हत्तीणीपुढे तिच पिल्लू उभ करून क्रमाक्रमानं एकेक हत्तीण सोड उंच करून उच स्वरात आवाज काढून हाक मारण्याच शिक्षण आपापल्या पिल्लाना देत होती. वर्गात शिक्षक आपल्या विद्यार्थ्याला शिकवतात तस हे दृश्य दिसत होत. पद्धतशीरपणे प्रत्येक आई एका पाठोपाठ सोड उच करून आवाज काढून हाक मारत होती व ती पिल्लं आपल्या मातांच अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत होती. शिक्षणाचा हा 'क्लास' फारच नाविन्यपूर्ण व मनोरंजक होता ! त्या पिल्लांची अनुकरण करण्याची पद्धत पाहून आम्हाला इतकं मोठ्यानं हसू आल की ते आवरण आम्हाला कठीण झाल. आमची चाहूल लागताच 'शाळा सुटल्या'ची सूचना त्या हत्तीणीनी पिलांना दिली व क्षणार्धात ती सारी मडळी जगलात अदृश्य झाली ! !

आमच्या 'लेक पॅरडाईज'च्या वास्तव्यात हत्तीच्या जीवनाच चित्रिकरण करण्यात फारच वेळ खर्ची पडला. एवढे सारे कष्ट घेऊन फक्त एका हत्तीच सपूर्ण जीवन आम्हाला चित्रित करता आल हत्तीच्या कळपाची, त्याच्या पिल्लाची व त्याच्या निरनिराळ्या खेळांची आम्ही अनेक छायाचित्रे घेतली, ही गोष्ट निराळी.

खवळलेल्या चवताळलेल्या हत्तीचं चित्रिकरण करण्यास देखील आम्ही फारच उत्सुक होतो, पण ते काम फारच अवघड आणि धोक्याच होत तरीपण एक दिवस जगलातून कळपानं जाणाऱ्या हत्तीपैकी आम्ही एकाला मुद्दाम डिवचण्याचं ठरविल होत. मी कॅमेरा चालू ठेवायचा आणि मार्टिनने त्या हत्तीला चिडवायचं व खवळलेल्या त्या हत्तीच मी चित्रीकरण करायचं, असा बेत नक्की झाला.

जगलात आमच्या कॅमेऱ्यासह आम्ही दबा धरून बसलो होतो व अचानकपणे हत्तीचा एक कळप आमच्या नजरेस पडला. मी आणि मार्टिनने सावधपणे त्या कळपाच्या मागून जाण्यास सुरुवात केली. मी कॅमेरा घेऊन सज्ज होते. मार्टिननं मला मागे राहण्याची सूचना दिली आणि तो स्वतः पुढे सरसावला. मला वाटत, त्या हत्तीच्या कळपाला आमची चाहूल लागली असावी; कारण, अचानकपणे त्या


कळपातल्या सर्वांत बलाढ्य अशा एकानं झटकन् पाठ फिरविली, आपले कान टवकारले, आपली जळजळीत नजर मार्टिनवर रोखली व आपले सुळे पाजळत डूक धरल्यागत त्यानं मार्टिनकडे झेप घेतली ! माझा कॅमेरा चालू होता. मार्टिननं जीव मुठीत धरून पळण्यास सुरुवात केली. सर्वसाधारणपणे असा हल्ला झाला की आमच्या बंदुका उंच करून व मोठमोठ्यानं आरडाओरडा करून आम्ही तो परतून लावत असू. पण हा हत्ती फारच खवळला होता ! आमच्या ओरडा-ओरडीला धूप न घालता मार्टिनवर केलेली चाल त्यानं चालूच ठेवली. मार्टिन त्याला हुलकावणी देत त्याचा हल्ला चुकवीत होता. प्रत्येक वळणावर व हुलकावणीला दाद न देता त्यानं मार्टिनचा पाठलाग चालूच ठेवला ! आणि हे दृश्य पाहून बाकीच्या हत्तींनी आपल्या पुढाऱ्याचं अनुकरण सुरू केलं. कळपातील साऱ्या हत्तींनी आपल्या बलाढ्य नेत्याच्या पाठोपाठ मार्टिनकडे आपला पवित्रा वळविला ! ...

ते दृश्य पाहून माझ्या अंगाचा थरकाप उडाला ! कुठल्याही क्षणी त्या मदोन्मत्त हत्तीचे सुळे मार्टिनच्या अंगात घुसले असते. मी कॅमेरा चालूच ठेवला होता व मार्टिनला वाचवण्यासाठी जोरजोरानं किंकाळ्या मारीत होते. खवळलेल्या हत्तींच्या कळपानं मार्टिनच्या क्षणार्धात चिंधड्या उडविल्या असत्या. क्षणार्धात मी कॅमेरा बंद करून माझ्या मागे उभ्या असलेल्या मदतनिसांच्या हातात असलेली बंदूक हिसकावून घेतली व मार्टिनचा पाठलाग करत असलेल्या त्या मस्तवाल हत्तीच्या गंडस्थळावर नेम धरून बंदुकीचा चाप ओढला. बंदुकीच्या आवाजानं सारं रान दुमदुमून गेलं व हत्तीचं ते धूड खाली कोसळलं ! आपला पुढारी कोसळलेला पाहून कळपातल्या बाकीच्या साऱ्या हत्तींनी आपला मोर्चा आवरला व वाट फुटेल त्या दिशेनं ते पळत सुटले. ...

त्या भयानक प्रसंगाचा माझ्या मनावर विलक्षण ताण पडला. आम्ही संकटातून मुक्त झालो या जाणिवेनंतर माझ्या अंगातलं सारं त्राण नाहीसं झालं. माझ्या हातातली बंदूक गळून पडली व मी धडपडत एका खड्ड्यात जाऊन कोसळले ! मार्टिन धावतच माझ्याजवळ आला व त्याने मला वर काढलं. माझं सारं अंग चिखलानं माखलं होतं. ...

## : १० :

लेक पॅरडाइज्च्या वास्तव्यात अनेक चित्तथरारक गोष्टी आमच्या अनुभवास आल्या. आजूबाजूच्या जंगलातील साऱ्या वन्य पशूंचं जीवन मार्टिन आपल्या कॅमेऱ्यानं टिपून घेत होता. आमच्या या मुक्कामात आम्हाला मुद्दाम आवर्जून भेटायला आलेली मंडळी म्हणजे राजघराण्यातील ब्रिटिश सरदार व त्यांची पत्नी. त्यांनी जंगलातील जीवनात एक दिवस आमच्या सहवासात काढला. पुढे या दांपत्यानं सार्वभौम सत्ता असलेल्या इंग्लंडचे सिंहासन भूषविलं. त्याचप्रमाणे कोडॅक कंपनीचे चालक जॉर्ज ईस्टमनसुद्धा आमच्यात येऊन काही दिवस राहिले होते. एवढंच नव्हे तर ते आमच्या जीवनाशी समरस



अफ्रिकेतील पहिली सफर १९२१
ओसा आणि तिने पाळलेला झेब्रा

झाले होते. ते येणार असं कळल्यावर त्यांच्यासाठी आम्ही सर्व सुख-सोईंनी युक्त अशी एक झोपडी मुद्दाम बांधवून घेतली होती. ईस्टमननी आमच्याबरोबर जंगलात हिंडून तिथलं आजूबाजूच्या वन्य श्वापदांचं जीवन न्याहाळलं. एवढंच नव्हे तर, आपल्याबरोबर आणलेल्या कॅमेऱ्यानं त्यांनी अनेक छायाचित्रं घेतली. विशेषत: सिंहांची छायाचित्रं व चलत् चित्रपटही घेतला. ईस्टमन यांच्या या वास्तव्यात सुप्रसिद्ध शिल्पकार व अमेरिकेच्या म्युझियमचे प्रमुख कार्ल एकले हे देखील सामील झाले होते. आम्ही जंगलात जाऊन सिंहांच्या गुहांचा शोध घेत असतानाच आमच्यापासून फक्त दहा-बारा यार्डांच्या अंतरावरून, एक नव्हे तर एका पाठोपाठ बारा सिंह निघून गेले. त्यांनी आमच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहिलं नाही. ते दृश्य पाहून मार्टिनचा आणि जॉर्ज ईस्टमन यांचा चलत् कॅमेरा चालू झाला. आमच्या बरोबर कार्ल एकले पण होते. ते दृश्य पाहून त्याचं चित्त थरारून गेलं.

१६ मे, १९२७ रोजी आम्ही न्यूयॉर्कला परत आलो. लेक पॅरडाइज्च्या वास्तव्यात घेतलेल्या हजारो फूट फिल्म व छायाचित्रांवर

आता सस्करण करायचं होत. या आमच्या फिल्मला व छायाचित्रांना एक लाख डॉलर्सपर्यंत मागण्या येऊ लागल्या. आमच्या चार वर्षांच्या प्रदीर्घ तपश्चर्येचं हे फळ होत. आम्ही सारे आठ-नऊ महिने न्यूयॉर्क-मध्ये राहून 'लेक पॅरडाइज्' फिल्मची सारी कामं पुरी केली.

आता सिंहाच्या सपूर्ण जीवनाच चित्रीकरण करण्याच मार्टिनच्या-मनानं घेतलं.

सिंहाच्या जीवनाचं चित्रीकरण करण्यासाठी आम्ही नैरोबीला मुक्काम करायचं ठरविलं. नैरोबीच्या आसपासच्या जगलात सिंहांच वास्तव्य होत. नैरोबीपासून चार मैलाच्या अतरावर आम्ही एक निवासस्थान निश्चित केल. हे घर फारच सुरेख होत. करड्या रंगाच्या दगडाचं बाधकाम केलेली ही वास्तू आम्हाला फार पसत पडली. दक्षिणेस बर्फाच्छादित किलिमांजारोच्या पर्वतांची शिखरं आणि उत्तरेस केन्या पर्वताची रांग.

सिंहांच जीवन चित्रित करण्यासाठी आम्ही एक वर्ष घालवल. टांगानिकातील पाचशे मैलांच्या प्रदेशात अगणित सिंह होते. तो प्रदेश म्हणजे सिंहाची गुहाच होती. सिंहाच्या गर्जना सारख्या चालू असत. आमचं जीवन सिंहमय झाल होत. सुरुवातीला आम्हाला या सिंहाची फारच दहशत वाटली. पण नतर आम्ही त्या वातावरणाला, त्यांच्या सहवासाला सरावलो. इतकच नव्हे तर या जातीवर आमचं विलक्षण प्रेम बसल.

सर्वसाधारणपणे सिंह हा अत्यत समजुतदार प्राणी आहे. त्याचा बराचसा वेळ जंगलात फेरफटका मारण्यात आणि निद्रा घेण्यातच जातो. आपल्या घरातली माजरी जशी खेळकर तसा सिंह हा खेळकर. त्याला खेळायची आणि बागडायची अतिशय हौस. तो आपल्या उद्योगातच रमून जातो. तो कुटुब-प्रमुख या नात्यानं आपल्या गुहेतील कुटुंबियातील मडळीची काळजी घेतो व जातीने आणि जबाबदारीने त्यांच्याकडे लक्ष देतो. सिंहाचं पिल्लू लहानपणा-पासून आपल्या सवगड्यांत खेळतं–बागडतं व नंतर ते तारुण्यात आल की एखाद्या सिंहिणीशी त्याचा सबध येतो आणि मग तो कुटुब-वत्सल प्राणी बनतो. सिंह म्हातारा झाला की आपल्या कुटुबात व मित्र-मडळीत वावरण्यास तो नालायक ठरतो. त्यावेळी त्याला कळपातील सारे सिंह हाकलून लावतात. मग तो एकटाच एकाकी-पणे आपल भक्ष्य शोधत हिंडतो. हे म्हातारे एकाकी सिंह नरभक्षक आणि क्रूर होऊन जे मिळेल ते भक्षण करतात.

सिंहाला भूक लागली की तो शिकार करतो. उगीचच कुठल्याही प्राण्याच्या वाटेला तो कधीच जात नाही. स्वसरक्षणासाठी मात्र तो आपले प्राण पणाला लावतो. मग तो कशाचीही पर्वा करीत नाही. चारशे ते पाचशे पौंड वजन असलेला हा प्राणी जंगलचा राजा समजला जातो. तो इतर कुठल्याही बलाढ्य प्राण्याला आपल्या सामर्थ्यवान पज्यांच्या तडाख्याने अर्धमेला करू शकतो किंवा एका झेपेसरशी कर्दनकाळाला अशा आपल्या जबड्यात कुठल्याही प्राण्याच्या नरडीचा घोट घेऊ शकतो.


एके दिवशी सध्याकाळचा सारा वेळ आम्ही चौदा सिंहांच्या सहवासात घालवला. आम्ही आमच्या लवाजम्यासह मोटार गाड्यां-तून सिंहांच्या वसाहतीत पोहोचलो. आमच्या आजूबाजूला चौदा सिंह मजेत एकमेकाशी खेळत होते. त्यांनी आमच्या मोटारीकडे मुळीच पाहिल नाही. आम्ही त्याची अनेक छायाचित्रं घेतली. तासन् तास ते एकमेकांशी खेळत, थट्टामस्करी करीत होते. खेळून दमल्या-नतर ते पाठीवर लोळत, पाय हवेत हलवीत ठेवत, मोठमोठ्याने डरकाळ्या फोडत होते. इतक्या सलोख्याने एकमेकांशी खेळणारा चौदा सिंहांचा ताडा आम्ही प्रथमच पाहिला.

सिंहाचा हा स्वैर सचार पाहून व अनेक छायाचित्रं घेऊन झाल्या-नंतर मी स्टार्टरवर पाय दाबून गाडी सुरू केली. त्यांचा खेळ पहायच सोडून अस आम्ही मध्येच जाऊ लागलेलं पाहून त्या चौदा सिंहां-पैकी एकाला, मला वाटत, बहुधा राग आला असावा ! तो आमच्या-वर खवळला व आमच्या गाड्याचा त्यान पाठलाग सुरू केला. त्यान असा पाठलाग करण आम्हाला धोक्याच होत. आमच्या सुरक्षित-तेच्या दृष्टीनं आम्ही आमच्या मोटारी थावविण इष्ट होत. आम्ही मोटार थाववली व मार्टिनने आपली बंदूक त्या सिंहावर रोखून धरली. आमचा हा पवित्रा पाहून त्या सिंहाला आश्चर्य वाटल. तो गुरगुरू लागला व आमच्या मोटारीच्या टायरचे चावे घेण्यास त्यानं सुरुवात केली. एखादं लहान मूल रबरी चेंडूशी खेळत त्याप्रमाणे तो टायरशी खेळू लागला. बाकीचे सारे सिंह त्याच्या-भोवती जमले व त्याचा हा खेळ पाहू लागले. मार्टिन बदूक रोखून सज्ज होता. आता अशा परिस्थितीत फार वेळ थावणं धोक्याचं म्हणून मी गाडी सुरू केली. त्या आवाजान व गाडीतून येणाऱ्या धुरामुळे त्या सिंहाच कुतूहल जागं झाल. त्या सधीचा फायदा घेऊन मी गाडी भर वेगात चालू केली व आम्ही मुक्कामावर येऊन हजर झालो !

टांगानिकातील सिंहाच जीवन चित्रित केल्यानतर आम्ही १९२९ मध्ये बेल्जियन कॉंगोमध्ये जाऊन तेथील पिग्मी लोकाच्या जीवनाच दर्शन घडविणारी छायाचित्रं व चलत् चित्रपट तयार केला व त्या-नंतर तिथेच आणखी काही महिने वास्तव्य करून गोरीला वानरांच्या अनेक जातीची माहिती गोळा करून त्यांचा शोध घेतला व या जातीच्या निरनिराळ्या–वानराच जीवन आम्ही चित्रित केल.

१९३२ साली मी आणि मार्टिनन वैमानिक शिक्षण घेतल व दोन, छोटी विमान आम्ही विकत घेतली. या विमानातून फोटो घेण्यासाठी आम्ही एक कॅमेरा मुद्दाम तयार करून विमानात बसवून घेतला होता. आफ्रिकेच्या जगलावरून या विमानातून सुमारे साठ हजार मैलांचे उड्डाण आम्ही केलं. डोगर, नद्या, पर्वत, घनदाट अरण्यं, हत्तीचे कळप, हरण, जिराफ अशा नाना तऱ्हेच्या प्राण्याचे आम्ही आकाशातून उड्डाण करीत चित्रीकरण केल. एखाद्या अत्यत अवघड ठिकाणीही आम्ही आमचं विमान उतरवू शकत होतो. अत्यत बिकट, निर्जन ठिकाणी जिथं कुणीही सहसा पोचू शकत नसे अशा ठिकाणी आम्ही आमच्या छोट्या विमानातून जात होतो, छायाचित्रं घेत होतो.

आमच्या या छोट्या दोन विमानापैकी एकाच विमानाचा उपयोग करून मी आणि मार्टिनन पुन्हा बोर्निओला जायच ठरविल. तिथ आम्ही चौदा महिने राहून तियल्या नद्या, घनदाट अरण्यं व तिथले रानटी लोक याच जीवन आम्ही चित्रित केल. मार्टिननं या वास्त-



**टांगानिकातील मुक्कामात जंगलच्या राजाची शिकार. उत्कृष्ट शिकारीबद्दल ओसा जॉर्ज ड्रायडेनचे अभिनंदन करताना**

व्यात तयार केलेले चित्रपट व छायाचित्रं पाहून साऱ्या रसिक प्रेक्षकांनी आणि टीकाकारांनी त्याची प्रशंसा केली. मार्टिननं छायाचित्रणाच्या कलेत उच्चांक गाठला आहे, असं रसिक प्रेक्षकांचं आणि टीकाकारांचं मत पडलं.

अमेरिकेत ठिकठिकाणी स्वत: तयार केलेले चित्रपट व छायाचित्रे दाखवून त्यांच्या अनुषंगानं व्याख्यानं देण्याची मार्टिनला आमंत्रणं येऊ लागली. या साऱ्या व्याख्यानांच्या दौऱ्यासाठी त्याला सत्त्याऐंशी हजार डॉलर्स देऊ केले होते. यावर मार्टिन मला म्हणाला होता,

"ओसा, आपण दोघं या जगातले अत्यंत भाग्यवान पतिपत्नी आहोत ! सत्त्याऐंशी हजार डॉलर्स देऊन व्याख्यानाचं आमंत्रण आपल्या दाराशी आलं आहे."

या व्याख्यानाच्या दौऱ्यात आमचं पहिलं व्याख्यान 'लेक सॉल्ट' या शहरात झालं. यावेळी नऊ हजार मुलं हजर होती. यावेळी बोर्निओत घेतलेला चलत् चित्रपट, छायाचित्रं व त्या अनुषंगानं मार्टिनचं भाषण असा कार्यक्रम झाला. या साऱ्या मुलांना चित्रपट व भाषण अतिशय आवडलं. चित्रपट संपल्यानंतर थिएटरमधले दिवे जेव्हा लागले तेव्हा सारी मुलं उभी राहिली व त्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला व तो तसाच चालू ठेवला, तेव्हा मार्टिननं माझा हात धरून मला स्टेजच्या मध्यावर नेलं. आम्ही दोघांनी मिळून त्या मुलांनी केलेल्या अभिनंदनाचा विनम्र होऊन स्वीकार केला. बोर्निओतील जीवनावर तयार केलेला चित्रपट व छायाचित्रे नऊ हजार मुलांना आवडली याचं मार्टिनला आणि मला त्याक्षणी अतिशय समाधान झालं !

## : ११ :

'लेक सॉल्ट' इथल्या हॉटेलच्या निवासस्थानी आम्ही परत आलो. हॉटेलच्या चालकांनी रात्रीच्या जेवणाची व्यवस्था आमच्या खोलीतच केली होती. आम्ही खोलीत येतो तोच टेलिफोनची घंटा वाजू लागली. हॉटेलच्या व्यवस्थापकांनी टेलिफोनवर सांगितलं,

"तिथल्या शाळेतल्या दोन लहान मुली तुम्हाला भेटायला आल्या

आहेत त्याच्या शाळेच्या मासिकाकरिता तुमची मुलाखत त्याना घ्यायची आहे."

"त्याना तावडतोब आमच्या खोलीत पाठवून द्या" अस मार्टिनन टेलिफोनवर सांगितल आणि काही मिनिटाच्या आत दोन गुलाबी गालाच्या सुदर मुली आमच्या खोलीत आल्या. प्रत्येकीच्या हातात एक वही व टोकदार पेन्सिल होती. बोर्निओच्या माकडासबधी त्या आणखी काही माहिती विचारू लागल्या. मार्टिन त्याच्या प्रश्नांना मोठ्या तन्मयतेन उत्तरं देत होता.

त्या दोन्ही मुली दिसायला अतिशय गोड होत्या! मार्टिन त्याच्या प्रश्नाना उत्तर देत असताना त्या आपल्या नाजूक हातांनी वहीत ते उतरवून घेत होत्या. आम्हा दोघानाही त्या मुली अतिशय आवडल्या.

प्रश्नोत्तरं सपली आणि आमच जेवण टेबलावर थड होत आहे, इकडे त्याच लक्ष गेल. घाईघाईने त्या आमचा निरोप घेऊन निघून गेल्या. मी आणि मार्टिन कौतुकान कितीतरी वेळ त्याच्याकडे पाहात राहिलो!...

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता आम्ही विमानतळावर हजर झालो. कॅलिफोर्नियाला जाणारं विमान आम्हाला पकडायच होतं.

आम्ही विमानतळावर आलो तरीसुद्धा काल रात्री हॉटेलात आमच्या खोलीवर येऊन मार्टिनची मुलाखत घेणाऱ्या त्या दोन चिमुकल्या मुलीचे गोड चेहरे माझ्या मनासमोरून हलत नव्हते. मार्टिनच्याही मनात तेच विचार चालू असावेत. तो म्हणाला, "मला वाटत, काल रात्री आपली एक मोठी चूक झाली."

"कसली?"

"त्या मुलीची नाव विचारायच राहूनच गेल?"

"खरच की!"

आमच्या दोघाच्या मनाला या गोष्टीची फार चुटपूट लागून राहिली. मी झटकन् मार्टिनला म्हटलं, "इथल्या लेक सॉल्टच्या शाळेला पत्र लिहून त्यांची नाव विचारून घेऊया."

मार्टिन म्हणाला, "मला त्यांना बोर्निओमधल्या त्या लाब तोडाच्या माकडाचे काही फोटो पाठवायचे आहेत. मला वाटत, त्या मुलीना शाळेच्या मासिकाच्या लेखात ते फोटो टाकता येतील."

मार्टिनच्या त्या कल्पनेचं मला विलक्षण हसू आल.

"मला वाटतं, आपल्या त्या सुलतान माकडाचा फोटो पाठवला तर त्या मुलीना जास्त आवडेल."

"अवश्य, आपण त्या फेटा घातलेल्या सुलतानाचा फोटो त्यांना जरूर पाठवू या!"

मग आम्ही दोघं बोलायची थांबलो. मी एकदम गभीर झाले तेव्हा मार्टिन म्हणाला, "ओसा, कसला विचार चाललाय्?"

"मी बऱ्याच दिवसांपासून विचार करत आहे, तुला माहीत आहे कसला विचार मी करतेय ते?"

"आल लक्षात."

"कसला ते साग."

"एक छोटंस घर घ्यायच आणि जीवनात कुठ तरी स्थिर व्हायच..." अशी सुरुवात करून मार्टिन एकदम म्हणाला,

"ओसा, मला जाणीव आहे की, आयुष्यात या सुखाला तू नेहमीच मुकली आहेस. गेली सत्तावीस वर्षं आपण जागोजाग हिंडतो आहोत. तुला घराच सुख असं मिळालच नाही!"

"पण आपण दोघ एकमेकाजवळ राहिलो म्हणजेच घर नाही का? जिथ जिथ आपण राहिलो तिथ तिथ आपलं घरच आपण निर्माण केल नव्हत का?"

मग थोडयाशा चेष्टेच्या स्वरात विषय बदलत मार्टिन म्हणाला,

"ओसा, आणि एखादं लहान मूल आपण दत्तक घेतल तर कस? ही कल्पना तुला कशी काय वाटते?"

"मला वाटत, याबद्दल आपण न बोललेलच बर. पण मी काय करायच ते ठरविल आहे. आपण एखाद्या खेडयात एक छोटस घर घेऊया. आपण पाळलेल्या साऱ्या जनावरांसाठी आपण आपल्या घरात स्वतत्र सोय करूया."

"आणि मग आपली मुल या प्राण्याशी मजेन खेळतील!—कस काय?"

आम्ही दोघं विमानात येऊन दाखल झालो तेव्हा मार्टिन म्हणाला,

"ही घराची कल्पना मला एकदम पसत पडली, बर का?" अस म्हणत मार्टिनन माझ्याकडे पाहात स्मित केल त्याच्या त्या प्रेमळ नजरेला आणि हास्याला मी साथ दिली. मार्टिनच ते बोलण—ते स्मित माझ्या नजरेत मी साठवून ठेवल.

विमानाच्या एजिनचा आवाज सुरू झाला. माझ्या शेजारी बसलेल्या मार्टिनन माझ्याकडे पाहात पुन्हा एकदा मिस्किल हास्य केलं! आमच विमान सुरू झाल. धावपट्टीवर पळत त्यान आकाशात झेप घेतली...त्या दिवशी तारीख होती १३ जानेवारी १९३७...

१३ जानेवारी १९३७. मार्टिनच्या आयुष्यातील तो अखेरचा दिवस ठरेल, अशी मला स्वप्नातही कल्पना नव्हती! मी मनात स्वप्न रगवीत होते, पण काळाच्या मनात काहीतरी निराळच होत. आमच्या विमानाला अपघात झाला त्यात मार्टिनला काळान ओढून नेल...

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात खालील बातमी छापून आली.


**विमान अपघातात मार्टिन जॉन्सन यांचे दु:खद निधन**

लॉस ॲंजेलस्: १३ जानेवारी १९३७—'वेस्टर्न एअर एक्सप्रेस'च्या विमानाला अपघात होऊन जगप्रसिद्ध साहसी प्रवासी, छायाचित्रकार व अज्ञात प्रदेशाचे सशोधक मार्टिन जॉन्सन याचे आज त्या विमान अपघातात निधन झाले.

विमानातील इतर अकरा प्रवासी जखमी झाले असून त्यात त्यांची पत्नी ओसा जॉन्सन ही आहे.

मार्टिन जॉन्सन यांच्या पत्नीने त्याना त्यांच्या प्रवासात कायमची साथ दिली. या अपघातात त्या जबर जखमी झाल्या आहेत.

वयाच्या सोळाव्या वर्षी माझ मार्टिनशी लग्न झालं. मार्टिन म्हणजे साक्षात साहस! या साहसाच्या हातात हात घालून मी नरभक्षकाच्या जबडयात उतरले. माझ लग्न साहसाशीच झाल होत. सत्तावीस वर्षं क्षणाक्षणाला मी साहसाशी एकरूप झाले. आता कुठे-



पाच मुलांची आई असलेल्या एका पिग्मी मुलीला ओसाने कौतुकाने कडेवर घेतले

तरी घर करून स्थिर जीवन काढावं असं वाटतंय न वाटतंय तोच— सारं संपलं !

## : १२ :

या विमान अपघातात मी जबर जखमी झाले होते. माझे दोन्ही पाय मोडले होते आणि माझ्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरना माझे दोन्ही पाय निकामी झाले असून मला कधीही चालता येणार नाही, असं वाटत होतं. कित्येक दिवस मी पांगुळगाडा वापरीत होते. सात-आठ महिन्यांनंतर मी हिंडू फिरू लागले आणि लागलीच पुन्हा आफ्रिकेला जाऊन चित्रीकरण करण्याचा बेत मी नक्की केला. या आफ्रिकेच्या प्रवासात मी साडेचार महिने परिश्रम करून एक चलत् चित्रपट तयार केला. या चित्रपटाच्या आधारावर 'ट्वेंटिअेथ सेंचुरी फॉक्स' या फिल्म कंपनीनं 'स्टॅनले अॅण्ड लिव्हिंग्स्टन' नावाचा चित्रपट तयार केला, तो १९३९ साली प्रकाशित झाला.

आमच्या प्रवासी तुकडीत क्लार्क गेट्स सामील झाले होते. हे गृहस्थ मी तयार केलेल्या चित्रपटांचं जागोजाग निवेदन करीत असत. या गृहस्थांशी मी १९३९ मधे विवाहबद्ध झाले. पण आमचा विवाह फारसा सुखावह झाला नाही. १९४६ साली आम्ही एकमेकांपासून विलग झालो व १९४९ साली मी क्लार्क गेट्स यांच्याशी कायदेशीर घटस्फोट घेतला आणि मी ओसा जॉन्सन या नावानंच वावरू लागले.

आयुष्याचा प्रदीर्घ काळ जंगलातील साहसांच्या आणि निसर्गरम्य वातावरणाच्या पार्श्वभूमीवर घालविल्यामुळे शहरातील वातावरण मला कृत्रिम वाटत असे. खांद्यावर बंदूक टाकून जंगलातील साहसांना सामोरं जायला माझं मन नेहमी उत्सुक असे. या जंगलातील वातावरणाबद्दल मला विलक्षण आपुलकी आणि ओढ वाटत होती. जंगलांतून स्वच्छंदपणे हिंडताना माझ्यावर कसलंच बंधन नव्हतं. शहरी जीवनातील सत्ता स्पर्धांना इथे मुळीच वाव नव्हता. कसलीही लालसा नव्हती की चिंता नव्हती. मी कशा तऱ्हेचे कपडे घालते आणि इतर बायका काय फॅशन करतात या कल्पनेला या जंगलांतील वातावरणात थारा नव्हता. खांद्यावर बंदूक टाकून मुक्तपणे शीळ घालत मी जंगलातील वनचरांचा शोध घेऊ लागले, की मी या जंगलाची अनभिषिक्त राणी आहे असं मला वाटू लागे... परंतु अनेकदा मला कामानिमित्त शहरात जाऊन राहाणं भाग पडत होतं. अशा वेळी आफ्रिकेची घनदाट जंगलं आणि तेथील वनचर मला साद घालीत असत आणि मी शहरी वातावरणाला कंटाळून पुन्हा जंगलात परत येत असे. जंगलांत अनेक संकटं दबा धरून बसलेली असत. पण त्यांची मला कधीच भीती वाटली नाही. मी ताठ मानेनं आणि निर्भयतेने जंगलात भ्रमण करीत असे. माझ्या खांद्यावर बंदूक आहे. हा नैसर्गिक चांगुलपणा शहरात सापडत नाही. त्यामुळेच की काय, शहरातील वातावरणात सुसंस्कृतीच्या मागे दडून बसलेल्या संकटाचीच मला अधिक भीती वाटते.

मार्टिनच्या सहवासातील साहसपूर्ण आठवणी साकार करण्याकरिता त्याच्या साहाय्यानं मी खालील पुस्तकं लिहिली. 'Cannibal Land' 'Lion', Camera Trails in Africa', 'Safari—A saga of the African Blue', 'Congorilla', 'Over the

African Jungles', या पुस्तकांवर आधारित अनेक चित्रपट मार्टिनच्या मृत्यूनंतर काढले गेले.

१९३७ साली विमान अपघातात मार्टिनचा मृत्यू झाल्यानतर त्याच्या रूपान साकार झालेलं साहस संपलं परतु मार्टिनच्या सहवासातील स्मृती मला स्वस्थ बसू देत नव्हत्या.

१४ मार्च १९५२ रोजी मला आठ्ठावन्नाव वर्ष लागलं. त्यावेळी मी आफ्रिकेच्या जगलात जाण्याची पुन्हा तयारी करीत होते. आणि माझी तयारी जवळ जवळ पूर्ण होत आली होती ..

## समाप्त

### ओसा जॉन्सन यांचे दु.खद निधन

**न्यूयॉर्क टाअिम्स : ८ जानेवारी १९५३**

जगप्रसिद्ध दिवगत साहसी प्रवासी, छायाचित्रकार व अज्ञात प्रदेशाचे सशोधक मार्टिन जॉन्सन याच्या पत्नी ओसा जॉन्सन याना वुडवर्ड हॉटेलमध्ये काल दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू आला. सकाळी अकरा वाजता त्याचे वकील त्यांना भेटून गेले. त्यावेळी मिसेस ओसा जॉन्सन यांची प्रकृती बिघडल्यामुळे हृदयविकारावर उपचार करणारे मिसेस जॉन्सन याचे डॉक्टर मि. सॅम्युअल यांना वकीलानी पाचारण केले. पण डॉक्टर हॉटेलात पोचण्यापूर्वीच ओसा जॉन्सन यांना काळान ओढून नेलं होतं. हॉटेलचे मॅनेजर मि. क्रेन यानी सागितले की गेले कित्येक महिने ओसा जॉन्सन रात्रदिवस परिश्रम करून आफ्रिकेच्या जगलात जाण्याची तयारी करीत होत्या. त्याची तयारी जवळ जवळ पूर्ण होत आली असतानाच त्याच्या आयुष्याचा प्रवास त्यानी सपविला !

कॅनसस परगण्यातील शॅन्यूट गावी मार्टिनची व ओसाची प्रथम भेट झाली होती. शॅन्यूट या गावी मार्टिनच ज्या ठिकाणी दफन झाल, त्याच्या शेजारीच आपल्या मृत्यूनतर आपलही दफन व्हाव अशी इच्छा ओसान मृत्यूपूर्वी व्यक्त केली होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## दोन आठवणी

निवेदक : दलितमित्र श्री. नानासाहेब टिपणीस

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

---

महाडला आले की डॉ. बाबासाहेबांचा मुक्काम माझ्या 'गोविंद निवासात'च असे. असेच एकदा ते महाडला आले. साल नाही आठवत. गडबडीतच होते. काम आटोपून दुसऱ्या दिवशी त्यांना मुंबई गाठायची होती. बरोबर श्री. बापूसाहेब सहस्रबुद्धे होते. बाबासाहेब आले की महाडच्या परिसरातील अनेक मंडळी त्यांना भेटायला यायची. वीरचे सुभेदार सवादकरही आले. बाबासाहेबांनी रात्री भोजनाकरता वीरला यावे म्हणून आग्रह धरला त्यांनी. कामे खूप होती. भेटीगाठीही बऱ्याच. शिवाय महाडपासून वीर आठ मैलावर. तिथे भोजनाला जायचे म्हणजे–

पण बाबासाहेबांना सुभेदार सवादकरांचा आग्रह मोडवेना–'रात्री वीरला यायला उशीर होईल. परतणार केव्हा? उद्या मुंबईला जायचे आहे लगेच' असे सांगितले. पण सुभेदार ऐकेनात. ते म्हणाले–

'रात्री भोजनाला आणि मुक्कामालाच वीरला या. तिथून सकाळी मुंबईला जाता येईल'

हो-ना करता करता डॉक्टरसाहेबांनी रात्री भोजनाला व मुक्कामाला यायचे मान्य केले. तयारी करण्याकरता सुभेदार सवादकर मोठ्या आनंदाने वीरला निघून गेले.

दिवसभरातली कामे आटोपेपर्यंत खूपच उशीर झाला. कबूल केल्याप्रमाणे बाबासाहेब आणि बापूसाहेब व आम्ही इतर मंडळी वीरला जायला निघालो. तिथे पोचेपर्यंत खूप रात्र झाली. साहजिकच जेवणाच्या कार्यक्रमाला बराच उशीर झाला. आज वीरला विजेरी दिवे आहेत. पण त्याकाळी त्या खेड्यात कुठले आले आहत विजेचे दिवे? त्यामुळे भोजनाचा कार्यक्रम कंदिलाच्या उजेडातच पार पडत होता.

दुपारी भोजनाचे नक्की करताना, श्री. बापूसाहेब सहस्रबुद्धयांसारखे पक्के शाकाहारी गृहस्थ डॉक्टरसाहेबांबरोबर येणार आहेत हे सुभेदार सवादकरांना ठाऊक होते. पण त्यांच्यासाठी वेगळे काय करावे हा सुभेदारांपुढे प्रश्न पडला. मंडळी वीरला पोचली तरी त्यांना या प्रश्नाचे उत्तर सापडले नव्हते. म्हणून डॉक्टरसाहेबांना बाजूला घेऊन सुभेदारांनी आपली अडचण त्यांच्यापुढे मांडली,

: बामणाला काय वाढायचे?

: काय बेत केलाय?

: कोंबडीचे कालवण.

: मग वाढा तोच रस्सा. पण रस्साच हं. डॉक्टरसाहेब मोठे मिष्किल गृहस्थ होते. त्यांना बापूसाहेबांची गंमत करायची लहर आली होती.

सवादकरांनी इतराप्रमाणेच ताट वाढून बापूसाहेबांपुढे ठेवले. जवण सुरू झाले. गप्पा गोष्टी मजेत चालल्या होत्या. एवढ्यात बापूसाहेबांना आमटीच्या वाटीत एक बिलबिलीत गोळा सापडला. सवादकरांनी काळजी घेऊनही 'काळजीचा' एक तुकडा बापूसाहेबांच्या वाटीत पडला होता!

कंदिलाच्या उजेडात म्हणजे अर्धवट काळोखातच भोजन चालू असल्याने बापूसाहेबांनी तो गोळा चाचपित शेजारी बसलेल्या बाबासाहेबांना विचारले,

: कसली आमटी हो? चव जरा वेगळी लागते!

: आवडली का?

: छान आहे!

: आमच्या कोकणाची स्पेशॅलिटी आहे. कोकणातला हा एक नवा पदार्थ आहे. त्याला म्हणतात खराची आमटी.

: हा•• बापूसाहेब तो गोळा हातात नाचवीत म्हणाले.

: तोच. पण तो खर खायचा नाही. फक्त आमटी खायची.

: असं होय?–बापूसाहेब तो गोळा पानाबाहेर ठेवीत म्हणाले.

: चव मात्र छान आहे हं!

: आहेच– बाबासाहेब रस्सा भुरकीत म्हणाले.

जेवण सुरळीत पार पडले. आम्ही मित्रमंडळी मात्र नंतर एका बाजूला बसून पोट दुखेपर्यंत हसलो!



कोकणची 'स्पेशॅलिटी'

महाडच्या कोर्टात चवदार तळयाचा दावा चालू होता. अस्पृश्याना चवदार तळयाचे पाणी पिण्याचा अधिकार आहे की नाही यावरचा वाद सनातनी स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य याच्यात कोर्टात खेळला जात होता. दोन्हीबाजूकडून अनेक पुरावे कोर्टात हजर केले गेले होते. अनेक साक्षीदाराच्या साक्षी झडत होत्या. सनातन्याचे वकील म्हणून कै. गोविंदराव साठे हे काम पाहात होते गोविंदराव म्हणजे त्या काळचे बडे प्रस्थ. फौजदारी दाव्यात त्याचा हात धरणारा कुणी नसे.

दावा चालू असताना, कोर्टात ते डॉ. बाबासाहेबाच्या शेजारीच बसत असत. वादीतर्फे साक्षीस येणाऱ्या साक्षीदाराची बाबासाहेबाना माहिती असावी म्हणून–प्रत्येकाच्या पूर्वजीवनाचा छोटासा आराखडा देणारे एक चोपडे आम्ही तयार केले होते. अनेक साक्षीदाराची अगदी बारीकसारीक माहिती आम्ही त्यात नमूद केली होती गोविंदराव साठे यांच्यासबधी साधारण अशी नोद त्या चोपडयात होती.

–एका दाव्याच्या प्रसगी–पुरावा म्हणून कोर्टासमोर आलेला एक महत्वाचा दस्तऐवज (ती बहुधा वचन चिठी होती) गोविंदरावानी पाहायला म्हणून मागितला आणि बघता बघता तो तोडात टाकून चघळून गिळून टाकला!

गोविंदरावावर काय ठपका आला,–त्याचे पुढे काय झाले, ही गोष्ट इथे अप्रस्तुत. पण महत्वाचा पुरावा अशा विपरीत रीतीने नष्ट करणारा प्रतिस्पर्धी डॉक्टरसाहेबापुढे खडा आहे याची जाणीव त्याना व्हावी म्हणून तेवढाच उल्लेख त्या चोपडयात होता.

खटल्याचे काम चालू असताना, बाबासाहेब मधूनमधून त्या चोपडयात दिलेल्या माहितीवरून नजर फिरवीत असत. साठे वकिलाच्या काकदृष्टीतून ते सुटले नाही. एक दिवस बाबासाहेब त्या चोपडीतील नोदी चाळीत असता, साठे वकिलानी बाबासाहेबांना विचारले,

'कसले चोपडे आहे हो डॉक्टरसाहेब?" वकिलसाहेब हातातील चोपडयात डोकावताहेत हे पाहून ते बाजूला धरून डॉक्टर म्हणाले,

: आहे आपल कसल तरी!

: कसले तरी? कसले तरी चोपडे इथे कोर्टात तुम्ही चाळत बसणार नाही. काय आहे तरी काय त्यात एवढे महत्वाचे?

: काही नाही हो, विशेष महत्वाचे काही नाही.

: बघू बघू–दाखवा ना!

: छ, छे, तुम्हाला दाखवणार नाही.

: अहो का पण? असे का म्हणून?

: अहो हेही तुम्ही गिळंकृत केले तर तुमचे घ्या काय? डॉक्टरसाहेब मोठयाने उद्गारले.

कोर्टात एकच हशा पिकला. कारण गोविंदरावाची 'ती' कीर्ती महाडच्या परिसरात सर्वत्र पसरली होती.

## Now it can be told पृष्ठ १६ वरून

मुस्लिमेतराच्या मालकीचे होते. महायुद्धकालात, लेथ, एक्सपेलर, वटने बनविण्याची यंत्रे, रेल्वेची चाके, विमानाचे सुटे भाग कॉटन व जिनिंग कारखाने, साखर कारखान्याना लागणारे सुटे भाग, विजेचे पखे इ. बनविण्याचे कारखानेही सुरू झाले होते. या सर्व कारखान्याची मालकी मुस्लिमेतराचीच होती. त्यांनी नुसते भाडवलच घातले नव्हते तर यत्रज्ञ व तत्रज्ञही तेच होते. वरील सर्व कारखान्यापैकी ८० टक्के कारखाने हिंदु व शिखाच्या परिश्रमाने व साहसाने निर्माण झाले होते. व ते फाळणीपर्यंत चालू होते.

या बोर्डाने पहाणी करून लाहोर शहर व उपनगरे यातील कारखान्याचे १९४३–४४ सालचे आकडे गोळा केले होते. त्यावरून एकूण २१८ रजिस्टर्ड कारखान्यापैकी १४३ म्हणजे ८० टक्के कारखाने मुस्लिमेतराच्या मालकीचे होते व या कारखान्यातून गुतविलेले भाडवल २ कोटी, ४० लक्ष २७ हजार रु. होते. यापैकी फक्त ५८ लक्ष ९१ हजार एवढेच भाडवल मुस्लिमांचे होते म्हणजे एकूण भाडवलाच्या शे. २४·५ एवढेच काय ते मुस्लिम भाडवल होते. सामान्यपणे या कारखान्यातून गुतविलेले व खेळते मिळून एकूण ६ कोटी २९ लक्ष रु. भाडवल होते. यात मुस्लिमेतराचे ५ कोटी १२ लाख होते. यात परदेशस्थ लोकाचे भाडवल २४·५ लाखाचे होते. यावरून भाडवलाचा फार मोठा भाग मुस्लिमेतरांनीच पुरविला होता हे सहज सिद्ध आहे. हे आकडे मी वरील बोर्डाच्या रिपोर्टातील A. B C. या तक्त्यावरून घेतले आहेत ते तक्ते खालीलप्रमाणे–

**तक्ता अ**

| हिंदू बहुसख्य विभाग | दुकानाची सख्या | | | प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | मुस्लिम | मुस्लिमेतर | मुस्लिम | मुस्लिमेतर |
| अनारकली | २१६ | ६२ | १५४ | १६ | ७१ |
| रेल्वे रोड, | १४४ | ३८ | १०६ | २६ | ७४ |
| निलागुबद | ४३ | ९ | ३७ | २० | ८० |
| मिलोड रोड | ८२ | ३४ | ४८ | ३१ | ४० |
| मोहनलाल रोड | ६८ | १२ | ५६ | १८ | ८२ |
| गणपत रोड | ३३ | ९ | १४ | २७ | ७३ |
| माल रोड | १४१ | २३ | ११८ | १२ | ८४ |
| ब्यॉडरेथ रोड | ६२' | १५ | ४७ | २४ | ६६ |
| कचेरी रोड | १० | ४ | ६ | ४० | ६० |
| निसबत रोड | ५१ | ६ | ४५ | १२ | ८८ |
| हाल रोड | १८ | १ | १८ | ० | १०० |
| बीडन रोड | ६५ | १४ | ५१ | २२ | ७८ |
| मुलतान रोड | १७ | ६ | १३ | २४ | ७६ |
| नौलाखा | २०८ | १०३ | १०५ | ४९ | ५१ |
| शहादरा | ९६ | २९ | ६७ | ३० | ७० |
| मोगलपुरा | १३६ | ५९ | ७७ | ४३ | ५७ |
| किला गुजरसिंग | १७० | ५० | १२० | २९ | ७१ |
| कॅन्ट | ३४३ | ९५ | २४७ | २८ | ७२ |
| जुनी अनारकली | ८७ | २६ | ६१ | ३० | ७० |

(पुढील पानावर चालू)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गबाल मंडी | १४८ | १० | १३८ | ७ | ९३ |
| बागबान पुरा | १०० | १३ | ८७ | १३ | ८७ |
| बदामी बाग | ४२ | ५ | ३७ | १२ | ८८ |
| कृष्ण नगर | ३६६ | २२ | ३४४ | ६ | ९.४ |
| हॉस्पिटल रोड | २६ | ९ | १७ | ३५ | ६५ |
| निकलसन रोड | ३२ | ११ | २१ | ३४ | ६६ |
| वॉलसिटी (कोटाचे आतील विभाग) | १९१५ | ६९९ | १,२१६ | ३७ | ६३ |
| एकूण | ४,६२१ | १,३६१ | ३,२६० | २९ | ७१ |

| हिंदू बहुसख्य विभाग | दुकानाची सख्या | | | प्रतिशत प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | मुस्लिम | मुस्लिमेतर | मुस्लिम | मुस्लिमेतर |
| टेपल रोड | ६७ | ३७ | ३० | ५५ | ४५ |
| फयाझ रोड | ४० | ३१ | ९ | ७८ | २२ |
| चांगर मोहल्ला | १०० | ७६ | २४ | ७६ | २४ |
| सर्क्युलर रोड | ३८ | २० | १८ | ५३ | ४७ |
| मुझाग | २६७ | १६९ | ९८ | ७१ | २९ |
| इच्छारा | ३९ | २२ | १७ | ५६ | ४४ |
| फिरोझपुर रोड | ९४ | ७६ | १८ | ८१ | १९ |
| टाटा गज | ५१ | ३० | २१ | ५९ | ४१ |
| फ्लेमिंग रोड | ९४ | ७६ | १८ | ८१ | १९ |
| एकूण | ७११ | ४७० | २४१ | ६६ | ३४ |
| हिंदु वहुसख्य विभाग | ४६२१ | १३६१ | ३२६० | २९ | ७१ |
| मुस्लिम वहुसख्य विभाग | ७११ | ४७० | २४१ | ६६ | ३४ |
| एकूण | ५३३२ | १८३१ | ३५०१ | ३४ | ६६ |

## तक्ता (ब)

**बृहत् लाहोरमधील धद्यापरत्वे कारखान्यांची जातवार विभागणी**

**( सन १९४३–४४ )**

| धदा | रजिस्टर्ड कारखान्याची सख्या हिंदी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | शीख | इतर | परदेशी | एकूण |
| (१) इजिनिअरिंग | | | | | | |
| (१) वीज | ५ | — | — | — | — | ५ |
| (२) सर्वसाधारण | ७६ | ३१ | ५ | १ | ३ | ११६ |
| (२) स्टील रोलिंग मिल्स | ६ | ३ | १ | — | — | १० |
| (३) होजिअरी-कापड | ५ | — | — | — | — | ५ |
| (४) रासायनिक | १३ | — | — | १ | १ | १५ |
| (५) छापखाने-स्टेशनरी | २७ | ७ | २ | — | — | ३७ |
| (६) काच-कारखाने | १ | — | — | — | — | १ |
| (७) गुडयाचे-कारखाने | २ | — | १ | — | १ | ४ |
| (८) इतर सर्वसाधारण | १९ | ४ | १ | — | १ | २५ |
| एकूण | १५४ | ४५ | १० | ३ | ६ | २१८ |

## तक्ता ( क )

**गुंतवलेले भांडवल**

| धदा | हिंदी ( आकडे लाखाचे ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | शीख | इतर | परदेशी | एकूण |
| १. इजिनिअरिंग | | | | | | |
| १ वीज | १२·०० | — | — | — | — | १२·०० |
| २ इतर सर्व सामान्य | ६८·४० | ४६·९१ | २·७८ | १·०० | ४·०० | १२३·०० |
| २. स्टील रोलिंग मीह्स | २०·५० | ५·०० | २·०० | — | — | २७·५० |
| ३. होजीअरी कापड | ११·०० | — | — | — | — | ११·०० |
| ४. रासायनिक | २०·०० | — | — | ०·२६ | ४·०० | २४·२६ |
| ५. छापखाने–स्टंशनरी | १२·०० | ५·०० | — | — | — | ०·५३ |
| ६. काचकारखाने | ०·५३ | — | — | — | — | ०·५३ |
| ७. गुडयाचे कारखाने | १·१२ | — | १·०० | — | २·२० | ४·३९ |
| ८. इतर सर्वसामान्य | १६·०० | २·०० | ०·५० | — | १·०० | १९·५० |
| एकूण | १६१·५५ | ५८·९१ | ६·७८ | १·७६ | ११.२७ | २४०·२७ |

## तक्ता (ड)

### बृहत लाहोर मधील धंद्यापरत्वे कारखान्याची जातवार विभागणी (सन १९४३–४४

| धंदा | एकूण गुतवलेले भाडवल (गुतवलेले व फिरत्या भाडवलासह) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू | मुस्लिम | शीख | इतर | परदेशी | एकूण |
| १. इजिनिअरिंग | | | | | | |
| १. वीज | २८·० | — | — | — | — | २८·०० |
| २. सर्व साधारण | १९४·५६ | ९६·२४ | ५·३८ | २·०० | १०·०० | ३०८·१३ |
| २. स्टील रोलिंग मिल्स | ५०·०० | १०·०० | ४·०० | — | — | ६४·०० |
| ३. होजियरी–कापड | २०·०० | — | — | — | — | २०·०० |
| ४. रासायनिक | ४४·०० | — | — | ०.६० | ८·०० | ५२·६० |
| ५. छापखाने–स्टेशनरी | ९०·०० | ६·०० | ०·७५ | १ ०० | — | ९७·७५ |
| ६. काच कारखाने | २·३३ | — | — | — | — | २·३३ |
| ७. गुड्याचे कारखाने | २ २० | — | १·८० | — | ५·०० | ९·०० |
| ८. सर्वसामान्य | ४०·०० | ५·०० | १·०० | — | १·५० | ४७·५० |
| एकूण | ४१७१ ०९ | ११७·२४ | १२·९३ | ३ ६० | २४·५० | ६२९·३६ |

गेल्या पन्नास वर्षांत हस्त व्यवसायाचे छोटे धंदे मोडकळिस आले होते त्यात वदुका बनविण्याचे, लोकरीकापड विणकामाचे, मेणकापड बनविण्याचे तसेच बागड्या बनविण्याचे व्यवसाय जवळजवळ नामशेषच झाले होते. हे धंदे बहुधा मुस्लिम मालकीचे असत व प्राय: कारागिरही मुसलमानच असत. या धद्याच्या जागी निकाल क्लोरिंग, फर्निचर, कपडे रंगविणे, टिनगर, चाकू, काश्या तयार करणे, बुकबाईंडिग, टागेगाड्या तयार करणे इ. धदे सुरू झाले. यात जपानी धर्तीची खेळणी करण्याचेही कारखाने होते. अशा तऱ्हेच्या लहान घरगुती व्यवसाची एकूण सख्या लाहोर शहरात दोन हजाराच्या वर होती. यापैकी ज्यात दुरुस्तीचे काम होई असे इजिनिअरिंगचे कारखाने उल्लेखनीय होते. या कारखान्यातून दुय्यम दर्जाचे नोकर मुसलमान असले तरी मालकी हिंदु-शिखाकडेच होती. सोडावॉटर फॅक्टऱ्या, मोरबे तयार करणे, पिठाच्या चक्या, तेल घाण्या, होजिअरी, कताई व विणकाम, सौदर्य प्रसाधने, फर्निचर, सोनार काम, इ. इ. धद्याचे सपूर्ण स्वामित्वच (Monopoly) मुस्लिमेतरांकडे होते. युद्धकालात काही धदे दोन्ही जातीच्या भागिदारीत व काही मुसलमानाच्या मालकीचे असे सुरू करण्यात आले होते. पण असे असले तरी या लहान व्यवसायात मुस्लिमेतराचे प्रमाण शे. ७५ च्या खाली कधी गेले नाही.

लाहोर शहर हे महत्वाचे व्यापारी केद होते. तेथील आर्थिक व्यवहार चागलाच प्रगत झालेला होता. तेथे सव्वीस बँकांची मुख्य कार्यालये होती. १९३९ नतर बँकिंगच्या व्यवसायात चांगलीच प्रगती होत गेली. १४ सालच्या युद्धापूर्वी जेमतेम बारापर्यंत असले – की बँकाची सख्या १९४७ त नव्वदवर गेली होती. यापैकी फक्त तीन बँका व त्याच्या शाखा मुसलमानाच्या मालकीच्या होत्या.

या शहरात विमा व्यवसाय करणारी एकूण ८० कार्यालये होती. यात पंधरा कपन्यांची केद्र कार्यालये होती. यांतील बहुतेक कपन्या आयुष्याचाच विमा उतरीत पण काही पजावी विमा कपन्या आग इ चाही व्यवसाय करीत. या कपन्यापैकी फक्त दोनच मुसलमानाच्या मालकीच्या होत्या.

त्याच प्रमाणे स्टॉक एक्सचेजच्या दोन रजिस्टर्ड कपन्याही येथे होत्या. या दोन्ही कपन्या मिळून त्यात फक्त एक मुस्लीम सदस्य होता

१९३२ पासून येथे 'इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' ही सुरू झाले होते. व फाळणी पूर्वी अशा ट्रस्टस्‌ची सख्या सतरापर्यंत गेली होती. ती सर्वस्वी मुस्लिमेतराचीच होती.

गेल्या काही वर्षांतील उल्लेखीय गोष्ट म्हणजे सर्व प्रकारच्या व्यापारी सस्थाची मडळे स्थापन होऊन त्याची केद्रकार्यालये लाहोरलाच ठेवली गेली होती. अशा पाच 'चेंबर ऑफ कॉमर्स' लाहोरला होत्या. 'देसी बेपार मडळ', पजाब मर्चंटस् चेंबर, नॉर्दर्न इडिया चेंबर ऑफ कॉमर्स, पजाब बेपार मडल, आणि मुस्लीम चेबर ऑफ कॉमर्स, ही ती होत. यापैकी पहिल्या तीनमध्ये सभासद संख्या ६३५ होती. ती बहुतेक मुस्लिमेतराचीच होती. मुस्लिम चेबर नुकतेच स्थापन झाले होते व त्याची सभासद सख्या मर्यादित होती.

लाहोर हे पजाब प्राताचे मोठे शैक्षणिक केंद्र होते. या शैक्षणिक विकासास बहुताशी हिंदु, शीख, ख्रिश्चन, ब्रह्म समाजी, देव समाजी, व आर्य समाजी कारण झाले आहेत यानी या क्षेत्रात केलेली प्रगती, वाढ विस्मयजनक होती. शिक्षण खात्याने मान्य केलेल्या व पजाब विश्वविद्यालयाशी सलग्न असलेल्या २७० सस्था लाहोर शहरात होत्या. यापैकी शभर सस्थांनी स्त्री शिक्षणास वाहून घेतले होते या सस्थातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची सख्या ६४९०२ व विद्यार्थिनीची सख्या २३४७७ होती. एकूण बारा कॉलेजापैकी एक मुसलमानाकडून व एक सरकारकडून चालविले जाते होते. या कॉलेजातून

१०६४७ विद्यार्थी शिक्षण घेत होते विशिष्ट तांत्रिक कॉलेजे पधरा होती व त्यात २६२० विद्यार्थी शिकत होते या पधरा कॉलेजापैकी फक्त तीन सरकार चालवीत होते. व बाकीची बारा मुस्लिमेतर चालवीत होते. मुस्लिमेतरानी या शिक्षण सस्थाच्या वाढीसाठी कोटचावधी रुपये व आपल्यातील अत्यत बुद्धिवानाची बुद्धी खर्ची घातली होती. काही थोडे हिंदु विद्यार्थी मुस्लिम सस्थातून शिक्षण घेत त्याचप्रमाणे काही थोडे मुस्लिम विद्यार्थी मुस्लिमेतर होते. तात्पर्य शिक्षण सस्थाच्या मालकीच्या दृष्टीने, कारभाराच्या दृष्टीने व शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने लाहोर शहर पूर्णपणे मुस्लिमेतराच्या वर्चस्वाखाली होते.

या शहरात चार ग्रथालये होती 'पजाब पब्लिक लायब्ररी, दयालसिंग लायब्ररी, सर गगाराम लायब्ररी, व द्वारकादास लायब्ररी अशी त्याची नावे होती. पहिली सरकारकडून व बाकीच्या तीन मुस्लिमेतराकडून चालविल्या जात होत्या. पजाब विश्वविद्यालयाचे ग्रथालय तेथील विद्यार्थी व प्राध्यापकासाठी होते त्याचप्रमाणे इतर सस्थाही आपआपल्या विद्यार्थ्यासाठी ग्रथालये चालवित. मुसलमानाचे मात्र एकही ग्रथालय या शहरात नव्हते. जर लाहोर शहर फाळणीमुळे मुसलमानाच्या ताब्यात गेले नसते तर पूर्व पजाबातील ते एक महत्वाचे शैक्षणिक केंद्र बनले असते व त्या प्रातातील शिक्षणाच्या वाढीस झपाटचाने हातभार लागला असता. पूर्वपजाबचेच नव्हे तर पश्चिम पजाबचेही विद्यार्थी या केंद्राकडे आकृष्ट झाले असते पण लाहोर पाकिस्तानात गेल्यामुळे मुस्लिमेतराची कधीही न भरून येणारी शैक्षणिक हानी झाली आहे

ज्याप्रमाणे शैक्षणीक क्षेत्रात हिंदु-शिखानी प्रचड व बहुमोल कामगिरी केली, त्याचप्रमाणे ज्ञान प्रसाराचे आधुनिक कालातील दुसरे प्रभावी साधन म्हणजे वृत्तपत्रे, मासिके, नियत कालिके इ. चालविण्याच्या कामिही त्यानी उल्लेखनीय कामगिरी केली आहे या शहरात उर्दू १५, इग्रजी ५, हिंदी २ व गुरुमुखी १ अशी २३ दैनिके निघत होती त्याचप्रमाणे साप्ताहिके १२९, पाक्षिके ३२ मासिके १७० व त्रैमासिके २४ निघत होती

येथे रुग्णालयेही भरपूर होती. ॲलोपॅथिक पद्धतीची सर्व आधुनिक साधनानी सुसज्ज अशी बारा रुग्णालये येथे होती व आयुर्वेदिक चार होती. यात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की यापैकी एकही स्त्री, अथवा पुरुषाचे रुग्णालय मुस्लिम नव्हते हे तर सोडाच पण काही डिस्पेन्सिग केमिस्ट वगळल्यास वैद्यकीय क्षेत्रात मुसलमानाचे अस्तित्वच नव्हते या उलट हिंदूनी आपले लाखो रुपये खर्चून व त्यास आपल्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेची जोड देऊन अगदी अद्यावत् व सुसज्ज रुग्णालये स्त्रीपुरुषासाठी उभारली होती. या रुग्णालयानी पजाब प्राताची आवश्यकता तर भागविलीच होती पण काश्मीर, सिंध वायव्य प्रातातूनही येथे अनेक रोगी येत असत. या रुग्णालयाना सरकारी साह्य अगोदरच फार थोडे मिळत होते. त्यात पाकिस्तानी वृत्तीचे सरकार आल्यावर ते त्यानी अजिबातच बद केले व नतर हिंदु-शीख दात्यानीही आपले हात आखडले. व त्यामुळे त्यापैकी बहुतेक रुग्णालये बद पडून लोकाचे हाल होऊ लागले. ❖

पुढील अंकी चालू

भारतात जन्म घेतलेल्या
एका बुद्धिमान डॉक्टरच्या
नशिबात काय होतं ?
त्याने त्याच्या पत्नीचा
आणि नौकराणीचा
इतक्या भीषण पद्धतीने
खून का केला ?
कसा केला ?

ॲडव्होकेट माधव कानिटकर
सादर करीत आहेत.

लंडनमधील
एक खळबळजनक खून खटला

दैव जाणिले कुणी ?

मागूस चित्र, वार्ता पुस्तक
पुढील अंकी

# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. १६ जुलै ७३ ते ३१ जुलै ७३

**भारताला राजकीय अस्थिरतेचे ग्रहण**

भारताची मकर रास असून स्वातंत्र्य काळी चंद्राला अत्यंत प्रतिकूल काळ होता. सध्या राहू बारावा असून गुरू राशीत असला तरी तो दुर्बल आहे. भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या मकर राशीच्या असून त्यांचे लग्न कर्क आहे. त्यांनाही बारावा राहू व तसाच लग्नाला केतू-शनि-बारावे आहेत. नुकतेच घडलेले मिथुन राशीतील ग्रहण त्यांच्या लग्नाला प्रतिकूल परिणाम घडवणारे आहे. त्याचे प्रत्यंतर आजवर आलेले असून आता अधिक प्रमाणावर येऊ लागणार आहे. देशाची आर्थिक व राजकीय परिस्थिती अधिकाधिक अस्थिर बनणार असून सत्तारूढ पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांना जनतेच्या रोषाचा त्रास सहन करावा लागणार आहे. इंदिरा गांधींचे डावपेच फसण्याची शक्यता आहे व त्याचे परिणाम जसे त्यांच्या लोकप्रियतेवर होणार आहेत तसेच परराष्ट्र धोरणाचे अपयश उघड करणारे ठरणार आहेत. अमेरिका थोडीफार भारताबरोबर संबंध सुधारणेची पावले टाकील तर पाकिस्तानला असलेल्या जन्मस्थ साडसातीमुळे पुन्हा भारत पाकिस्तान युद्धाच्या ढगांचा गडगडाट वातावरणात होऊ लागेल. गुजराथ, मध्यप्रदेश येथील मंत्रीमंडळांना जोरांचे हादरे बसू लागतील तर बिहारचे अबदुल गफूर यांचे स्थान देखील वादळात सापडू शकेल. केंद्रीय मंत्रिमंडळात होणारा बदल 'सुखी' ठरणार नाही. महाराष्ट्राला मात्र 'हिरवे' जीवदान मिळणार असून एकंदर राष्ट्रीय नेतृत्वात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होणार आहे. यशवंतराव चव्हाण यांचेदेखील महत्त्व वाढणार आहे. आंध्राला फाळणीचे वेध लागणार आहेत. ¤

**मेष : प्रगतीची चाहूल**

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात कधीना कधी भाग्योदय होतच असतो. फक्त काळ तेवढा त्याला योग्यवेळेची जाणीव देत असतो. मेष राशीच्या व्यक्तीचा असा अनुकूल काळ आता सुरू झाला आहे. साडेसातीतून गेल्याच महिन्यात तुम्हाला शनीने मुक्त केले असून तो शनि आता तुमच्या प्रगत जीवनाची उभारणी करून देण्यासाठी तिसरा झाला आहे. मिथुन ह्या बुद्धिप्रधान राशीत शनि आला आहे. रवी चौथ्या सुखस्थानी व गुरु तर उद्योग-नोकरीच्या स्थानात प्रतिष्ठ आहे. फक्त प्रतिकूल आहे तो एकटा मंगळ. आपली निराशा व अगतिकता आता इतिहास जमा होणार असून अनेक क्षेत्रात प्रगतीचा नवा पर्वकाळ सुरू होणार आहे. आजवर फक्त अडथळे येत होते तर आता फक्त एकापुढे एक संधी येणार आहे. स्वभावातील अहंकार व एककल्लीपणा सोडून देऊन तुम्ही आता नव्या वातावरणात प्रवेश करा. या पंधरवड्यात नोकरीची स्थिती कमालीची सुधारणार आहे. ज्या वरिष्ठांनी तुम्हाला आजवर त्रास दिला तेच तुम्हाला एखाद्या नव्या योजनेवर नेमण्यासाठी शिफारस करतील. बेकारांना तात्पुरता कामधंदा मिळेल. उद्योग व्यवसायात एखादा नवा भागीदार भेटून मंदावलेल्या गतीला चालना मिळेल. व्यापार अडखळला असेल तर त्याला जोर वा तेजी येईल. कारखानदारांना नवी संधी उपलब्ध होईल तर राजकारण खेळण्याचे कौशल्य यशस्वी होईल. पैशाची परिस्थिती मात्र फारशी समाधानकारक राहाणे कठीण आहे. पैसा मिळेल पण हातात राहाणार नाही. मंगळवार शुभ दिवस आहे. **महिलास** : सन्मानाचा योग सार्वजनिक कार्यात अनपेक्षित येईल. ज्यांचे विवाहाचे प्रयत्न आहेत ते थोडेफार यश देतील. ¤

**वृषभ : प्रतिष्ठा वाढणार**

हळव्या माणसाच्या भावना जास्त नाजूक असतात. त्यांना जरा देखील गरम स्पर्श सहन होत नाही. असा स्पर्श झाला तर त्या भावना कोमेजून जातात. तुम्ही शुक्राच्या धर्माचे व रसिक वृत्तीची माणसे आहात. गेल्या महिन्यापर्यंत पहिल्या शनीने तुमचा बराच छळ केला. पण आता मात्र त्याने तुमचे सारे मनोरथ पुरे करायचे ठरवले आहे. अकरावा मंगळ म्हणजे तर आर्थिक वैभवाची सुवर्णसंधीच होय. या पंधरवड्यात अनेक क्षेत्रातील तुमच्या गत प्रयत्नाचे फळ दृष्टिक्षेपात येणार आहे. काही तरी भव्य व दिव्य करून दाखवण्याची जिद्द तुमच्या मनानं आकारली जाणार असून त्याला वातावरणाची अनुकूलताही लाभणार आहे. तुम्ही लेखक वा कलाकार असाल तर दि. २१ ते २८ या काळात तुम्हाला सरकारी सन्मान लाभणार. महान कीर्तीचा योग आहे. चालू नोकरीत बदल होण्याची दाट शक्यता असून मिळणारी नोकरी आर्थिकदृष्टया जास्त फलदायी असेल. एखाद्याचे नशिब ज्या संधीची वाट पहात होते ती परदेश प्रवासाची संधी त्याला दि. २३ ते ३१ या दरम्यान मिळेल असे वाटते. व्यवसायातील अडचणी दूर होण्याची चिन्हे दिसू लागतील. जमीन अगर स्थावर मिळकतीचा प्रश्न तुमच्या बाजूने याचवेळी निघेल. आपण लॉटरीचे तिकिट घेण्याचे आजवर टाळले असले तर ते आता अवश्य घ्या. सहज 'लक्षाधीश' होऊन जाल. चालू नोकरीत नवे क्षेत्र लाभणार असून कर्तृत्वाला

बहर येईल. आमदार, खासदार व मंत्री यांचा दर्जा व प्रतिष्ठा अनपेक्षितपणे उंचावणार आहे. **महिलांस :** कौटुंबिक सुखाची हरवलेली सधी नजिकच्या काळातच गवसणार आहे. शुक्रवारी मनोरथ पुरे होणार आहेत. ¤

### मिथुन : खळबळजनक काळ

बुद्धी हे तुमचे यशस्वी शस्त्र असून वाणी हे तुमचे अस्त्र आहे. पण शनी तुमच्या विरुद्ध गेला तर शस्त्र असो वा अस्त्र असो ते अगदी गजून जाते. तुम्ही हतबल बनता. गेली अडीच वर्षे तुम्ही हाच अनुभव घेतला आहे. पण आता बाराव्या शनीची 'भीषण' कारकीर्द सपून समजस व समर्थ अशा पहिल्या शनीची कारकीर्द सुरू झाली आहे. आता ते सकटांनी भरलेले प्रतिकूल दिवस सपले आहेत व तुमच्या तेजस्वी कर्तबगारीचे दिवस सुरू झाले आहेत. आता मागे पाहू नका. उत्कर्षाकडे नेणाऱ्या भविष्यकाळाची हाक ऐकून झपाटचाने कामाला लागा. या पंधरवडचात तुमच्या हातून प्रचड अशी आर्थिक उलाढाल होणार आहे. बँकिंग क्षेत्रातील लोकाचे नशीब तर फळफळणार आहे तुमचे एखादे सशोधन सर्वमान्य होऊन तुम्ही कीर्तिशिखरावर जाऊन पोचणार आहात. या काळात तुमच्यापैकी एखादा प्रकाशक एखाद्या नामाकित कलाकृतीला प्रकाशात आणणार असून त्या पुस्तकाला लोकप्रियतेची सधी मिळणार आहे मिथुन राशीचा नवोदित लेखक प्रसिद्धीच्या प्रकाशात येणार असून त्याला पहिलेवहिले मानधन मिळाल्याचा आनंद होणार आहे.नोकरीची स्थिती कामाच्या दृष्टीने खूपच ताण वाढवणारी निर्माण होणार असून वरिष्ठाबरोबर मतभेदही होऊ शकतील. उद्योगधंद्यात आर्थिक नुकसान असे फारसे होणार नसले तरी कारखान्यात सप वगैरे घडण्याची मात्र शक्यता आहे. दि २० ते २५ या काळात कामासाठी दूरचा प्रवास होईल. गरजेपुरता पैसा मिळेल. **महिलांस :** सार्वजनिक कार्यात बोलणे शक्यतो टाळावे. गैरसमज व भाडणे होण्याची शक्यता. गुरुवारी उपवास फायद्याचा ठरेल. ¤

### कर्क : फक्त गुरूची अनुकुलता

चंद्र हा तुमचा स्वामी आहे. व मित्र आहे. आकर्षक व्यक्तिमत्त्वाची तुम्हाला दैवी देणगी असते. स्वभाव चादण्यासारखा शीतल असतो पण तेवढाच चिरचिराही असतो, क्षणात सताप तर क्षणात सयम हे तुमचे खासे वैशिष्ठय होय या तुमच्या स्वभावाला सध्या फक्त एकटचा मकरस्थ सातव्या गुरुचीच अनुकुलता आहे. तोही तसा निर्बलच आहे. मगळ भाग्यस्थानी असला तरी व्ययस्थ शनि–केतूपुढे त्याचा प्रभाव पडणे कठीण आहे असे असले तरी तुम्ही गागरून अगर हातपाय गाळून बसण्याचे कारण नाही. सयम व सुविचाराची कास धरून आपले कर्तव्य करीत राहिलात तर फारसे नुकसान होणार नाही या पधरवडचात आपण आर्थिक व्यवहारासबधीचे कोणतेही करारमदार करू नये. पैसा पुरणार नाही. अनावश्यक गरजा व खर्च टाळावेत. कुणाच्या भिडेला बळी पडू नये. नोकरीत असणारानी जपून राहावे. ज्याच्याकडे प्रत्यक्ष पैशाचे व्यवहार आहेत त्याने डोळचात तेल घालून जपावे फसवणूक अगर चोरी होईल. वाहन चालवणाऱ्यानी तोल सोडू नये. चालू नोकरीत कोणताही बदल करू नये. नोकरीचा इटरव्ह्यू यशस्वी होईल पण 'कॉल' लाबणीवर पडणार आहे. राजकीय नेत्याच्या लोकप्रियतेला धक्का लागण्याची शक्यता आहे प्रवासात मात्र धनिक व्यक्तीची ओळख होईल व ती फायदेशीर ठरेल. लेखकाच्या कल्पकतेला बहर येईल. चागले लिखाण होईल. उद्योगाला गती मिळेल. **महिलांस :** माहेरची मडळी अकस्मात येऊन भेटतील व मन प्रसन्न राहील. वस्त्रलाभ होईल. ¤

### सिंह : आर्थिक उत्कर्ष

तुमचे मन अतिशय खबीर असते तर स्वभाव खोल व निग्रही असतो. रवि हा अतरिक्षातील अत्यत तेजस्वी ग्रह तुमच्या राशीवर प्रभाव गाजवीत असतो मला लिहायला आनद वाटतो की अनेक दिवस तुमच्या वाटयाला आलेली उपेक्षा याच पधरवडचापासून संपणार आहे. तुमच्या राजकीय कौशल्याला नवे क्षेत्र उपलब्ध होणार असून कर्तृत्वाच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात येणार आहेत तुमचा खरा धर्म राजकारणी पुरुषाचा. तुमच्या राजकारणाला व राजकीय कौशल्याला असमान ठेंगणे वाटावे असा बहर याच वेळी येणार आहे. महत्त्वाकांक्षा फुलून येणार आहे. प्रामुख्याने दि. १७ ते २१ व २५ ते ३१ हा काळ या दृष्टीने मुद्दाम लक्षात ठेवावा. खासदार असेल तर त्याला एखादे महत्त्वाचे स्थान लाभणार आहे. एखादा साधा मत्री असेल तर त्याला बढती मिळणार आहे नोकरीत तुमचे रेंगाळलेले प्रमोशन व बढती यावेळी मिळणार आहे पगारवाढीत आजवर येणारे अडथळे दूर होतील. डॉक्टराची 'बेकारी' सपणार असून व्यवसाय तेजीत येणार आहे. वकील वर्गाला नवे कार्यक्षेत्र उपलब्ध होणार आहे. व्यापारी, पेढीवाले व शेअरचा धदा करणारे याना उत्कर्षाचा काळ आहे. अकल्पित धनलाभाचा योग याचवेळी येणार आहे. इजिनियरिंग उद्योग भरभराटीला येईल. निरनिराळे व्यवसाय करण्याची जिद्द जागी होईल. पैशाची आजवर भासत असलेली चणचण व करावी लागणारी वणवण सपणार आहे हे निश्चित समजा. रविवारी आनददायक घटना घडेल **महिलांस :** मनोरथ पूर्ण होणाऱ्या घटना यावेळी घडणार आहेत. मोठ्या प्रवासाचा योगही येईल. ¤

### कन्या : नोकरीत अनुकूलता

तुम्ही अतिशय भावनावश आहात. तुम्हाला बुद्धी उत्तम असते. प्रत्येक विषयात रस असतो. पण भावनेच्या आहारी जाऊन तुम्ही स्वत चे नुकसान करून घेता. सुदैवाने आता तुम्हाला गुरु पाचवा व शनी दहावा आला आहे. हे दोन ग्रह तुमचे भवितव्य आणि भविष्य घडवीत आहेत. मन शात ठेवून येणाऱ्या अनुकूलतेचा लाभ घ्या. या पधरवडचात नोकरीत तुमच्या मनाप्रमाणे बदल होतील. तुमच्या अनेक योजना तुमचे वरिष्ठ मान्य करतील. कल्पकतेला प्रोत्साहन मिळेल. ज्याच्या बढतीचे अर्ज दप्तरी धूळ खात पडले आहेत त्याचे अर्ज अनुकूल निर्णय लागून निकालात निघतील. अजून थोडे जपायला हवे ते तब्येतीला. घरात एखादे मगल कार्य घडेल. ससारात आनद देणारी घटना घडेल सततीसुख मनासारखे मिळेल. मुलाच्या कर्तबगारीने मन भारावून जाईल. दि. २० ते २५ आर्थिक स्थिती उत्तम सुधारेल येणे वसूल होईल. तुम्ही लेखक असाल तर पत्रकारांच्या व्यवसायात पदार्पण

करण्याची तुम्हाला संधी मिळल. उद्योग-व्यवसायात काही तरी नवे उपक्रम करून दाखवण्याची जिद्द व अनुकूलता निर्माण होईल. शुक्रवारी उपवास करा. अनेक मनोरथ पूर्ण होतील. **महिलांस** : नोकरी करणाऱ्या स्त्रियाना शुभवार्ता. कलाक्षेत्रात असणाऱ्यानाही कीर्तीचा व संपत्तीचा योग येईल. ¤

**तूळ** : जागेचा प्रश्न सुटेल

शुक्राचा गुणधर्म आपल्यावर अधिक प्रभाव गाजवीत असतो, मनाने आपण अधिक रसिक पण तेवढेच लहरी आहात. सध्या गुरु चौथा आहे, राहू तिसरा आहे व शनी भाग्यात आला आहे. प्रगतीच्या वाटेतील अडचणी व अडथळे संपले आहेत असे समजू नका. पण त्याची तीव्रता मात्र आता पूर्वीसारखी जाणवणार नाही. तुमची मनःस्थिती मात्र असावी तेवढी शात राहणार नाही. मनात सतत काहीतरी खळबळ माजून राहील कधी ती अनुकूल असेल तर कधी ती मन भडकून टाकील. गुरुच्या कृपेने या पधरवड्यात तुमची जागेची वणवण संपेल. जागेचे प्रयत्न यश देतील. जुन्या जागेचा तंटा निकाली निघेल नोकरीत काही अनुकूल घटना घडू लागतील. इजिनियरिंगचे शिक्षण घेऊन बेकार राहिलेल्या तरुणाना काम मिळेल व्यापार सुधारेल. विशेषत: प्रकाशन व्यवसाय व लोखडी अवजाराना तेजी येईल. वाहन विकत घेण्याची इच्छा पुरी होण्याचा योग दि २१ नंतर येईल. साधुपुरुषाचे दर्शन घडेल. **महिलांस** . माहेरचे विघडलेले संबंध अनपेक्षित सुधारतील. वृद्ध महिलाना लहानशी तीर्थयात्रा घडेल. ¤

**वृश्चिक** : विरोधक नरमतील

मगळाचा काहीसा क्रूर व अहंकारी धर्म तुमच्या स्वभावात जास्त प्रमाणात आविष्कृत होताना पुष्कळदा आढळतो आपला राशिस्वामी आहे मगळच. तो अगदी शेवटी पाचवा होत आहे. तोपर्यंत त्याचा थोडा उपद्रवच होत राहील. विशेष करून राहत्या जागेत काही अडचणी, सरकारी कामात अडथळे, कोर्टकचेऱ्या होत राहतील. तरी पण तुमच्या महत्त्वाकांक्षेला नवे क्षेत्र याच काळात उपलब्ध होईल. तुम्ही महसुल खाते, मिलिटरी, पोलीस अगर जमीनदार असाल तर तुमच्या भाग्याला 'वसत बहर' येणार आहे. उद्योगधंद्यात नवे पर्व सुरू होईल. पैशाअभावी अडून राहिलेली अनेक कामे आता गती घेऊ लागतील. नव्या उद्योगधंद्याचे आराखडे प्रत्यक्षात उतरू लागतील. आर्थिक व तात्रिक सहाय्य मिळेल. या पंधरवड्यात सरकारी सन्मानाचा योग लाभून आपल्यापैकी अनेक भाग्यवान परदेशी जाऊ शकतील. तुम्ही वरिष्ठ अधिकारी असाल तर तुमचे स्पर्धक व विरोधक नरमतील. तुमच्याशी चागले वागू लागतील. दूर गेलेले नातेवाईक व जवळचे मित्र पुन्हा तुमच्या सहवासात येतील. आर्थिक स्थिती चागलीच सुधारेल. **महिलांस** : माहेरपण सहजगत्या लाभेल. पतिराज तुमचे कौतुक करतील. हाती पैसा देतील. ¤

**धनू** : संसारात समाधान

मिथुन चद्राजवळ आधीच सातवा केतू होता. तेथेच आता रवी व शनी आल्यामुळे तुम्ही घाबरून जाणे साहजिकच आहे पण शनी तुमचे कोणतेच वाकडे करू शकणार नाही त्याचप्रमाणे मगळदेखील तुम्हाला अनुकूल आहे. त्यामुळे या साऱ्या ग्रहरचनेचा विचार करता हा पधरवडा अनेक दृष्टीने तुम्हाला महत्त्वाचा ठरणार आहे. सातवा शनी ससारात गोडवा निर्माण करील गेले अनेक दिवस ससारात आजार वा कटकटी होत्या त्या आता सपणार असून नवे प्रसन्न, मगलमय असे वातावरण निर्माण होणार आहे. कित्येकाचे इतक्या अनपेक्षितपणे विवाह ठरणार आहेत की, त्यानाही आश्चर्याचा धक्काच बसावा. घटस्फोटापर्यंत गेलेली प्रकरणे पुन्हा तडजोडीने मिटून मने जोडली जातील. अनेक दिवस न भेटलेली मुले या पधरवड्यात भेटतील. दि. १८ ते २१ व २४ ते ३१ हा काळ एकदरीत महत्त्वाचा ठरेल. नोकरीत चालू कामात बदल वा बढतीबदलीसारखे काही तरी घडावे. उपासनामार्गी व्यक्तीना साक्षात्काराचा अनुभव यावा. या पधरवड्यात जमीन वा स्थावराचा प्रश्न सुटावा. बेकाराना नोकरी ताबडतोब मिळेल असे नाही. परतु इटरव्ह्यूचा अनुकूल प्रत्यय येऊ लागल. अपेक्षा-साफल्य, प्रगतीकारक घटना घडवणारा असा हा काळ आहे. **महिलांस** : प्रसूतियोग्य महिलाना त्रास होणार नाही प्रसूती सुलभतेने पार पडेल. फार दिवसाचे मनोरथ पूर्ण होतील. ¤

**मकर** : काळजी सपली

खरे म्हणजे राशीत चद्रासन्निध गुरू आल्यापासूनच तुमचे सारे तत्र व मत्र बदलले असून तुमच्या भवितव्याची गाडी प्रगतीकडे झुकू लागली आहे. पण शनीचा 'सशयी' व काहीसा 'अविश्वासदर्शक' गुण तुमच्याठायी पुरेपूर असल्यामुळे तुमचे मन सशयाच्या पिशाच्चाभोवती घोटाळत राहाते आणि त्याचबरोबर अनेकवेळा तुमचा 'हॅम्लेट' होतो पण आता गुरुचे तुमच्यावर जबरदस्त नियंत्रण असून शनि तुमचे भले करण्यासाठीच मिथुन या बौद्धिक राशीत आला आहे. आता अनेक बाबतीतील तुमची काळजी सपली आहे विरोधक व अतस्थ शत्रू याची काटकारस्थाने तुम्ही उधळून लावू शकाल. त्याना उघडे पाडू शकाल धद्यातील अडचणी हळूहळू दूर होऊ लागतील. मदावलेले उद्योग पुन्हा सुरू होतील. व्यापारातील तोटा भरून निघेल. रेससारख्या मार्गाने वा लॉटरीने अर्थिकस्थिती चांगलीच सुधारेल. पैशासाठी प्रतिष्ठा पणाला लागणार नाही. उलट चार पैसे शिल्लक पडतील. नोकरीत कर्तबगारीचा प्रभाव पडेल व स्वत चे स्वतत्र स्थान निर्णय होऊ शकेल. राजकारणाच्या क्षेत्रात चाललेली घसरगुडी थाबण्याची चिन्हे दिसू लागतील लेखकाना विशेष करून उपेक्षेचे जीवन जगणाऱ्याना महत्व येईल. **महिलांस** : विवाहासाठी अविरत करावे लागलेले प्रयत्न व अनुभवादी लागलेली निराशा आता संपणार असून नवा ससार लवकरच सुरू होईल. ¤

**कुंभ** : अत्युत्तम काळ


गेल्याच महिन्यात पाचवा शनि आला आणि कुभ राशीच्या व्यक्ती उपेक्षेच्या अधारातून एकदम प्रतिष्ठेच्या प्रकाशात आल्या आहेत. मकर राशीतील बाराव्या गुरूची तमा वा भीती बाळगण्याचे काहीच कारण नाही. शनि हा तुमचा मालक आहे. निश्चय,

स्वमताचा आग्रह, धूर्तपणा, चातुर्य व डाव-पेची राजकारण ही तुम्हाला लाभलेली एक देणगी आहे. त्याचा पुरेपूर उपयोग तुम्ही करा व प्रसिद्धीच्या रंगमचावर तुमचे कर्तृत्व गाजवा हीच या पधरवड्याची तुम्हाला आज्ञा आहे. कुंभराशीच्या व्यक्ती राजकारण खेळतातच या वेळी तुम्ही कोणत्याही पक्षात असा यशाचा वरदहस्त तुमच्या डोक्यावर आहे हे निश्चित. सत्तारूढ पक्षात असाल व तुम्ही निवडून आलेले असाल तर ' मत्री-पदाची माळ ' तुमच्या गळयात पडेल. परदेशी जाणाऱ्या शिष्टमडळात तुमचा समावेश होईल किंवा राजदूताचा सन्मानही तुम्हाला लाभेल. सर्वसाधारणरीत्या हा पंधरवडा प्रगतीची प्रसादचिन्हे दाखवणारा आहे. नोकरीत कामाचा ताण कमी होऊन महत्व व ढेल. खत कारखाने, तेल गिरण्या, लोखडी अवजारे तयार होणारे कारखाने यात बेकाराना नोकरी मिळेल. रडत चाल-लेला वकिली व्यवसाय सुधारू लागेल. पैसा मिळेल. येणे वसूल होईल. पण पैसा चैनी-साठी खर्च होईल. अनैतिक सुखाची लालसा-देखील बळावण्याची शक्यता आहे. गुरु-चरित्राचे वाचन उपकारक ठरेल. पैसा मिळवण्याचे अनैतिक मार्गही टाळावेत. **महिलांस :** पतिराजावरोबर भाडणे करू नयेत ' नवरा माझ्या मुठीत ग ' ही वृत्ति परिणामी त्रासदायक ठरेल. सयम सुख मिळवून देईल. ¤

## मीन : शेती व्यवसाय सुधारेल

गुरु या धार्मिक ग्रहाचे सात्विक तेज तुमच्या स्वभावात जास्त प्रत्ययाला येते राशिस्वामी गुरूच आहे व तो सध्या लाभ-स्थानी आहे. शनि नुकताच चौथा झाला आहे. गुरु-शनीचा योग तुम्हाला तेवढासा अनुकूल नाही हे खरे. पण त्यामुळे काही प्रतिकूल परिणाम घडेल असे समजण्याचे कारण नाही. उलट काही बाबतीत हा पधर-वडा अतिशय उत्तम आहे. प्राधान्ये करून शेतीचा व्यवसाय चागलाच बहरणार आहे. बागायती शेती असो की इतर कोणतीही असो हा काळ अनुकूल जाणार आहे. राजकारणात मात्र जास्त लुडबूड करू नये. कारण ही लुडबुड अंगाशी येईल. आजाराच्या परि-स्थितीत देखील सुधारणा होईल. दि. १९ ते २३ व २६ ते ३० हा काळ महत्वाचा जाईल. रक्तदाब, उष्णता या प्रकारचे आजार कमी होतील निरुत्साह कमी होईल अगतिकता दूर होऊन मनात नवी जिद्द निर्माण होईल. आर्थिक दृष्ट्या हा काळ छान आहे लॉटरीत कित्येकाचे नशिब उघडेल येणे वसूल होईल. धद्याला तेजी व भरभराट प्राप्त होईल. बेकाराना मनात नसलेल्या व्यवसायात नोकरी मिळेल. प्रामुख्याने शैक्षणिक क्षेत्रात मिळेल. स्वतत्र उद्योगात मदत मिळेल. उद्योगाच्या यशासाठी किंवा सुधारण्यासाठी कर्जाचे प्रयत्न चालू असतील तर त्याचे यश दृष्टीपथात येईल. या पधरवड्यात शेवटी शेवटी देशातरही घडण्याची शक्यता आहे. कलावताना प्रसिद्धी व पैसा मिळेल. एक-दरीत सुखाचे वारे घेऊन हा पधरवडा उजाडेल. **महिलांस :** घरगुती लघुउद्योगात चार पैसे मिळतील. नोकरीचे प्रयत्न यश देतील. विवाहाचा प्रश्न मात्र लाबणीवर पडेल. ❖

# आपण कसे आहात ?




सोबतच्या चौकोनाचे १२ विभाग पाडलेले असून एका विभागात रवी मांडलेला आहे त्या विभागाला तनुस्थान म्हणतात वाचकांनी आपली कुंडली समोर धरून असा रवी आपल्या पत्रिकेत आहे किंवा काय ते पाहावे. असल्यास त्याचे फल पुढीलप्रमाणे मिळेल.

या रवीमुळे तुमचे आरोग्य उत्तम राहील. प्रकृती उष्ण राहील. तुमच्या अगात अन्यायाविरुद्ध लढण्याची हिंमत व ईर्षा फार राहील. तुम्ही सडपातळ व उच असाल व तुमचा वर्ण तेजस्वी गोरा असा असेल. मात्र तुमचे आई-वडील शामल वर्णाचे असल्यास तुमचाही वर्ण तसाच राहील. तरीपण तुमच्या मुखावरील शौर्याचे तेज लपणार नाही. तुमचे व्यक्तीमत्त्व दाडगे राहील. तुमची दुसऱ्या-वर छाप चटकन पडेल. इतकेच नव्हे तर तुमचा दुसऱ्यावर दराराही राहील. तुमचे शत्रू तुम्हास टरकून राहतील. तुम्हास राजदरबारी मोठा मान राहील. किंवा तुम्ही सरकारी क्षेत्रात वरच्या जागेवर विराजमान व्हाल. तुम्हास राजकीय अथवा सामाजिक क्षेत्रात चांग-लेच चमकता येईल व तुमच्या हातुन समाजसेवाही घडेल तुमची राजकीय विचारसरणी सरकारी पक्षाच्या बाजूकडील राहील.

अधिकारारूढ पक्षाचेच तुम्ही शेवटपर्यंत राहाल व त्यामुळेच तुम्हाला यश, क्रीर्ती व धनप्राप्ती होईल. तुम्ही दरिद्री कधीही होणार नाही. कारण हा रवी धनयोग करणारा आहे.

तुम्हास पितृसुख भरपूर लाभेल व तुमच्या पायगुणामुळे तुमच्या वडिलाचीही परिस्थिती चागली राहील. तुमचे व तुमच्या वडिलाचे स्नेहसबंध उत्तम राहतील

तुम्ही दीर्घायुषी व्हाल व जन्मास येऊन या जगात काहीतरी भरीव कामगिरी करून जाल. तुमची कीर्ती तुमच्या मागे राहील.

तुम्ही अत्यंत सरळमार्गाने जीवन जगाल. चोरी, लवाडी, यांचा तुम्हास तिटकारा येईल. तुम्ही सत्याने व न्यायाने चालाल.

तुमच्या अगात उत्साह भरपूर राहील. जागरणाचा त्रास तुम्हास मुळीच होणार नाही. थड पाण्याने स्नान करणे तुम्हास फार आवडेल. एकदरीत असा रवी तुम्हास पत्रिकेत लाभलेला असल्यास तुम्ही भाग्यवान ठराल. मात्र हा रवी कोणत्याही पापग्रहाने विघडलेला नसावा. ¤

**एन्. आर्. साळवी,** पनवेल

# नवा मध्यमवर्ग : क्ष किरण

पृष्ठ १३ वरून

आर्थिक विकासास प्रतिकूल अशा काही गोष्टी निग्रहाने दूर कराव्या लागतात. उत्पादकता, उपयुक्तता या दोन कसोटयांवर सारे घासावे लागते. या कसोटयांवर जे टिकणार नाही ते फेकून द्यावे लागते.

हे करण्यासाठी नव्या मध्यम वर्गाची तयारी नाही. सोने हवे, दागिने हवेत, हुंडा-पांडा वगैरे प्रकार हवेत, धार्मिक भावनांवर होणारे खर्च हवेत. आधुनिकतेच्या चर्चेत पुढे असणारा मध्यम वर्गच प्रत्यक्ष आयुष्यात सगळया निरुपयोगी व खर्चिक परंपरांना जीवापाड जपतो. अध्यात्म, धर्मचर्चा वगैरे आर्थिक दृष्टया गैरलागू गोष्टींच्या फैलावाचा तर या वर्गाने मक्ताच घेतला आहे.

मध्यम वर्गावर काहीतरी टीका करावी या बुद्धीने वरील सारे अंतर्विरोध नमूद केलेले नाहीत. हे अंतर्विरोध एका बदलत्या परिस्थितीत अपरिहार्य आहेत. स्वातंत्र्या-नंतरच्या पंचवीस वर्षाच्या काळातील वेगवान बदलांनी मध्यमवर्गाच्या स्वरूपातही बदल झाले असून त्यातून हे अंतर्विरोध उद्‌भवणे साहजिक आहे.

आणखी एक अंतर्विरोध नमूद करणे (जरा दुष्ट भासले तरी) आवश्यक आहे. येथील मुस्लिम जनता, पूर्वीच्या राजकीय वर्चस्वाच्या मानसिक अवस्थेतून अद्याप बाहेर पडलेली नाही असा आरोप करणाऱ्या मध्यम वर्गाला, आपण पन्नास वर्षांपूर्वी येथील समाजाचे नेते होतो हे विसरता येत नाही हे विशेष नाही का ?

आजच्या मध्यमवर्गाच्या समस्येचे खरे मूळ यात आहे, की गमावलेल्या सामाजिक महत्त्वाची स्मृती व सध्याची दुरवस्था यांचा संघर्ष या वर्गाच्या मनात सतत चाललेला असतो. या वर्गाची सध्याची दुरवस्था सापेक्ष आहे. या देशात कोटयावधी जनता अद्याप जनावराहून खालच्या पातळीवरच जगत आहे. ही पूर्णपणे निरपेक्ष अशी दुरावस्था आहे. ती दूर होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांचे स्वरूप कल्पनेपलिकडचे आहे.

पन्नास वर्षांपूर्वी स्वतःला काही जीवित हेतू आहे असे मानून त्यांतच मस्त राहणारा मध्यमवर्ग थोडाफार श्रेष्ठ ठरला तो यामुळे, की त्याने या कल्पनातीत प्रयत्नांशी स्वतःचे काही नाते जोडले—या प्रयत्नांचे स्वरूप स्पष्ट केले—त्या दिशेने काही पावले टाकली. स्वातंत्र्यचळवळीचा सोनेरी इतिहास घडवला.

आजचा मध्यमवर्ग या प्रयत्नांपासून स्वतःला तोडून टाकून आपले श्रेष्ठत्व टिकेल असे मानण्याचा भ्रामकपणा करीत आहे. म्हणून दुःखी, निराश, उद्विग्न आहे. त्याची अवस्था आत्मविस्मृती झालेल्या माणसा-सारखी झाली आहे.

स्वातंत्र्यासाठी झगडणारा मध्यमवर्ग स्वातंत्र्यानंतर पंचवीस वर्षांनी असा निस्तेज, स्वातंत्र्यहीन दिसतो. याचे कारण त्याने स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादित मनला हे आहे. स्वातंत्र्य ही आणावयाची मर्यादित वस्तु आहे असे न मानता ती सतत प्रवाही ठेव-ण्याची, विस्तारित करण्याची सतेज प्रक्रिया आहे असे तो मानील व आर्थिक, सामाजिक क्षेत्रातील स्वातंत्र्य लढा लढवील तर त्याचे हरपले श्रेय त्याला पुन्हा गवसेल. या लढाईत ढिलाई झाली तर भलाई त्याच्या नशिबी नाही !




## वर्गणी

□ 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस-व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

□ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

□ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

□ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणी-दारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

# क्रीडांगण

मुकुंद मणूरकर

## लंडन

'नैतिक विजय' ही कल्पना काही फारशी सुखावह नाही. आपल्याकडे तर या शब्दाचा वापर केवळ चेष्टेसाठीच केला जातो. 'नैतिक विजय' किंवा 'यशस्वी माघार' या शब्दांपाठीमागे अनुक्रमे 'दणदणीत पराभव' आणि 'पाय लावून पळणे' असे अर्थ लपलेले असतात. पण कधीकधी 'नैतिक विजय'सारख्या शब्दाची खरीखुरी प्रचीती येते. नुकतीच इग्लडमध्ये अशी प्रचीती आली. लॉर्ड्सवर दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात इग्लडविरुद्ध न्यूझिलडचा विजय अनपेक्षितपणे हुकला गेला तेव्हा आणि पहिल्या कसोटी सामन्यात अशक्यप्राय वाटणाऱ्या विजयाचा घास तोडाशी आला असताना तो न्यूझिलडच्या हातून निसटला तेव्हाही! आणि हो, विंबल्डन टेनिस स्पर्धेत भारताच्या विजय अमृतराजचा द्वितीय सीडेड जॉन कोडेसबरोबर अखेरच्या क्षणी पराभव झाला तोही अमृतराजचा नैतिक विजयच ठरला.

तर प्रथम क्रिकेट! क्रिकेटमध्ये न्यूझिलडचा नबर शेवटून पहिला! भारत-पाकिस्तानसुद्धा पूर्वी त्याच मालिकेत होते पण मध्यतरी भारताने वेस्टइडिज् व इग्लड याना त्याच्याच भूमीवर अस्मान दाखविल्याने भारताची प्रतिमा उचावली. (तरीही भारताला, आपल्याहून श्रेष्ठ तर जाऊ द्याच–पण आपल्या बरोबरीचेही म्हणताना इग्लडची जीभ अडखळतेच!) पाकिस्तानला असा पराक्रम काही करता आला नाही, तरीही त्याचे सामर्थ्य निर्विवादपणे वाढलेले आहे. (असे इग्लडमध्येही बोलले जाते!) आणि आता न्यूझिलडनेही इग्लडला कडवी लढत देऊन 'हम भी कुछ कम नही'ची साद दिली.


तसे न्यूझिलडचे प्लेयर्स यदाच्या मोसमात प्रथमपासून भलतेच जोरात खेळत आहेत. नॉटिंगहॅमला पहिल्या कसोटीत न्यूझिलडचा पहिला डाव अवघ्या ९७ धावात सपला होता. पहिल्या डावाचे १५३ आणि दुसऱ्या डावाचे ३२५ असे ४७८ धावाचे ओझे डोक्यावर घेऊन न्यूझिलडने जेव्हा आपली दुसरी खेळी सुरू केली तेव्हा मॅचमध्ये काहीच अर्थ उरला नव्हता. फक्त न्यूझिलडचा नुसता पराभव होणार की सणसणीतपणे पराभव होणार हीच काय ती उत्सुकता होती! पण काँग्डन-पोलॉर्ड मडळीनी असा काही नेट लावून धरला की एक वेळ न्यूझिलडची धावसख्या ६ बाद ४०९ अशी होती सामना जिंकायला ७० धावा आणि ४ विकेट्स हातात! अखेर द्रुतगती गोलदाजानी इग्लडला हात दिला आणि सामना जिंकायला केवळ ३८ धावाच कमी असताना न्यूझिलडचा डाव सपला. अर्थात न्यूझिलडने उभारलेली शेवटच्या डावातील धावसंख्या जागतिक विक्रमी ठरली.

प्रचड आत्मविश्वास घेऊन जेव्हा न्यूझिलडचा सघ दुसऱ्या कसोटीत उतरला तेव्हा त्याच्या स्वागताला पचवीस हजार प्रेक्षक उपस्थित होते. (पहिल्या कसोटीतील न्यूझिलडची कडवी लढत फक्त एक हजारजणानी पाहिली होती!) या सामन्यात पहिले साडेचार दिवस खेळाची सूत्रे पूर्णपणे न्यूझिलडच्या हातात होती. इग्लडचा डाव झटक्यात गुडाळून न्यूझिलडने साडेपाचशेचा डोगर उभारला. सघनायक काँग्डन व पोलॉर्ड यानी पहिल्या कसोटीप्रमाणे येथेही शतके झळकावली. पण सामना खिशात घालण्याची सधी आली असताना एका आणीबाणीच्या क्षणी न्यूझिलडने इंग्लडच्या अर्नोल्डला जीवदान दिले, अर्थातच ते महागात पडले. अखेर कीथ फ्लेचरच्या सहाय्याने इग्लडने सामना वाचविला.

### प्रतिक्रिया

हा सामना जर न्यूझिलडने जिकला असता तर अनेक प्रतिक्रिया उमटल्या असत्या. त्यापैकी दोन आम्ही येथे बसूनही सागू शकतो. पहिली प्रतिक्रिया डॉन ब्रॅडमनची– "क्रिकेटमधील सत्तेचा केंद्रबिंदू एका गटाकडून दुसऱ्या गटाकडे सरकला आहे. क्रिकेटच्या हिताच्या दृष्टीने ही गोष्ट आवश्यकच आहे!" ही झाली प्रामाणिक प्रतिक्रिया. आणि दुसरी प्रतिक्रिया म्हणजे इग्लडचा कर्णधार रे इलिंगवर्थ याची! तो म्हणाला असता– "न्यूझिलडचे खेळाडू खेळले छान, पण नाणेफेकीचा कौल आमच्या बाजूने लागला असता तर सामन्याचा निकाल वेगळाच दिसला असता." आपली शंभर टक्के खात्री आहे की, इलिंगवर्थने अशीच प्रतिक्रिया व्यक्त केली असती. (मागे भारताने जेव्हा इग्लडला ओव्हलच्या मैदानावर खडे चारले तेव्हा भारताच्या यशाचे रहस्य इलिंगवर्थने सागितले. ते म्हणजे भारतीय खेळाडू भारतीय प्रेक्षकांसमोर खेळले, कारण प्रेक्षकात बहुसख्य भारतीयच होते म्हणे!)

आपला पराभव मोकळेपणाने कबूल करण्याचे सौजन्य इग्रजात–निदान इलिंगवर्थमध्ये तरी नाहीच नाही. 'ब्रिटिशांच्या साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही' या घमेंडीचा इलिंगवर्थ खरा वारसदार! त्याचमुळे आमचा एक प्रखर हिंदुत्ववादी मित्रही चिडून म्हणतो, 'इंग्लड-पाकिस्तानच्या लढतीत आपण पाकिस्तानच्या बाजूचे!'



विजय अमृतराज
कृष्णन्‌चा वारसदार


इंग्लंडच्या नाकी दम आणण्यात न्यूझिलंडने बजावलेली कामगिरी खचितच दुर्लक्षणीय नाही. आता तिसऱ्या कसोटी सामन्यात एखादेवेळी न्यूझिलंडचा पराभव होईलही. पण कल्पनेतील क्रिकेट साम्राज्यावर सत्ता सांगणाऱ्या इंग्लंडला न्यूझिलंडने हादरविले हे खरे !

बाकी हे इंग्लंडचे लोक एकूण थोरच ! एवढासा चिमुकला देश पण अशा नाना तऱ्हेच्या स्पर्धा भरवितो की जगातील उत्तमोत्तम खेळाडूंना त्याचे सतत आकर्षण वाटते. एकाचवेळी अनेक स्पर्धा भरविणे व त्या व्यवस्थितपणे पार पाडणे यातील कौशल्य एकटे इंग्लंडच जाणे ! विंबल्डन टेनिस स्पर्धा ही अशीच एक स्पर्धा ! एवढया सुसूत्रपणे दरवर्षी भरणारी दुसरी कुठलीही स्पर्धा या जगाच्या पाठीवर नसेल. जगातील सर्वश्रेष्ठ टेनिसपटूंची ही स्पर्धा मानबिंदू आहे. दरवर्षी ही स्पर्धा सुरळीतपणे सुरू होऊन सुरळीतपणे पार पडते. पण यंदा मात्र स्पर्धा सुरू होण्यापूर्वी विंबल्डनमध्ये प्रचंड वादळ झाले.


**निक्की पिलिकने वादळ उठवले**

या वादळाला कारणीभूत झाला युगोस्लाव्हियाचा निक्की पिलिक हा व्यावसायिक खेळाडू ! मध्यंतरी झालेल्या डेव्हिसकप स्पर्धेत आपल्या देशातर्फे खेळण्यास त्याने नकार दिला म्हणून युगोस्लाव्हिया टेनिस असोसिएशनने त्याच्यावर नऊ महिने खेळण्यास बंदी घातली. आंतरराष्ट्रीय संघटनेनेही ही बंदी उचलून धरली. फक्त बंदीची मुदत एक महिन्यापुरतीच मर्यादित केली. ही मुदत ३० जून रोजी संपणार होती. पण तत्पूर्वीच विंबल्डन स्पर्धा सुरू होणार असल्यामुळे त्याला स्पर्धेत भाग घेता येणार नव्हता. व्यावसायिक खेळाडूंच्या संघटनेने याला विरोध केला. पिलिकला स्पर्धेत प्रवेश मिळालाच पाहिजे अशी त्यांची मागणी, नाहीतर आम्ही स्पर्धेवर बहिष्कार टाकू ही धमकी ! पण संघटक आपल्या निर्णयाला चिकटून राहिले. अनेक खटपटी करूनही आपली मागणी मान्य होत नाही हे पाहून पिलिकने न्यायालयात धाव घेतली. पण तिथेही त्याची डाळ शिजली नाही. मग ठरल्याप्रमाणे व्यावसायिक खेळाडूंनी बहिष्कार घालण्याचे ठरविले. जगातील सर्वोत्कृष्ट ९७ व्यावसायिक खेळाडू या संघटनेचे सभासद आहेत. त्यातील ६७ जणांनी बहिष्काराच्या हाकेला ओ दिली.

इली नास्तासे
**अलेक्स मेयरने धक्काच दिला**



मार्गारेट कोर्ट
'ग्रॅंड स्लॅम'चा हेतु पार धुळीस मिळाला.



या बहिष्कार घालणाऱ्यात पूर्वी सीडीग दिलेल्या सोळा खेळाडूंपैकी बाराजण होते. स्टॅन स्मिथ, जॉन न्यूकोम्ब, केन रोझवॉल, आर्थर ॲश असे रथीमहारथी स्पर्धेतून बाहेर पडले. दरम्यान युरोप, अमेरिका, द. आफ्रिका यांच्या टेनिस सघटनानी आपापल्या खेळाडूंना व्यावसायिक खेळाडू सघटनेचा आदेश न मानण्यास सांगितले त्यामुळे दुसरे सीडीग मिळालेल्या इली नास्तासेसारखे काही खेळाडू स्पर्धेत सामील झाले. या बहिष्काराच्या प्रकारामुळे भारताचा मात्र एक फायदाच झाला. कधी नव्हे ते भारताच्या सात टेनिसपटूंना स्पर्धेत प्रवेश मिळाला. या सर्व घडामोडीत बरोबर कोण व चूक कोण हा प्रश्न वेगळा, पण एकदरीत स्पर्धेची शान मात्र निघून गेली. एखाद्या प्रचंड, अत्याधुनिक पण मोकळ्या दिवाणखान्याप्रमाणे ही स्पर्धा अनेकाना रितीरिती वाटू लागली. दरवर्षी विबल्डनमध्ये कितीतरी पैजा लागतात. पण यावेळी इली नास्तासे एकशे एक टक्के जिंकणार ही खात्री, मग पैजा कशा लागणार?

पण चौथ्या फेरीत एक अद्‌भूत घडले. अमेरिकेचा अकराव्या नबराचा खेळाडू अलेक्स मेयर (वय वर्षे २१) याने प्रथम सीडेड व स्पर्धेत खात्रीने विजयी ठरू पाहणाऱ्या इली नास्तासेचा ६-४, ८ ६, ६-८, ६-४ असा चक्क पराभव केला, व साऱ्या टेनिस जगतात एकच खळबळ उडाली. अलेक्स मेयर याचे नावसुद्धा कुणाला विशेषसे माहित नव्हते. इतकेच नव्हे तर अमेरिकेतील आतरविद्यापीठ स्पर्धा जिंकणाऱ्या मेयरला अजून ग्रास कोर्टचा अनुभवही नव्हता. 'हे यश मला सर्वस्वी अनपेक्षित आहे' असे मेयर म्हणाला ते खरेच आहे. याच्या उलट नास्तासेची परिस्थिती होती. कारण नास्तासेने गेल्या ५४ सामन्यापैकी ५३ सामन्यात विजय मिळविला होता. नास्तासेच्या पराभवाला कारणीभूत झाल्या दोन गोष्टी. एक त्याच्या पाठीत भरलेली उसण व दुसरे म्हणजे स्पर्धेपूर्वी झालेला प्रचड गोधळ! व्यावसायिक सघटनेचा आदेश मानून स्पर्धेवर बहिष्कार टाकावा की आपल्या देशाचा आदेश मानून स्पर्धेत भाग घ्यावयाचा याबाबत त्याला बरीच डोकेफोड करावी लागली. खरे तर नास्तासे हा अतिशय भडकू माणूस! त्याने सघटनेचा आदेश मानून नक्कीच स्पर्धेवर बहिष्कार टाकला असता. पण प्रचड फॉर्मात असल्याने त्याला यदा विजयाची खात्री होती म्हणूनच त्याने ही सधी दवडली नाही असे म्हणतात. साध्यासाध्या गोष्टीनीही एरवी खेळातील चित्त विचलीत होणारा नास्तासे यावेळी प्रचड मानसिक तणावाखाली दबला गेला असणार हे सहज पटण्यासारखे आहे सामना हरल्यानतर तो म्हणालाच, 'गेल्या पधरवड्यात माझ्या डोक्यात तुफान विचार होते, फक्त टेनिस सोडून!'

## निसटलेला विजय

भारतीयाच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट म्हणजे विजय अमृतराजची कामगिरी! विबल्डनच्या आपल्या दुसऱ्याच प्रयत्नात उपात्यपूर्व फेरी गाठताना त्याने प्रथम ऑस्ट्रेलियाचा सातवा सीडेड ओवेने डेव्हिडसनचा चार सेटमध्ये पराभव केला. उपात्यफेरीत त्याची गाठ द्वितीय सीडेड जॉय कोडेस याच्याशी पडली. आदल्याच दिवशी जयदीप मुखर्जीने कोडेसला चार सेट झुजविले असल्यामुळे अमृतराजच्या विजयाबद्दल बरीच आशा होती. दोन दोन सेट दोघानीही घेतल्यावर शेवटच्या पाचव्या सेटमध्ये विजयच आघाडीवर होता. पण एका निर्णायक क्षणी त्याचे चित्त विचलीत झाले ते मात्र वेगळ्याच कारणामुळे! शेजारच्या कोर्टवर चाललेल्या सामन्यात इग्लडचा रॉजर्स टेलरच्या अनपेक्षित विजयाबद्दल जो टाळ्याचा प्रचड कडकडाट झाला त्याचवेळी नेमका विजय अमृतराज मॅच पॉईंट मिळविण्याच्या बेतात होता. पण गागरून गेल्यामुळे विजय मिळवून देणारा त्याचा साधा फटका चक्क कोर्टाबाहेर जाऊन पडला. त्याचक्षणी सामनाही त्याच्या हातून निसटला. एक मात्र खरे की 'कृष्णन्‌चा वारसदार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विजय अमृतराजने आपण कृष्णन्‌पेक्षाही बरेच पुढे जाणार याची ताजी ग्वाही दिली. कोडेसवर जर विजयला मात करता आली असती तर तो अतिम फेरीतही पोचला असता. आणि कदाचित तिथेही तो विजयी ठरला असता. कारण यदाचा सभाव्य विजेता आता जॉन कोडेसच आहे!

पुरुषाची स्पर्धा अशी गाजत असताना महिला गटातही काही अनपेक्षित धक्के बसले. पुरुषाप्रमाणे महिलामध्येही सुरुवातीला बहिष्कार घालण्याची टूम निघाली होती. पण त्याचे कारण वेगळे होते. इतरांचे लक्ष वेधून घेणे हा स्त्रियाचा ओरिजनल गुण! आणि यावेळी तर पुरुषातील रथीमहारथी स्पर्धेतून बाहेर पडलेले! त्यामुळे गतवर्षीची विजेती बिली जीन किंग म्हणाली, या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण आता आम्ही महिलाच आहोत. त्यामुळे पुरुषाइतकीच बक्षिसाची रक्कम आम्हालाही मिळाली पाहिजे.' (सध्या पुरुष गटाला सुमारे सहा लाख रुपये व महिलाना सुमारे चार लाख रुपये अशा बक्षिसाच्या रक्कमा आहेत) आधीच पोळलेल्या सयोजकानी पुढील वर्षी रक्कम वाढवून मिळेल, यावेळी तुम्हाला बोनस देऊ असे म्हणून वेळ मारून नेली. ही एवढी एक घटना सोडली तर उपांत्य फेरीपर्यंत सर्व सुरळीत चालेल. पहिल्या चारही सीडेड खेळाडू उपात्य फेरीत पोचल्या. पण इथे मात्र पुरुष गटाप्रमाणे एक झटका मिळाला. पहिले सीडीग मिळालेल्या ऑस्ट्रेलियाच्या मार्गारेट हीचा चौथ्या सीडेड ख्रिस एव्हर्टने पराभव केला. एकाच वर्षी लागोपाठ तीन मोठ्या स्पर्धा जिंकून 'ग्रँड स्लॅम' करण्याचा मार्गारेटचा हेतू ख्रिस एव्हर्ट या फटाकडीने पार धुळीस मिळवला. आपला एकविसावा वाढदिवस साजरा करणाऱ्या मार्गारेटला हा अनपेक्षित धक्का होता.

असो. हा लेख लिहीत असताना उपांत्य फेरीचे सामने सपून अंतिम फेरीसाठी जोड्या नक्की झाल्या आहेत. पुरुष गटात रशियन ॲलेक्स मेट्रेव्हेली व झेकोस्लोव्हाकियाचा जॉन कोडेस याच्यात लढत होईल तर महिलांच्या गटात ख्रिस एव्हर्ट व बीली जीन किंग या दोन अमेरिकन महिलात!

याचे निकाल काहीही लागो, पुरुष व महिला या दोन्ही गटात प्रथम सीडीग मिळालेले खेळाडू अंतीम फेरीच्या आतच गळल्याचे अनोखे दृश्य यावेळी पहायला मिळाले. क्रिकेटप्रमाणे टेनिसही आता 'अ गेम ऑफ चान्स' व्हायच्या मार्गावर आहे का?

# अवांतर

प्रतिनिधी

## इन्स्टिटयूटवालाज् !

मुंबईच्या स्टुडिओतून, लॅबोरेटरीतून एखादी चक्कर मारा, चार-दोन इन्स्टिटयूट वाले हमखास मिळतील. या इनस्टिटयूट वाल्यांची शान सध्या भलतीच वाढली आहे. मुंबईमध्ये ढीगभर इन्स्टिटयूटस असल्या तरी 'पूना इनस्टिटयूटचा पोरगा' म्हटला की मंडळी जरा टरकतातच. इनस्टिटयूटच्या या वाढत्या दबदब्याचा परिणाम म्हणून असेल कदाचित् पण या पूना इन्स्टिटयूटमध्ये प्रवेश मिळवणे हे महान जिकीरीचे काम होऊन बसले आहे. मेडिकल, इंजिनिअरींगची असते ना, असली तुफानी गळेकापी स्पर्धा इनस्टिटयूट प्रवेशासाठी उडाली होती. काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या तमाम भारतीय प्रदेशातील सुमारे वीस हजार मंडळींनी अर्ज केले. लेखी परिक्षेची पहिली चाळणी मारून शेकडो मंडळी घरी बसवण्यात आली.

पुण्याच्या इन्स्टिटयूटमध्ये मुलाखतीचे दुसरे पर्व सुरू झाले. या दुसऱ्या चाळणीला नकारही झोंबरा. कारण प्रत्यक्ष तोंडावर मिळणारा. स्वाभाविकपणे – पोरासोरांनी अनेक नाटके केली. अभिनयाच्या अभ्यास-क्रमासाठी प्रवेश नाकारला, म्हणून एका टारगट कारटयाने डायझोनच्या बाटलीतून शुद्ध पाणी प्राशन केले. अर्थात ही गोष्ट स्पष्ट होईपर्यंत वातावरण तंगच होते. निवड समिती वरील हमखास मोहऱ्यांमध्ये हृषीकेष मुखर्जी यांचा समावेष होतो. हृषीदा म्हण-तात–निवड करणारांची आता खरी कसोटी आहे. कारण निवडीला आता खऱ्या अर्थाने वाव मिळू लागला आहे. यंदा निवडलेल्या मंडळींमध्ये–एम्. एस्. सी. ला प्रथम श्रेणी संपादन केलेले मेहरा नावाचे गृहस्थ आहेत. तर आता अशी ही सुजाण शिकलेली मंडळी प्रशिक्षित होऊन फिल्लम-लाइन मध्ये येत आहेत. आमची अपेक्षा इतकीच – मंडळींना रे, मृणाल सेन, पेलले नाहीत तर हरकत नाही. पण पुन्हा 'दो राहा' नको !! ही मंडळी सिनेमाचा–दो राहा करणार असतील तर आमचे राजकपूर, चोप्रा, शांताराम काय वाईट आहेत ?



मुलाखतीची
दुसरी चाळणी.
परीक्षक आहेत
रोशन तनेजा
कामिनी कौशल
आणि प्राचार्य
जगत् मुरारी

## भिजत घोंगडे

कोण्या एके काळी भारत सरकारने चित्रपट सेन्सॉरशिपबाबत चौकशी करण्यासाठी खोसला समिती नेमली होती. अन्य समिती-प्रमाणेच या समितीने नेकीने काम करून आपला अहवाल सादर केला. या अहवाला-मध्ये काही क्रांतीकारी सूचना होत्या आणि अहवालाचा एकंदर 'टोन' सेन्सॉरशिपवरील बंधने शिथील होणार असे सूचित करणारा होता. स्वाभाविकपणे मंडळी सुखावली. येणारे दिवस एकंदरीत सुगीचे अशा दृष्टीने चित्रीकरण करण्यात येऊ लागले.

मंडळी इकडे गरम-गरम कामगिरीमध्ये गुंतली असली तरी सरकार अहवालाच्या बाबतीत भलतेच उदासिन होते. वर्षामागून वर्षे गेली पण गुलदस्तामध्ये गेलेला अहवाल बाहेर आलाच नाही. उलटे सेन्सॉरचे धोरण पहिल्यापेक्षा ताठर झाले.

आपल्या चित्रपटामध्ये तमके दृष्य होते–मग आम्हाला का परवानगी नाकारता? बोर्डाने अलिकडे हे अमके-तमके प्रकरण पूर्ण बन्द करून टाकले आहे. निर्माता भले कोणीही असो बोर्ड प्रथमच ठणकावते तुमच्या चित्रपटापुरते बोला!!

## प्रभात-किंमत-बुनियाद

कच्चे धागे हे राज खोसला यांचे नवीन चित्र बोर्डाने बघितले. काही तमली दृष्ये, काही हिंसाचारी दृष्ये काढून टाकण्यास सांगितली. हो-नाही करत खोसलाजी राजी झाले. योग्य त्या सूचना देऊन चित्रपटाच्या प्रदर्शनाची तयारी करण्यासाठी स्वारी दिल्लीकडे रवाना झाली. तारीख निश्चित झाली २२ जून. बोर्डाची परवानगी हा केवळ उपचाराचा भाग होता. पण बोर्डाने पुन्हा एकदा चमकवले. कच्चे धागे सेन्सॉर मान्य झाला. पण टाळक्यावर 'ए'–हा खासा प्रौढासाठी असा शिक्का घेऊन. बुनियाद हे चित्र विरेन्द सिन्हा यांनी बोर्डाला दाखवले आणि बोर्डाने चक्क सर्टिफिकेट नाकारले. आता यावरही एक तोडगा ठरून गेला आहे. निर्मात्याने चित्रपटामध्ये सेन्सॉर बोर्ड सुचवेल त्या प्रमाणे बदल करायचे, मग दयाळू सेन्सॉर बोर्ड 'रिव्हाइजड्' असा शेरा मारून 'ए' सर्टिफिकेट देऊन टाकते. सिन्हा साहेबांनी हीच ट्रिक केली. बुनियाद सुटले. 'दो राहा' वाले राम दयाळ यांचे प्रभात, दक्षिणी निर्माते धुंडी यांचे किमत ही चित्रे अशीच रिव्हाइजड् होऊन सुटली आहेत.

दयाळू सेन्सॉर बोर्ड आणि या बोर्डावर नियंत्रण करणारे माहिती आणि नभोवाणी मंत्रालय या मध्ये सध्या म्हणे भलताच तणाव निर्माण झाला आहे. बोर्डाचे चेअरमन श्री. विरेन्द व्यास खालून निर्माते आणि वरून सरकार यांच्या दबावाखाली चेपून गेले आहेत. बोर्डाच्या चेअरमन पदातून आपल्याला मुक्त करा असा एकसारखा घोषा त्यांनी चालवला आहे. ये गुलिस्ता हमारा हे शर्मिला देव आनंदच्या गुलाबी प्रणयाभोवती रेंगळणारे राष्ट्रीय एकात्मतेवरील चित्र–अख्ख्या भारतामध्ये दाखवून झाले आणि सरकारने चार नागा मंडळींच्या दबावाने चित्राला बंदी घातली. निर्माते अत्मारामही अक्षरशः कावून गेले आहेत. कथेपासून मंजूरी घेत गेलो तरी चित्रावर बंदी कशी येते याचे त्यांना आश्चर्य वाटत आहे. कच्चे धागेला 'ए' मिळाले. म्हणून खोसलाजी संतापले आहेत. प्रभातवर केव्हा घाला पडेल त्याचा नेम नाही. असे हे सेन्सॉरचे भिजत घोंगडे झाले आहे आणि मंत्री महोदय मास्कोमध्ये महोत्सवाची शान लूटत आहेत. बी. आर. चोप्राजींनी सांगितलेली ताजी बातमी अशी की, या आठवड्यात (दि. ७ जुलै) बघीतलेल्या चारही चित्रपटांना बोर्डाने सर्टिफिकेट नाकारले आहे.

**कोशिश–१०० दिवस**
**संजीव, जया आणि शत्रुघ्न**





देव-झीनत जोडी सध्या फुटली की काय ?




## गॉसिपवाल्यांची नवी आरोळी

शत्रुघ्न सिन्हांची स्वारी हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत निक्सन साहेबांच्या मुलखातून परतली आहे. वर्षाखाली सिन्हाचा जेवढा Impact होता तेवढा आज नाही. म्हणजे सिन्हा संपला असे नव्हे. पण गाडे सध्या काही काळ थंड राहील. या सिनेमाच्या धंद्यामध्ये हा थंडपणा परवडणारा नसतो. गॉसीपबाई – देवयानीजी आणि दोस्त हो! कंपनी – सध्या शत्रुभोवती लक्ष केंद्रीत करून आहे. शत्रू – झिनत अमानच्या नावाने भुई गरम करण्याचे काम चालू आहे. आता बघता बघता अख्या चित्रवर्तूळामध्ये 'वार्ता' पोचली आहे. देव साहेबांच्या हाती सध्या चांगले पिक्चरही नाही, आणि चांगली छोकरीही नाही! अन् त्यातून ही झिनत निसटली तर या चिक चॉकलेटने काय करावे? जॉनी नंतरची देवची हवा साफ विरून गेली आहे. बनारसी बाबू, शरीफ बदमाष या दोन्ही चित्रांचा 'धंदा' देवच्या इमेजला साजेसा नाही. देव–झिनत–शत्रूघ्न– असे हे त्रिकूट पुन्हा एकदा 'न्यूज' मध्ये चमकून उठेल. हा गॉसीपचा मामला राशी भविष्यवाल्यापेक्षाही सोपा. कोणतेही दडपण म्हणून नाही. जरा बातमी मिळाली की बबल झालाच. खऱ्या खोट्याचे सोयर सुतक कोणालाच नाही.

देव आनंद म्हणतात, एकाचवेळी अनेक चित्रपटामध्ये भूमिका करणे फारसे योग्य नसते असे आता मला वाटते. या दृष्टिने यापुढे एकावेळी तीन पेक्षा जास्त चित्रपट स्विकारायचे नाहीत असे मी ठरवले आहे.

देवजी एकाच वेळी तीन चित्रपट या पुढेही आपल्याला मिळतील असे खरोखरच वाटते का? आम्ही आपली एक दुरुस्ती सुचवतो, एकाच वेळी नवकेतनची तीन चित्रे निर्मिती अवस्थेमध्ये असणार नाहीत अशी नोंद जास्त सुयोग्य ठरेल.



–आपण ओळखू शकाल ही व्यक्ती कोण आहे ?

बरोबर ओळखू शकलात तर आपले नाव पुढील अंकात प्रसिद्ध करू. आपले उत्तर २५ जुलै पूर्वी माणूस कार्यालयाकडे यावे. –संपादक




Dattaram-SRP-17

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**